# देवाधर्माचा शोध
# आणि
# निधर्मी नैतिकता

(दहा वर्षांच्या भारतभरच्या संशोधनाचा आढावा)

डॉ. सुभाष के. देसाई
एम.ए.पीएच.डी.

४ जुलै, २०१०

(ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते ॲड. गोविंद पानसरे यांची प्रस्तावना)

**सिंहवाणी प्रिंटर्स, पब्लिशर्स, कोल्हापूर.**

**प्रथमावृत्ती :**
स्वामी विवेकानंद यांची पुण्यतिथी ४ जुलै, २०१०

**लेखक :**
डॉ. सुभाष के. देसाई,
१०२, साळोखेनगर, कळंबा रोड, कोल्हापूर
भ्रमणध्वनी क्र. : ९४२३०३९९२९
Email-drsubhashdesai@gmail.com

**मुद्रक / प्रकाशक :**
सिंहवाणी प्रिंटर्स, पब्लिशर्स,
११ ब, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर
फोन : (०२३१) २६४१६३५

**अक्षर जुळवणी :**
सौ. पद्मजा गोलिवडेकर, कोल्हापूर
भ्रमणध्वनी : ९८६००२८७७८

**मुखपृष्ठ :**
चेतन पाटणेकर, कोल्हापूर
भ्रमणध्वनी : ९४२३०४०३१२

**मूल्य :** ५०/-

# अनुक्रमणिका

| अ.नं. | | पान क्र. |
|---|---|---|
| | मनोगत | ४ |
| | प्रस्तावना | ७ |
| १) | पावित्र्याची भावना | ११ |
| २) | कायद्याच्या दृष्टिकोनातून हिंदू कायदा | १४ |
| ३) | संहिता - श्रृती - स्मृती | २८ |
| ४) | ट्रस्ट आणि चॅरिटी | ३२ |
| ५) | धर्माची आधुनिक काळात गरज आहे का? | ३६ |
| ६) | यज्ञ संस्थेतून मंदिर संस्थेचा विकास | ४० |
| ७) | सामाजिक, धार्मिक स्थळ - मंदिर | ४२ |
| ८) | (सामाजिक) धार्मिक विधीमध्ये धर्म राहिला आहे का? | ५२ |
| ९) | प्रश्नावली | ८६ |
| १०) | निष्कर्ष | ९० |

## मनोगत

साम्यवादी विचारसरणीच्या काही लोकांच्या मते 'तत्त्वज्ञान' ही निरुपयोगी गोष्ट आहे. त्यामुळे अन्न, वस्त्र, निवाऱ्याचे प्रश्‍न सुटत नाहीत. तत्त्वज्ञानी लोकांची व्यवहाराशी फारकत असते; पण साम्यवादी विचारसरणीचा महापुरुष ज्याने कामगारांच्या दु:खाला वाचा फोडली, मार्ग दाखवला तो 'कार्ल मार्क्स' तत्त्वज्ञानी होता, हे विसरता येणार नाही. त्याच्या विचारांनी जागतिक क्रांती झाली. त्यामुळे तत्त्वज्ञानी लोकांची व्यवहाराशी फारकत असते असे म्हणता येणार नाही; मात्र आजचा धार्मिक उन्माद पाहिला तर धर्माचा अफूची गोळी म्हणून काही जण वापर करतात, हे सत्य नाकारायचेही काही कारण नाही.

वरवर दिसणाऱ्या गोष्टीपेक्षा त्यामागील अस्तित्वाचा शोध घ्यावा. वस्तूचे खरे स्वरूप शोधण्यात आनंद घेताना तत्त्वचिंतकांनी व्यवहाराशी फारकत घेतल्याचे आढळत नाही. ख्रिस्तपूर्व सातव्या शतकात ग्रीक तत्त्वज्ञ झेनोफानस हा सुधारणावादी होता. धर्माच्या नावावर लिहिलेल्या काल्पनिक कथांवर त्याने कठोर प्रहार केले. पायथागोरसने (नैतिक मूल्ये, संघटना, शिस्त) धार्मिक श्रद्धा, संघटना स्थापून जोपासली. राजकीय क्षेत्रावरही त्याचा प्रभाव पडला. त्याचवेळी त्याने भूमिती, गणित क्षेत्रात अभूतपूर्व सिद्धांत मांडले. सूर्यमालिकेचे केंद्र पृथ्वी नाही, हे त्यानेच सांगितले.

जीवाची पर्वा न करता विचारस्वातंत्र्याचा पुरस्कार सॉक्रेटिसने केला. जे शब्द तुम्ही वापराल, उच्चाराल त्याची आधी बिनचूक व्याख्या करा, नीट, स्वच्छ विचार करा असे तो म्हणे. तत्त्वचिंतकाला शोभेल अशा मृत्यूला सॉक्रेटिस सामोरा गेला.

वीस वर्षे प्लेटोच्या पायाशी धडे घेणाऱ्या ॲरिस्टॉटलचे नाव ज्ञानकोषकार म्हणून अजरामर झाले. त्याने चारशेवर ग्रंथांची निर्मिती केली. तर्कशास्त्र, भौतिकशास्त्र, हवामानशास्त्र, प्राण्यांची उत्पत्ती, सौंदर्यशास्त्र, अहंकारशास्त्र, वक्तृत्वशास्त्र, काव्यशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांचा त्याचा अभ्यास होता. त्याला पहिला आधुनिक शास्त्रज्ञ म्हणतात. अठराव्या शतकातले इंग्रज तत्त्वज्ञ लॉक, बर्कले ह्यून यांच्या वैचारिक जागृतीमुळे मुक्तविचार व धर्म सुरू झाला. रिस्पिनोझाला त्यासाठी वाळीत टाकले. फ्रान्सीस बेकनने मानसशास्त्राची पायाभरणी केली. जिओरनाडो ब्रुनोला पोपशाहीने जिवंत जाळले. १७८१ साली क्रिडिक ऑफ प्युअर रिझन लिहिणारा कांट हा आजही चर्चेचा विषय ठरतो. नित्शेच्या तत्त्वज्ञानातून हिटलर जन्मला. दु:ख आणि विरोधातून व्यक्ती आणि समाजाचा विकास होतो, असे हेगेल हा तत्त्वज्ञ सांगून गेला. त्यातून विरोध विकासाचा सिद्धांत समाजसंदर्भात वापरून कार्ल मार्क्स अजरामर झाला. मूठभर भांडवलदार इतरांना गुलामगिरीत ठेवतात म्हणून त्यातून कसे सुटायचे, याचा मार्गही मार्क्सने दाखवला. धार्मिक गुलामगिरी वाईट असते म्हणून धर्म आणि देवाची कल्पना नष्ट करा, असा त्याचा संदेश होता.

या पाश्चात्त्य तत्त्वचिंतकांप्रमाणे हजारो वर्षांपासून पौर्वात्य तत्त्वचिंतकांची थोर परंपरा आहे. भगवान बुद्ध, महावीर, चार्वाक ते स्वामी विवेकानंद, महर्षी अरविंद यांच्यापर्यंत अनेक जीवनाचे भाष्यकार होऊन गेले.

सर्वकाही परिवर्तनशील आहे. तत्त्वचिंतनाचा प्रवाह जेथे जेथे थांबतो, तेथे तेथे शेवाळ साठते, रूढी निर्माण होतात. मठाधीश निर्माण होतात. पुन्हा नव्याने तत्त्वज्ञानाच्या नावावर शोषण करणारे निर्माण होतात. जणू अनुयायीच तत्त्वज्ञानाचा पराभव करतात. याला जीवनाचे कोणतेच क्षेत्र अपवाद नाही. परिवर्तनाची गरज व दिशा दाखवण्याचा नम्र प्रयत्न या छोट्या अभ्यासातून मी केला आहे. तो परिपूर्ण आहे, असा माझा दावा नाही; परंतु त्यावर उलट-सुलट विचारमंथन होऊ शकते. धर्मापेक्षा मूलभूत तत्त्वज्ञानाकडे लक्ष वेधावे, असाही माझा उद्देश आहे.

महाराष्ट्रातील जे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत, ज्यांनी अनेक राजकीय

सत्तेच्या मोहापासून स्वत:ला दूर ठेवले व मार्क्सवादी विचारावर अभंग निष्ठा ठेवली, ते माझ्या वडिलांचे मित्र गोविंदराव पानसरे यांच्याबद्दल मला आदर आहे. माझ्या या सामाजिक, धार्मिक अभ्यासावर ते भाष्य करतील म्हणून त्यांना प्रस्तावनेचा आग्रह धरला. आमचे मित्र ॲड. सी. पी. जगताप यांनी वारंवार स्मरण केल्याने ही प्रस्तावना त्यांनी लिहिली. डोळ्यांचा त्रास, प्रवासाची दगदग, संघटनेचा व्याप यातून वेळ काढून त्यांनी प्रस्तावना लिहिली, त्याबद्दल त्यांचे व ॲड. जगताप यांचा मी आभारी आहे. माझे लिखाण त्यांना वाचून घ्यावे लागले. स्वत: वाचणे व वाचून घेणे यातील फरक आणि मर्यादेमुळे सदर प्रस्तावनेबाबत खुद्द ॲड. पानसरे वा मी दोघेही फारसे समाधानी नाही; परंतु पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर सविस्तर लिहीन किंवा बोलेन हे त्यांचे आश्वासन मला पुरेसे आहे. परिवर्तन चळवळीतील एका ज्येष्ठ नेत्याचा हा आश्वासक शब्द आहे, असे मी समजतो.

**- डॉ. सुभाष के. देसाई**

## प्रस्तावना

संपूर्ण जगात अजून एकही असा समाज आढळलेला नाही की, ज्या समाजात परमेश्वर किंवा देव ही कल्पना नाही, धर्म ही कल्पना नाही. रूपे वेगवेगळी आहेत, समज वेगवेगळे आहेत; परंतु कोणत्या ना कोणत्या रूपात या कल्पना आहेत. त्या नुसत्या कल्पना नाहीत, तर त्या सामाजिक संस्था आहेत. समाजजीवन, परमेश्वर आणि धर्म या संस्थांनी व्यापलेले आणि नियंत्रित केलेले आहे. असे का आहे?

या समाजसंस्था केवळ अस्तित्वात नाहीत, तर त्या प्रदीर्घ काळ समाज अस्तित्वात आला तेव्हापासून अस्तित्वात आहेत. हे सर्वव्यापी स्वरूप आणि ही परिणामकारकता या समाजसंस्थांना का लाभली असावी?

कोणतीही समाजसंस्था उगाचच टिकून राहत नाही. विज्ञानाने प्रचंड प्रगती केली असूनही धर्म, देव इ. कल्पनांचा समाजावरील पगडा नाहीसा तर झाला नाहीच, उलट तो वाढतो आहे की काय असे वाटावे, अशी अवस्था आहे. असे का व्हावे?

धर्म आणि परमेश्वर या कल्पना किंवा संस्था कोणतेतरी समाजोपयोगी काम करीत आहेत, म्हणूनच या कल्पना आणि या कल्पनांवर आधारित संस्था टिकून आहेत. अशाच रीतीने या वास्तवाकडे पाहिले पाहिजे असे मला वाटते.

देव ही कल्पना आणि त्याच्याशी निगडित धर्म ही समाजसंस्था कुणातरी व्यक्तीच्या किंवा समुहाच्या डोक्यातून निर्माण झाली आणि त्यांच्या सुपीक डोक्यातून निर्माण झालेली ही संस्था त्यांच्या केवळ स्वार्थामुळे टिकून आहे असे घडलेले नाही. मग परमेश्वर आणि धर्म का निर्माण झाले आणि का टिकले?

धर्म या शब्दाची उत्पत्ती शोधली तर असे आढळले की, हा शब्द 'धृ' या मूळ संस्कृत शब्दापासून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ धारणा करणे असा आहे. धारणा करतो तो धर्म. समाजधारणा करतो तो धर्म, असा त्याचा अर्थ होतो. आपण मूळचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. सध्या धर्माच्या नावावर आपल्या सभोवती जे चालू आहे, त्यावरून मूळ अर्थ समजावून घेऊ

नये. सध्या जे चालू आहे ते धर्माच्या मूळ अर्थाचे विकृत, किळसवाणे, ओंगळवाणे आणि (एका समाज विभागाच्या) स्वार्थासाठी चालू आहे, हेतुपूर्वक चालू आहे. हा हेतू दुष्ट आहे. परंतु, मूळात धर्म अस्तित्वात आले ते अशा विकृत व स्वार्थी कारणाकरीता अस्तित्वात आलेले नाहीत, हे लक्षात घ्यावे. मूळ प्रकृती लक्षात घ्यावी. विकृतीच काही लक्षात घेऊ नये.

समाज टिकून राहावयाचा तर त्यासाठी अनेक प्रकारच्या नियमांची आवश्यकता होती व आहे. या आवश्यक नियमांचा समूह म्हणजे धर्म. समाजधारणा करतो तो धर्म अशी मूळ भूमिका असावी.

या नियमांचे पालन करावयाचे तर त्यासाठी दंडशक्ती हवी. समाजधारणेसाठीच्या नियमांचे जो पालन करील, त्यालाच चांगले बक्षीस मिळण्याचे प्रलोभन मिळावे, अशी दृढ भावना आणि पक्की खात्री निर्माण व्हायला हवी. जो कोणी समाजधारणेसाठी आवश्यक कायद्याचे नियम पाळणार नाही, त्याला जबर शिक्षाच असायला हवी.

हे प्रलोभन म्हणजे स्वर्ग आणि ही भीती म्हणजे नरक, या संकल्पना अस्तित्वात आणल्या गेल्या असाव्यात. हे बक्षीस देणारा, ही शिक्षा देणारा म्हणून देव किंवा परमेश्वर, अल्ला किंवा गॉड अस्तित्वात आणला गेला.

या प्रलोभनामुळे आणि भीतीमुळे हे समाजधारणेचे नियम पाळले जाऊ लागले आणि समाज टिकून राहिला. धर्म या संस्थेने आणि परमेश्वर या कल्पनेने हे कार्य पार पाडले. म्हणून धर्म सर्वत्र आणि भीती प्रदीर्घ काळ आहे. खरे म्हणजे देव अस्तित्वात नाही; परंतु तो अस्तित्वात आहे अशी समाजाची खात्री आहे. देव हा भ्रम आहे. स्वर्ग आणि नरक या भ्रामक कल्पना आहेत.

जे अस्तित्वातच नाही, ते आहे असे का समजले गेले? असे कसे काय घडू शकते? कसे घडू शकले? मानवी समाजातील अज्ञानामुळे त्याने देव, परमेश्वर, स्वर्ग, नरक या कल्पना स्वीकारल्या.

ज्याचा उलगडा होत नाही तो देव. जे समजत नाही तो देव. वेदात कृष्ण, राम, विठोबा, महालक्ष्मी, टेंबलाई, मरिआई अशा कोणत्याही देवता नाहीत. सूर्य, चंद्र, पाऊस, वारा, अग्नी असे देव आहेत. पाऊस का पडतो हे कळत नव्हते म्हणून पावसाचा देव झाला. सूर्य काय आहे हे, माहीत नव्हते म्हणून सूर्य देव झाला. विज्ञानाच्या प्रगतीमुळे हे आता कळते म्हणून पावसाचा देव गेला. सूर्याची उष्णता समजली; पण नवे देव आले. विज्ञानाची प्रगती होत असताना देवांची संख्या वाढली. असे का?

विज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर जीवनातील अशाश्वती वाढली. विज्ञानाचा वापर करणे वेगळे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असणे वेगळे. विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे; परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार होत नाही. आपल्या समाजाचे धुरीण, पुढारी पाऊस पडावा म्हणून यज्ञ करतात, विश्वशांती व्हावी म्हणून यज्ञ करतात.

यज्ञ करणारे धंदेवाईक भोंदू तयार होतात. यज्ञ करणे हा त्यांचा पोटापाण्याचा धंदा आहे. ते भ्रम पसरवितात. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार कमी होतो. यज्ञाचा प्रसार जास्त होतो. देव, परमेश्वर, स्वर्ग, नरक या भ्रामक कल्पना खूप जुन्या आहेत. या भ्रमाने निर्माण केलेली समाजमनातील भ्रामक जाणीव खूप जुनी आहे. तुलनेने, विज्ञान व वैज्ञानिक जाणीव नवी आहे. विज्ञानाचा प्रसार कमी आहे. देव, स्वर्ग यांचा प्रसार तुलनेने कितीतरी जास्त आहे.

वैज्ञानिक जाणिवा वाढणार कशा, हा प्रश्न आहे. डॉ. सुभाष के. देसाई यांचे हे पुस्तक वैज्ञानिक जाणीव वाढवायला मदतकारक होऊ शकते म्हणून मी त्याचे स्वागत करतो. या पुस्तिकेतील सारीच विधाने सर्वांना मान्य होतील असे नाही. तसे होण्याची गरजही नाही. वाचक चिकित्सा करू लागला की पुरे. ही चिकित्साच योग्य जाणीव तयार करायला मदत करेल.

जगातील प्रत्येक देशात ज्याचे अनुयायी आहेत, तो कार्ल मार्क्स धर्माविषयी काय म्हणाला हे समजावून घेणे अनाठायी ठरणार नाही.

कुणाला धाडसी किंवा उद्धटपणाचे वाटेल. तरीसुद्धा एक विधान करावेसे वाटते की, मार्क्स, एंगल्स, लेनिन यांच्या धर्मविषयक विचारांचे यथायोग्य आकलन समाजात आणि अगदी अनेक विचारवंतातसुद्धा नीटपणे झालेले दिसत नाही. मार्क्स, एंगल्स, लेनिन यांच्या अनुयायांत आणि विचारवंतातही या बाबतीत बऱ्याच प्रमाणात गोंधळ आहे. या गोंधळाची अनेक कारणे आहेत. 'धर्म ही अफूची गोळी आहे', हे मार्क्सचे लोकप्रसिद्ध विधान घ्या. वास्तवात या विधानाला चिकटूनच त्याच्या लगत मार्क्सने इतर काही विधाने केलेली आहेत. योग्य

आकलनासाठी ती सर्व एकत्र वाचली पाहिजेत, संदर्भ लक्षात घेतला पाहिजे, त्या लिखाणाचा हेतू लक्षात घेतला पाहिजे. तसे न करता एवढे एकच विधान बाजूस काढून मांडले जाते. त्यानेही भरपूर गोंधळ केलेला आहे.

'धर्म म्हणजे दु:खीतांना दिलासा आणि शोषितांचा विश्वास असतो. निष्प्राण बनलेल्या जीवनात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य धर्म करतो. धर्म म्हणजे निरुत्साही परिस्थितीतला उत्साह आहे. धर्म म्हणजे दु:खी जगातील दु:ख विसरायला मदत करणारी अफूची गोळी आहे...'

'धर्माच्या रूपाने मिळणाऱ्या काल्पनिक सुखातून पीडितांना बाहेर काढल्याखेरीज त्यांना खरे सुख मिळणार नाही. ज्या दुर्गंधीयुक्त दु:खी परिस्थितीतुळे धर्माची आवश्यकता निर्माण झाली ती दुर्गंधीयुक्त, क्लेशकारक आणि हताश वास्तव परिस्थिती नाहीशी करणे हाच धर्माचे काल्पनिक सुख नाहीसे करण्याचा खरा मार्ग आहे...'

'... केवळ टीका करून धर्मभावना नाहीशा करता येणार नाहीत. त्यासाठी ज्या परिस्थितीमुळे या धर्मभावना उद्‌भवल्या व टिकवल्या ती परिस्थितीच नाहीशी करावी लागेल.'

डॉ. सुभाष के. देसाई यांच्या या पुस्तिकेचा पुरस्कार मी एवढ्यासाठी करतो की, हे पुस्तक वाचकांना चिकित्सा करायला प्रवृत्त करू शकेल. धर्माचीही चिकित्सा करायला पाहिजे. प्रत्येक जाणिवेची चिकित्सा करायला हवी. भ्रमावर आधारलेली, परंतु वास्तवात परिणाम करणारी धर्म-देव-स्वर्ग-नरक या जाणिवांची चिकित्सा व्हयला हवी.

**- गोविंद पानसरे**
कोल्हापूर.



# १. पावित्र्याची भावना

(The Concept of Sacradness)

सामुहिक भावना किंवा मानसिक भावनेवर जेव्हा बुद्धीपेक्षा भावनेचा प्रभाव जाणवतो (Sentiment) तेव्हा त्याचे विश्लेषण, पृथ्थकरण केल्यावर पावित्र्याची (Sacradness) भावना काय आहे हे समजता येणे शक्य आहे. कारण, पावित्र्याच्या वैशिष्ट्यावर, गुणधर्मावर, नैतिक गोष्टी, घटना अवलंबून असतात त्या स्पष्ट करता येतील.

समाजातील विविध तऱ्हेचे धार्मिक, जातीय तणाव आणि संघर्ष यामुळे सामाजिक अस्वस्थता अनुभवास येते. यामध्ये अनेक युद्धांपेक्षासुद्धा माणसांची आणि माणुसकीची होळी झाल्याचे दिसून येते. जगभर विविध धर्मांचे स्वरूप बदलत असले तरी त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्या वर्षानुवर्षे त्याच आहेत. या समस्यांमुळे समाजाला किंवा मानवजातीला एक आजारपण आले आहे. हे आजारपण वैज्ञानिक किंवा तांत्रिक प्रगतीने नाहीसे होणारे नाही. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर मानवजात असतानादेखील या आजारावर काही उपाय सुचू शकेल का, असा एक विचार सतत मनामध्ये तरंगत असे. कन्याकुमारी ते कैलास मान सरोवरापर्यंत अनेक धार्मिक स्थळे, व्यक्ती यांच्या सान्निध्यात जाऊन आणि विविध धर्मग्रंथांचा अभ्यास करून या प्रश्नावर काही उत्तर मिळते का, याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला. धार्मिक लोक, धार्मिक स्थळे आणि धर्मग्रंथ हे नव्या पिढीला प्रेरणा देणारे, मार्गदर्शन करणारे, दिशा दाखवणारे म्हणून कितपत उपयोगी आहेत, याचाही विचार करण्याची मला आवश्यकता वाटली. सामुदायिक भावनांचे विश्लेषण करताना पावित्र्याच्या भावनेचा आणि नैतिकतेचा जवळचा संबंध आहे हे माझे गृहीत तत्त्व (Hypothesis) आहे.

पावित्र्याच्या भावनेचे प्रकटीकरण (१) व्यक्ती (२) समाज (३) धार्मिक

ठिकाणे (४) धार्मिक नेते (५) धर्मग्रंथ या माध्यमांतून होत असते. त्यामुळे व्यक्ती जेव्हा या वरील माध्यमांशी अंतरक्रिया (Interaction) करते, तेव्हा तिच्यातून नैतिकतेशी संबंधित कृती घडते. म्हणून साधारणपणे या कृतीचा विचार चार दृष्टिकोनातून करण्याचा मी प्रयत्न केला आहे. (अ) कायदा, राज्यघटनेच्या दृष्टिकोनातून (ब) सामाजिक दृष्टिकोनातून (क) आर्थिक दृष्टिकोनातून (ड) शैक्षणिक दृष्टिकोनातून

पहिल्या दृष्टिकोनाचा विचार करताना भारतीय राज्यघटनेचा मी विचार केला आहे. उदा. सामाजिक दृष्टिकोनाचा विचार करताना युरोपमध्ये फिरल्यानंतर धर्म या संकल्पनेव्यतिरिक्त असणारी समाजरचना मला विचारात घ्यावी लागली तर मार्क्स लेनीनपासून एमएन. रॉयपर्यंत धर्मविरहित समाजरचनेची कल्पना डावलता येत नाही. त्याचप्रमाणे हिंदू, ख्रिश्चन, मुसलमान, जैन, बुद्ध या धर्मांप्रमाणे वर्तन करणाऱ्या व्यक्तींचाही विचार करावा लागतो. आर्थिक दृष्टिकोनामधून बघताना धार्मिक व्यक्ती व धार्मिक स्थळे या ठिकाणी दान वा देणगी स्वरूपात जमा होणारा प्रचंड पैसा याचा विचार करणे भाग पडते. त्याचप्रमाणे धर्माच्या नावावर पैशाचा होणारा दुरुपयोग हा माझ्या नजरेत भरला आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पाहताना असे दिसले की, व्यक्तिगत पातळीवर कुटुंब, शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये किंवा व्यापार व उद्योगाची केंद्रे यातून नैतिक शिक्षणाचे समूळ उच्चाटन झाले आहे.

द. भारताच्या प्रवासामध्ये घडलेली एक घटना माझ्या या संशोधनामागची प्रेरणा आहे. रामेश्वरला गेलो तेव्हा मंदिराच्या मुख्य कमानीवर स्वामी विवेकानंदांचे वाक्य कोरलेले दिसले. ते माझ्या मनावरही कायमचे कोरले गेले ते असे होते, 'Religion does not consists in temples, nor in religious ceremonies but it consists in pure and sincere hearts.' (धर्म हा मंदिरामध्ये किंवा धार्मिक उत्सवामध्ये नसतो. तो व्यक्तीच्या प्रामाणिक आणि शुद्ध हृदयामध्ये नांदतो.



हे स्वामी विवेकानंदांचे विधान व्यक्तिगत श्रद्धेच्या दृष्टीतून आणि स्वानुभवातून मला पूर्णपणे पटले होते; परंतु त्याची सत्यता आजच्या काळात समाजापुढे मांडताना ती नव्या संदर्भात अभ्यासण्याची मला गरज वाटली. या विचारमंथनाचा, संशोधनाचा व निष्कर्षाचा लाभ विविध धर्मातील तरुण पिढीला व्हावा हा उद्देश धरून देशातील दहा प्रमुख राज्यांचा दौरा केला आणि महाराष्ट्र राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये अभ्यास केला. या दहा राज्यांमध्ये जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, दिल्ली, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि पूर्व बाजूला पं. बंगाल, आंध्र, ओरिसा आणि कर्नाटक ही राज्ये घेतली तर महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली, सातारा, रायगड, मुंबई, सोलापूर, सिंधुदुर्ग, लातूर, पुणे, बुलढाणा, जळगाव, उस्मानाबाद या जिल्ह्यांचा समावेश होतो.

१९९२ पासून १९९७ अखेर माहिती गोळा करण्याचे काम चालले. पाच धर्मांतील दोन हजार स्त्री-पुरुषांना प्रश्नावली देण्यात आली. त्यापैकी पाचशे फॉर्मस् व्यवस्थित भरलेले उपलब्ध झाले. फॉर्म व्यतिरिक्त काहींनी आपली मते सविस्तर जादा लिहून दिली. यामध्ये एकशे साठ स्त्रिया व तीनशे चाळीस पुरुष होते. त्याची विभागणी खालीलप्रमाणे:

वयोगट पंचवीसपर्यंत व पंचवीसनंतर, साक्षर आणि निरक्षर. प्रश्नावलीमध्ये व्यक्तिगत स्वरूपाचे नऊ प्रश्न होते. सामाजिक संदर्भातील दहा, धार्मिक व्यक्ती संदर्भात सहा आणि धर्मग्रंथ सात असे एकूण बत्तीस प्रश्न होते. होय/नाही आणि सांगता येत नाही किंवा इतर स्वरूपाचे उत्तर अशी उत्तरांची विभागणी केली होती.

१९९० ची जनगणना आधारभूत धरण्यात आली होती.

# २. कायद्याच्या दृष्टिकोनातून हिंदू कायदा

हिंदू कायदा हा वास्तविक हिंदू शास्त्र ग्रंथातून प्रगट झालेला आहे. त्याचे धार्मिक स्वरूप हे अँग्लो इंडियन गैरसमजातून निर्माण झालेले नाही. के. व्ही. रंगास्वामी अय्यंगार यांच्या मते, 'धर्मशास्त्र' हे एक व्यापक नियम आहेत. निसर्गाच्या अपरिवर्तनीय रचनेशी जुळणारे असे मानवी वर्तन असावे यासाठीही नियम आहेत. त्यांचे पालन केल्याने मानवी जीवनाचे सार्थक होते. यामध्ये मानवाचे सारे आयुष्य हे व्यक्ती आणि समाजाचा एक भाग या रीतीने विचारात घेतले जाते. त्याचप्रमाणे मानवाचे आपल्या इतर मानवाशी, सजीव, निर्जीवाशी, अतिंद्रिय जीवाशी, विश्वाशी आणि साधारणपणे अंतर्मल ईश्वराशी असणाऱ्या नात्याचा ऊहापोह धर्मशास्त्रामध्ये केला जातो. त्यामध्ये मानवाची काही कर्तव्ये सांगितली जातात. उदा. व्यक्तिगत आचार, दुसऱ्याच्या भल्यासाठी काम करणे, जिवंत असणाऱ्यांसाठी आणि मरणोत्तर जीवासाठी, हयात असणारे आणि अजून जन्माला यायचे आहेत अशांसाठी काही कर्तव्ये असतात. ती धर्मशास्त्रात सांगितलेली असतात. वरील विवेचनावर थोर प्राचीन अधिकारी व्यक्ती कुमारी भट्ट यांच्या विचारांचा प्रभाव आढळतो. साधारणपणे दीड हजार वर्षांपूर्वी त्यांनी धर्माची व्याख्या केली आहे, तोच धर्मशास्त्राचा गाभा आहे. त्यांनी सांगितले की, 'धर्मपालन' हे केवळ भौतिक उद्देशासाठी नसून अतिंद्रिय स्वरूपाचा आनंद मिळावा यासाठीही असते. त्यांच्या मते ज्या कृती-प्रकृती स्वास्थ्यासाठी, सुखासाठी किंवा भौतिक गोष्टींच्या प्राप्तीसाठी केल्या जातात त्यांना धर्म म्हणता येणार नाही.

भारतीय परंपरेत मनूने (VIII 15) असे म्हटले आहे की, धर्म नष्ट झाला तर आम्ही नष्ट होऊ म्हणून धर्म नष्ट करता कामा नये. यातूनच पुढे कायद्याची कल्पना, नियमांच्या अंमलबजावणीची कल्पना पुढे आली. त्यामुळे व्यक्तीच्या वर्तणुकीला नियमितपणा येण्यास मदत झाली, अधिकार,



स्वातंत्र्य, हितसंबंध, इच्छा यांच्यावर मर्यादा आल्या, व्यक्ती-व्यक्तींमधल्या संघर्षाची कारणे यांच्यावर वचक राखून सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून नियम तयार होऊ लागले त्यामुळे व्यक्ती आणि समाज दोहोंचे जीवन शांततेत जाण्याची शक्यता निर्माण झाली. धर्माच्या विरोधातील वर्तन अधर्म असून ते व्यक्ती व समाजाला घातक आहे असे मानले जाऊ लागले. सामाजिक उत्क्रांतीमध्ये राजा ही कल्पना पुढे आली आणि तो कर वसूल करू लागला. लोकांना कामे नेमून देऊ लागला. लोकांचे संरक्षण करणे व अधर्माने वागत असलेल्यांना शिक्षा करण्याचे अधिकार राजाला प्राप्त झाले. अशा रीतीने नागरी आणि फौजदारी कायद्याची प्रगती होत गेली. राजाची सत्ता, कर्तव्ये आणि जबाबदारी स्पष्ट होत गेली. त्याला 'राजधर्म' असे म्हणत.

मनू म्हणतो, 'वेद हे कायद्याचे उगमस्थान आहे.' याज्ञवल्क्य १-७ वेद, स्मृती, सद्वर्तन, सदसद्विवेक बुद्धीला स्मरून चांगल्या उद्देशाने केलेला विचार आणि कृती ही कायद्याची उगमस्थाने होत. यातूनच कायदा निर्माण होतो.

गौतम म्हणतो, (पा. २३४-१९-२०) 'न्यायाचा अर्थ वेदांनी सांगावा आणि पवित्र कायद्याची अंमलबजावणी वेदांगांनी आणि पुराणाने करावी.' चांगल्या प्रथा आणि चांगल्या उद्देशाच्या गोष्टी समाजहिताच्या दृष्टीने कायद्याने मान्य केल्या.

मनुस्मृती ही याज्ञवल्क्यापेक्षा प्राचीन असून ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकाच्या दरम्यान निर्माण झाली असावी. नारद, बृहस्पती, कात्याना, अंगीरा, पितामह, यम, व्यास, समवार्ता हरिता, विज्ञानेश्वर, कमलाकर भट्ट आदींनी भारतीय धर्मशास्त्रातील विविध अंगांचा विकास केला. यांच्या व्यतिरिक्त अनेकांनी धर्मशास्त्रावरती लिखाण केले. त्यांनी नागरी कायदे, धर्म आणि नैतिकता यावरती लिहिले आहे. अर्थात, या सगळ्या लिखाणामध्ये धार्मिक कर्मकांडांवर अधिक भर दिला आहे, समारंभ आणि व्रतवैकल्ये यांना प्राधान्य दिले आहे. धर्मशास्त्रावर लिहिणाऱ्या साऱ्यांनीच नैतिक गुणांना प्राधान्य देऊन त्यावरच भर दिला आहे.

पुढे ब्रिटिश काळामध्ये विसाव्या शतकातील पहिल्या तीन दशकांत युरोपियन ब्रिटिशांनी गुन्हेगारीच्या कायद्यामध्ये ब्रिटिश आणि भारतीय यांच्यात भेद केला आहे. गुन्हेगारी कायदा ४४३ कलम हे १९२३ पूर्वी अस्तित्वात होते. त्यानुसार ब्रिटिशांच्यावरील खुनासारख्या केसेस भारतीय न्यायाधीशांना चालवता येत नव्हत्या आणि जरी सेशन सत्र न्यायधीश (जज्ज) ब्रिटिश असला तरी त्याला ब्रिटिशाला एक वर्षापेक्षा जादा शिक्षा देता येत नसे; मात्र भारतीय गुन्हेगाराला या सवलती धर्मशास्त्राआधारे वा ब्रिटिश कायद्यानुसार मिळत नसत.

(Prosection System in India by Vijay Kumar. Dewan Capital Law House, New Delhi.)

हिंदू विचार परंपरेत हिंदू कायदा हा अनंत अशा ईश्वरी शक्तीचा विचार करतो आणि त्या व्यापक पार्श्वभूमीवर नैतिकतेचा विचार केला जातो; मात्र भौतिक आणि क्षणभंगूर अशा स्वरूपाच्या गोष्टींचा फारसा विचार केला जात नाही. भारतीय दृष्टिकोनातून सर्व वर्तनाचा विचार अतिंद्रिय जगताशी शक्तीच्या संदर्भात केला जातो. या ठिकाणी धर्म आणि नैतिकता यांचा संगम होतो. त्यामुळेच या दोन्हींच्या अस्तित्त्वाला संस्कृतमध्ये 'धर्म' हा शद्ब योजलेला आहे.

आजच्या आधुनिक काळात धर्मनिरपेक्षतेचा उदो उदो होताना धर्म नैतिकता या गोष्टी टाकाऊ वाटण्याची शक्यता आहे; पण परंपरागत हिंदू दृष्टिकोन मात्र भिन्न आहे. नैतिकतेला आधार लाभण्यासाठी बळ प्राप्त होण्यासाठी अतिंद्रिय शक्तीची मान्यता आवश्यक ठरते.

धर्म, नियम, कायदा आणि कर्तव्ये ही सुशिक्षित असा ब्राह्मण समाज इतर जाती-जमातींना शिकवत असे. त्यांची भूमिका एखाद्या शिक्षकासारखी होती. जवळून पाहताना, धर्मशास्त्राचा अर्थ स्पष्ट करताना वर्तनातील विविध पोटभेद निर्माण होत गेले; मात्र मोझेशच्या आशा किंवा शरीयत यांच्या नियमामध्ये फरक झाला नाही. प्राचीन काळातील मनू या ऋषीने या धर्मशास्त्राला एक विशिष्ट आकार दिला आणि अशा रीतीने



हिंदू धर्मशास्त्र प्रगत होत गेले. हिंदू धर्मशास्त्र खालील आठ विधानांआधारे प्रगत होत गेले.

(१) जग पर्जन्यावर अवलंबून आहे आणि पर्जन्य यज्ञावर अवलंबून आहे.

(२) वेद हे अमर आहेत आणि आस्तिक वा नास्तिक दोहोंनीही यज्ञ करावा.

(३) यज्ञाचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे.

(४) समाजधारणेसाठी शासनव्यवस्था आवश्यक आहे.

(५) चातुवर्णाच्या आधारे समाजकार्य करावे.

(६) आदर्श ब्राह्मणांच्या पालनपोषणास योग्य असे नियम कायदे निर्माण करावेत.

(७) न्यायदान पद्धत सत्यावर आधारीत व निरपेक्ष असावी.

(८) कर्मसिद्धांत, पुनर्जन्म, स्वर्ग-नरकाची कल्पना आणि त्याद्वारे शासन वा प्रगती व सुख अवलंबून आहे, अशी शिकवण दिली जावी.

वरील आठ विधानांवर आधारित हिंदू धर्मशास्त्र चालत आले. बिटिश काळापर्यंत या दृष्टिकोनाला कोणीही आव्हान दिले नाही. हिंदू किंवा ईस्लाम शास्त्रांना बौद्धिक दृष्टीतून आव्हान दिले गेले नव्हते. हिंदू व ईस्लाममध्ये सांस्कृतिक साधर्म्य होते; मात्र बुद्धिवाद आणि उपयुक्ततावाद यावर आधारीत अठराव्या शतकातील ख्रिश्चन राज्यकर्त्यांनी भारतीय इतिहासापुढे काही आव्हाने उभी केली. हिंदू व मुसलमान धर्मशास्त्राशी लोकांच्या पवित्र भावना जोडल्या गेल्या होत्या. वेद हे अपरिवर्तनीय होते आणि नैतिकतेला महत्त्वाचे स्थान होते. या पार्श्वभूमीवर हिंदू-मुसलमानांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा मार्ग शोधणे हे ब्रिटिशांच्या पुढे मोठे आव्हान होते.

**धर्मभावनांचे संरक्षण :**

धर्मभावनांचे संरक्षण घटनेमध्ये पंचविसाव्या कलमामध्ये वर्णिलेले आहे. भारतामध्ये धार्मिक भावना दुखावल्याचे प्रकार खूप कमी होतात.

मस्लिम किंवा ख्रिश्चन आपापल्या धर्मपद्धती आचरू शकतात किंवा त्याचा प्रसार करू शकतात. तथापि, इंडियन पिनल कोड २९८ व्यक्तीच्या भावनांचे संरक्षण करते तर २९५-ए विशिष्ट जातीं-धर्मांचे संरक्षण करते. १९५ कलमामध्ये असे म्हटले आहे की, जो कोणी पूजेचे स्थान उद्ध्वस्त करेल किंवा मोडतोड करेल किंवा विशिष्ट वर्गाने पूज्य मानलेली एखादी वस्तू मोडेल, ज्यामुळे विशिष्ट वर्गाचे किंवा लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील किंवा लोकांच्या भावना दुखावणार हे माहीत असून जर एखाद्याने तशी कृती केली, तर त्या गुन्ह्यासाठी दोन वर्षांची शिक्षा आणि दंडही लागू केला जाऊ शकतो.

अशा तऱ्हेच्या अनेक गुन्ह्यांमध्ये वास्तविक खऱ्या धर्माचा काहीच संबंध येत नाही; परंतु त्यांचे स्वरूप जातीजातीतील भांडणे किंवा आर्थिक हितसंबंध असे असते. याचे उदाहरण म्हणजे-

(१) शिवशंकर विरुद्ध सम्राट ही केस. या केसमध्ये धर्माकडे पाहण्याची कायद्याची दृष्टी आपल्याला दिसते. अर्थात ही फक्त जातीय स्वरुपाची केस होती. यामध्ये 'आहीर' जमातीच्या शूद्र लोकांनी द्विज (ब्राह्मण) लोक वापरतात तसा पवित्र धागा (जानवे) वापरले. ब्राह्मण लोकांनी तो तोडला. या केसमध्ये एका इंग्लिश न्यायाधीशाने हा वरील कलमाखाली गुन्हा होत नाही असा निकाल दिला. यामध्ये एकाच धर्मातील काही लोकांनी (ब्राह्मण) केलेली कृती ही धर्माचा अपमान करणारी ठरत नाही.

(२) दुसऱ्या एका वीरभ्रदन चेटिया विरुद्ध रामस्वामी केसमध्ये अनेक हिंदू पवित्र मानत असलेल्या गणेशमूर्तींची नासधूस काही राजकीय पुढाऱ्यांनी केली. स्थानिक न्यायाधीशांनी गुन्हेगाराला निर्दोष सोडले. आपल्या निकालात असा दृष्टिकोन घेतला की, हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे ती मूर्ती नव्हती; कारण त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झालेली नव्हती. त्यामुळे एखाद्या मुद्रणालयातील चित्राइतके किंवा एखाद्या दुकानातील शोकेसमधल्या बाहुली इतकेच त्याला महत्त्व होते; परंतु सर्वोच्च न्यायालयाने वेगळा निकाल दिला.



खालच्या कोर्टाने घेतलेला शास्त्राधार मानला नाही. उलट नष्ट केलेली मूर्ती ही अनेक लोक पवित्र मानत. पावित्र्याच्या भावना त्या मूर्तीभोवती केंद्रित झाल्या होत्या आणि त्या दुखावण्याच्या हेतूने केलेली कृती ही गुन्हा ठरली. या निकालातून हे स्पष्ट होते की, पुस्तकी ज्ञानापेक्षा लोकांच्या प्रत्यक्षातील भावना अधिक महत्त्वाच्या आहेत. अर्थात, हीच मूर्ती एखाद्या हिंदू पुजाऱ्याने वा पंडीताने नष्ट करताना असे म्हटले असते की, हिंदू धर्म मुर्तिपूजा मानीत नाही म्हणून मूर्ती फोडली. अशावेळी २९५ आय.पी.सी.नुसार त्या कृतीमागचा हेतू सिद्ध केल्याशिवाय गुन्हा शाबीत होत नाही.

घटनेच्या २५ आणि २६ कलमांचा अर्थ धार्मिक स्वातंत्र्य. एका केसचा निकाल देताना मुख्य न्यायाधीश छगला यांनी स्पष्ट केला आहे, तो असा,

(अ) 'असे म्हणता येईल की, २५ आणि २६ कलमांमध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ धर्मनिरपेक्ष राज्याच्या संदर्भात करायला हवा. याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ धर्मनिरपेक्ष राज्याच्या संदर्भात करायला हवा. याचा अर्थ असाही नव्हे की, प्रत्येक धार्मिक कृतीला घटनेने संरक्षण दिलेले आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक धार्मिक कार्यामध्ये घटनेला हस्तक्षेप करता येत नाही असे नाही. कलम २५ आणि २६ मध्ये वापरण्यात येणारा धर्म हा शब्द मूळ शब्दशास्त्राप्रमाणे (etymology) घ्यायला हवा. मानव आणि त्याचा निर्माता यांना जोडणारा तो धर्म; परंतु सोमय्या हे आपल्या पक्षकाराच्या वतीने आपला मुद्दा मांडताना म्हणतात की, जैन धार्मिक लोक निर्माता मानीत नाहीत. त्यामुळे वरील स्पष्टीकरण जैनांना लागू होत नाही; परंतु माझ्या मते, निर्माता न मानणाऱ्या धर्मालासुद्धा सदसद्विवेकबुद्धी मान्य आहे आणि नैतिक मूल्ये मान्यच असतात. त्यामुळे माणसाला जे जे या सदसद्विवेक बुद्धीला बांधते आणि जी नैतिक तत्त्वे माणसाचे जीवन नियंत्रित करतात, त्यातूनच धर्म बांधला जातो आणि असाच धर्म भारतीय घटनेला अभिप्रेत आहे.

मानवाच्या प्रत्येक कृतीचा संबंध धर्माशी लावता येईल; परंतु याचा अर्थ प्रत्येक धार्मिक कृतीला घटनेचे संरक्षण आहे असा काढणे चुकीचे आहे. त्यामुळे कलम २५ व २६ चा आधार घेऊनच धर्माचा अर्थ स्पष्ट करावा लागतो.

धार्मिक गोष्ट कुठली आणि अधार्मिक कोणती यातील सीमारेषा दाखवणे फार कठीण आहे. भारतीय घटनाकारांनी धर्माची व्याख्या केलेली नाही असे काहींचे मत आहे. त्यामुळे धर्माची व्यापक व्याख्या करणे कठीण आहे. सर्व प्रकाराच्या लोकांना धर्म हा शब्द लागू होत नाही. या ठिकाणी हे विसरता कामा नये की, धर्म हा नेहमीच ईश्वर मानणाराच असतो असे नाही. उलट भारतामध्ये बुद्धिझम आणि जैनीझम ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवत नाहीत. विश्वास आणि शास्त्र यावर धर्माची इमारत उभी राहते. मुंबई हायकोर्टाच्या एका प्रख्यात न्यायाधीशाने असे सुचविले आहे की, धार्मिक गोष्टी म्हणजे धार्मिक श्रद्धा आणि विश्वासाच्या गोष्टी होत. धर्म म्हणजे केवळ मत, शास्त्र किंवा श्रद्धा नव्हे. त्याला एक कृतीवाटे प्रगट होणारे बाह्य स्वरूप असते. एका निकालात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, जैन धर्मामध्ये देव, द्रव्य किंवा धार्मिक संपत्ती विनियोग जैन धर्माने पवित्र मानलेल्या गोष्टींव्यतिरिक्त इतर कामासाठी वापरणे गैर आहे. एखादा ट्रस्ट ज्या उद्देशासाठी स्थापन केलेली असते त्या व्यतिरिक्त ट्रस्टचा पैसा खर्च करणे चुकीचे आहे.

वरीलप्रमाणे धर्माचा विश्वास आणि आचार याप्रमाणेच घटनेने सर्वसामान्यपणे गृहीत धरलेल्या तत्त्वाला संरक्षण दिलेले आहे. ते तत्त्व म्हणजे धर्मकार्यासाठी अर्पण केलेला पैसा त्याच्याशिवाय इतरत्र वापरू नये.

**२९५ कलम**

या कलमानुसार जो कोणी लोकांच्या दृष्टीने पवित्र मानली गेलेली वस्तू किंवा पूजेचे स्थान हे उद्ध्वस्त करेल किंवा त्याचे नुकसान करेल तर तो गुन्हा होतो का, याचा विचार या कलमामध्ये केला आहे. यामध्ये



महत्त्वाचा एक भाग म्हणजे या कृतीमागचा उद्देश अशा विध्वंसापासून किंवा नुकसानीतून विशिष्ट लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात हे माहीत असून जर हेतुपूर्वक अशी कृती केली असेल, तर तो गुन्हा ठरतो आणि त्याला दोन वर्षांची शिक्षा आणि तुरुंगवास होऊ शकतो.

**पूजास्थान :** पूजास्थानाचा अर्थ एखादी भौतिक वस्तू नव्हे, तर त्या वस्तूशी निगडीत पूजेची कृती आवश्यक असते आणि विधीनुसार त्या वस्तू, पूजेची वस्तू हे मानले गेले असले पाहिजे. पूजेची वस्तू याचा अर्थ सजीव की निर्जीव. उदा. महंत यावर कोटीची मते भिन्न आहेत; परंतु पूजा वस्तू हा शब्द मूर्तीसारख्या निर्जीव वस्तूपुरता मर्यादित राहतो.

अशा हिंदू देवालयांमध्ये पादत्राणे घालून जाणे हा धार्मिक अपमान ठरतो, पण जर त्यामागे तसा उद्देश नसेल तर तो गुन्हा ठरण्यास पुरेसे कारण ठरत नाही. यामध्ये लोकांच्या दृष्टीने म्हणजे विशिष्ट समूहाची लोकसंख्या कितीही मर्यादित असू दे, पण त्यामध्ये एक किंवा दोन व्यक्ती असता कामा नयेत.

**व्याप्ती -**

वरील कलमामध्ये हेतुपूर्वक विध्वंस किंवा पूजास्थानाचा अपमान केला तरच तो गुन्हा ठरतो. त्यामध्ये विशिष्ट समूहाच्या लोकांना ती कृती अपमानास्पद वाटणार आहे याची जाणीव असताना हेतुपूर्वक धार्मिक भावना दुखावल्या तर तो दखलपात्र गुन्हा ठरतो.

**अपमानाचा उद्देश -**

या साऱ्या कृतीमागे पहिली गोष्ट कोणती असेल तर उद्देश. आपली कृती ही अपमानास्पद ठरेल याची किंचितशी जाणीव असणे पुरेसे आहे. अर्थात ही गोष्ट कृतीवरून समजू शकते. त्याचप्रमाणे इतर परिस्थितीवरून, उच्चारलेल्या शब्दावरून, केलेल्या हावभावांवरून, दिलेल्या धमकीवरून किंवा व्यक्त केलेल्या निष्कर्षावरून अपमानाचा उद्देश स्पष्ट होतो. थोडक्यात ज्यामधून उद्देश स्पष्ट होईल ती गोष्ट महत्त्वाची.

उदा. एका केसमध्ये एका हिंदूने आपल्या घराचे वासे सोयीसाठी व आधारासाठी शेजारच्या मशिदीच्या भिंतीमध्ये घुसवले होते. त्यामुळे मशिदीचे नुकसान झाले आणि आमच्या धार्मिक भावना दुखावल्या म्हणून या गुन्ह्याबद्दल त्याला शिक्षा व्हायला हवी अशी केस होती.

गुन्ह्याच्या व्याख्येमध्ये कृतीमागचा उद्देश किंवा ज्ञान हा महत्त्वाचा भाग असल्याने गुन्हा नोंदवणाऱ्याची जबाबदारी असते तसा त्याने गुन्ह्यामागचा उद्देश सिद्ध करायला हवा. त्या दृष्टीने वरील केसमध्ये न्यायाधीशांनी हिंदू आरोपीला दोषमुक्त केले; कारण मशिदीच्या भिंतीमध्ये वासे घुसवण्याचा त्याचा उद्देश झोपडीला आधार व पर्यायाने त्याच्या जगण्याच्या धडपडीतील तो एक भाग होता. मुसलमानांच्या भावना दुखावण्याचा त्याचा हेतू नव्हता.

हिंदू एखाद्या दगडाला शेंदूर लावून ती जागा किंवा वस्तू पवित्र असे मानतात, तर मुसलमान लोक हिरवा झेंडा एखाद्या कबरेवर किंवा दर्ग्यावर किंवा त्यांना पवित्र असणाऱ्या एखाद्या ठिकाणी लावतात. जगभर सर्वच ठिकाणी स्मशानभूमी किंवा कबरस्ताने किंवा चर्च यार्ड या गोष्टी पवित्र मानलेल्या असतात. त्यामुळे कायद्याच्या दृष्टीतून त्यांना (sacred) पवित्र मानले जाते. गंगा किंवा नर्मदा यासारख्या नद्यांचे पाणी हे हिंदूंना पूजनीय, पवित्र वाटते; मात्र असे अनेक छोटे-मोठे प्रवाह वाहत असतात तेसुद्धा पवित्र मानले जातात; परंतु या साऱ्यांबाबत कायदेशीर कारवाई करणाऱ्यावर जबाबदारी असते की, ते पूजास्थान व विशिष्ट वस्तू पवित्र आहे. एका केसमध्ये एका आरोपीने भांडण झाल्यानंतर जेवणाची पिशवी विहिरीत फेकली. त्यात मासे, मटण, भात अशा शिजवलेल्या वस्तू होत्या. त्याच्यावर विहिरीचे पावित्र्य बिघडवले अशा स्वरूपाची केस दाखल झाली; परंतु ती विहीर पवित्र मानली जात होती याला कोणताही सबळ पुरावा नसल्याने ती केस निकालात काढण्यात आली. ती केस निष्प्रभ ठरली. (waman Laxman (1893) Vnr. Cr. C. 979 Gunpatya : S.C.P.L.R. 20)



ज्या ठिकाणी लोकांच्या पावित्र्याच्या, आदराच्या भावना एकवटलेल्या आहेत ती मग उंचावरची टेकडी असो किंवा एखादा दुर्गम किल्ला असो किंवा पिंपळाचे झाड असो किंवा सरपटणारा विषारी प्राणी असो, जर अनेक लोकांच्या आदराच्या भावना त्याच्याभोवती एकवटलेल्या असतील तर ती पवित्र वस्तू होय आणि तिचा अपमान हा शिक्षापात्र ठरतो.

एखादी मशीद बांधकामानंतर समाजाला अर्पण केल्यानंतर पवित्र मानली जाऊ लागते. इस्लामी कायद्यानुसार (Mohamedun Law) ती मालमत्ता वफ्तच्या मालकीची झाल्याशिवाय ती पवित्र ठरत नाही. एखादी झोपडी एखाद्या बेवारशी शेतजमिनीवर बांधली आणि तिथे नमाज पढण्यासाठी लोक येऊ लागले तरी ते प्रार्थनास्थान होऊ शकत नाही किंवा पवित्र ठरत नाही.

पूजेचे ठिकाण हे समजल्यानंतर मुख्य प्रश्न येतो तो म्हणजे पवित्र म्हणजे काय? हे स्पष्ट आहे की, एखाद्या वस्तूची पूजा होईल किंवा होणारही नाही. एखाद्या मूर्तीची पूजा होईल आणि हिंदू माणसाला ते पवित्र वाटेल. मुसलमान व्यक्तीला कुराण पवित्र वाटेल, पण तो त्याची पूजा करणार नाही. एखाद्या वस्तूबद्दल आदर असणे, ती वस्तू पूजनीय वाटणे आणि ती वस्तू पवित्र मानणे यात फरक आहे. उदा. ख्रिश्चन लोकांची स्मशानभूमी आणि देवतेचे पूजास्थान किंवा जेथे मूर्ती ठेवलेली आहे यामध्ये फरक असतो. कायद्यानेसुद्धा अशा फरकाची दखल घेतलेली आहे. २९५ कलमामध्ये पूजेच्या वस्तूंचा विचार केलेला आहे तर २९७ कलमामध्ये स्मशानभूमीचा विचार केलेला आहे, त्यात अंत्यसंस्कारांचा आणि मानवी अवशेषांचा भाग येतो; पण व्यक्तीने कायमस्वरूपी त्याग केलेल्या वस्तू पवित्र मानता येत नाहीत.

उदा. एखाद्या मुस्लिम साधूची कबर हे आदरणीय ठिकाण असते, त्या ठिकाणी त्या साधूला दफन केले किंवा तसे मुसलमान लोक गृहित धरत असतील तरच ते ठिकाण पवित्र ठरते, अन्यथा ते पवित्र म्हणता येत नाही. लोक तेथे नमाज पढत असतील तरीही कबरस्थान पवित्र ठरत नाही. मुसलमानांच्या धर्मभावनेप्रमाणे मृत व्यक्तीसाठी अल्लाहकडे दुवा मागीतला

जात असेल तरी ती बाग किंवा जागा पवित्र मानू नये. २९७ कलम विविध जाती-जमातींच्या लोकांच्या भावनांचा आदर राखण्यासाठी बनवलेले आहे आणि वस्तूची पवित्रता जोखण्यासाठी ती एक कसोटीच आहे; परंतु जर काही लोकांचा वर्ग ते ठिकाण पवित्र मानत असेल तर मग कसे आणि का, हे प्रश्न अनावश्यक ठरतात. या कलमानुसार ती वस्तू पवित्रच ठरते.

वीरभद्र चेटी विरुद्ध रामास्वामी नायकर या केसमध्ये मद्रास हायकोर्टामध्ये या निकालवर सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की, कोणतीही वस्तू कोणत्याही वर्गाच्या लोकांनी पवित्र मानणे याचा अर्थ देवळातील फक्त मूर्ती किंवा उत्सवासाठी वापरलेली मूर्ती असा २९५ कलमाचा अर्थ लावणे चुकीचे आहे. मूर्ती हा शद्ब सर्वसाधारणपणे वापरला आहे. बायबल, कुराण, ग्रंथसाहेब हे शद्ब सामान्यपणे व्यापक अर्थाने वापरले जातात. प्रत्यक्षात एखाद्या वस्तूचे महत्त्व कमी असेल आणि तरीही कोणत्याही वर्गाच्या लोकांनी ती वस्तू पवित्र मानली तर ती २९५ कलमाखाली येते. पवित्र मानण्यासाठी त्या वस्तूची पूजा झालीच पाहिजे असा काहीच नियम नाही. त्या वस्तूची पूजा न करतादेखील ती वस्तू पवित्र ठरू शकते. गणपतीसारखी मूर्ती, तिची प्राणप्रतिष्ठा झाली नाही तरीही ती काही लोक पवित्र मानत असतील या कलमानुसार लोकसमूहाच्या पावित्र्याच्या भावना विचारात घेऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार कोर्टाने करावयाचा असतो आणि लोकांच्या धार्मिक भावनांचा आदर करावयाचा असतो. त्यावेळी कोणत्या धर्माचे वा जातीचे लोक आहेत किंवा ते साक्षर वा निरक्षर आहेत किंवा ते बुद्धिवादी आहेत किंवा नाही याचा कोर्टाने विचार करावयाचा नसतो.

अर्थात जी वस्तू पवित्र मानायची ती सजीव असावी की निर्जीव? उदा. फकीर, धर्म उपदेशक, गाय किंवा माकड. कलकत्ता आणि अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालानुसार, वस्तू हा शद्ब निर्जीव वस्तूंनाच वापरला जावा. त्याच्याबरोबर विरोधातील भूमिका पंजाबच्या मुख्य कोर्टाने घेतली होती; परंतु त्याबद्दल या कलमाच्या दृष्टीने भाष्य करण्यासारखे काही नाही. उद्ध्वस्त करणे, नुकसान करणे, अपमानित करणे हे या कलमातील शद्ब



सजीवांना वापरता येत नाहीत. ते निर्जीव वस्तूलाच वापरले जातात. उदा. मूर्ती वगैरे. त्यामुळे कायदेतज्ज्ञांनी कोणत्याही वर्गाच्या लोकांनी पवित्र मानलेल्या वस्तूंचा अपमान करणाऱ्याला कडक शिक्षा फर्मावली आहे. बनारसमधील १८०९ सालची दंगल पवित्र जागेतील गायीच्या हत्येवरून झाली. त्यात कितीतरी लोकांनी जीव गमावले. त्याचप्रमाणे बेंगलोरमध्ये मशीद अपवित्र करण्यामुळे मोठी दंगल झाली होती. हे दंगे भयानक आणि व्यापक स्वरूपाचे असतात. त्यामुळेच कायदेतज्ज्ञांनी या गुन्ह्यांना कडक शिक्षा फर्मावली आहे; परंतु नॉरिस जे यांनी दाखवल्याप्रमाणे बनारसची दंगल आणि हिंसाचार हा गोहत्येमुळे झाला नव्हता, तर पवित्र ठिकाणच्या गोहत्येमुळे झाला होता (ब) Romesh Chander Sanyal Hira Mumbai I.L.R. 17 cal. B. P. 859-60 या कलमामध्ये लोकसमूह याचा अर्थ काही लोकांचा समूह असा होतो. यामध्ये दोन व्यक्तीसुद्धा पुरेशा आहेत परंतु त्या एकाच धर्माच्या हव्यात. एका विशिष्ट धार्मिक विश्वासापोटी किंवा श्रद्धेपोटी लोक एकत्र येतात तेव्हा त्याला धर्मगट असे म्हणता येईल. त्यामुळे एखाद्या धर्माचे फार थोडे अनुयायी असले तरी २९५ कलमानुसार त्यांना आणि त्यांच्या पूजास्थानाला संरक्षण दिले पाहिजे; परंतु एखादी व्यक्ती आणि त्याचे कुटुंब २९५ कलमानुसार लोकांचा वर्ग (a class) ठरत नाही.

वर्गाविरुद्ध वर्ग (class V. class) यामध्ये एका विशिष्ट धर्माच्या व्यक्तीने त्याच धर्माच्या किंवा इतर धर्माचरण करणाऱ्या लोकांच्या विरुद्ध काही गुन्हा केला तर, त्याला २९५ कलम लागू होते, त्याचप्रमाणे एकाच धर्मातील दोन उपपंथांनाही लागू होते. उदा. इस्लाममधील शिया आणि सुन्नी पंथ, हिंदूंतील शैव आणि वैष्णव.

**उद्ध्वस्त करणे, नुकसान करणे, किंवा भ्रष्ट करणे :**

याबाबत वेगवेगळ्या कोर्टांमध्ये मतभिन्नता होती. हे शद्ब निर्जीव वस्तूसाठी वापरले जात; पण पंजाब कोर्टाने गायीसारख्या प्राण्याच्या पवित्र ठिकाणच्या हत्येबद्दल हे कलम लागू केले. त्यामुळे या कलमाचा अर्थ थोडा व्यापक घ्यायला हवा.

या कलमाची अंमलबजावणी करताना या कलमाखालचा गुन्हा हा दखलपात्र ठरतो. प्रथम किंवा द्वितीय वर्गाच्या न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हा खटला चालतो.

ही केस चालण्यासाठी खालील गोष्टींचे पुरावे आवश्यक असतात. (१) आरोपीने पूजास्थान किंवा वस्तूचे नुकसान केले असेल, (२) ती वस्तू विशिष्ट वर्गाने पवित्र मानलेली असली पाहिजे. आरोपीने त्या वर्गाच्या लोकांच्या धार्मिक भावना दुखावण्याचा उद्देश सिद्ध झाला पाहिजे आणि त्या वर्गाच्या लोकांना आपल्या धार्मिक वस्तूचा वा देवतेचा अपमान झाला आहे अशी भावना, असे ज्ञान झाले असले पाहिजे.

२९५-ए या कलमानुसार जाणीवपूर्वक, वाईट हेतूने विशिष्ट वर्गाच्या (भारतीय नागरिक) शब्दाने, वाचेने किंवा लिखित स्वरूपात किंवा खुणेने किंवा दृश्य स्वरूपाच्या प्रकटीकरणाने किंवा अन्य मार्गाने अवमान केला असेल किंवा अवमानाचा प्रयत्न केला असेल तर तीन वर्षांचा तुरुंगवास किंवा दंड अशी शिक्षा होते.

धर्म स्वातंत्र्याच्या संदर्भातील २५ आणि २६ हे कलम सार्वजनिक नीतिमत्ता आणि आरोग्य या संदर्भातच विचार करणारे आहे. त्यामुळे सार्वजनिक स्वास्थ्य किंवा सार्वजनिक सुव्यवस्था याचा प्राधान्याने विचार केला जातो. त्यामुळे भारतीय दंड विधान २९५ हे घटनेच्या एकोणिसाव्या (दुसऱ्या) उपविभागात समाविष्ट आहे. सामाजिक सुव्यवस्था याचा व्यापक अर्थ शासनाने लादलेल्या नियमांमुळे समाजामध्ये असणारे एक स्थैर्य, एक सुरक्षितता असा होतो.

**पाकिस्तान राज्यघटना आणि पावित्र्याची कल्पना :**

पाकिस्तानच्या राज्यघटनेचे स्वरूप धार्मिक आहे. अल्लाच्या नावाने, जो परोपकारी व दयाळू आहे ही घटना त्याला स्मरून लिहलेली आहे. त्यामुळे या राज्यघटनेच्या प्रास्ताविकात असे म्हटले आहे की, 'साऱ्या दुनियेवरील सार्वभौम सत्ता सर्वशक्तिमान अशा एकट्या अल्लाची आहे आणि लोकांच्याकडून उपयोगात येणारा अधिकार हा पवित्र ठेवा आहे.'



पाकिस्तानच्या राज्यघटनेची सुरुवातच मुळी अल्लाच्या नावाने होते. पाकिस्तानचे सार्वभौमत्त्व जनतेकडे नसून सर्वशक्तिमान अल्ला हा एकटाच या विश्वाचा सम्राट आहे असे आपल्या प्राकथनात घटनेने म्हटले आहे. इस्लामची सामाजिक न्यायाची तत्त्वे कोणती, हे घटनेत स्पष्ट केलेले नाही. त्याचप्रमाणे इस्लामच्या शिकवणुकीचा आणि आवश्यकतांचा परिचय करून दिलेला नाही. पाकिस्तानच्या मुसलमानांना आपले वैयक्तिक आणि सामुदायिक जीवन इस्लामच्या शिकवणुकीप्रमाणे शिस्तबद्ध करता यावे हा घटनेचा हेतू आहे. कायदे करण्याच्या तत्त्वात पहिले तत्त्व असे आहे की, कोणताही कायदा इस्लामविरुद्ध असू नये. पाकिस्तानमध्ये कोणत्याही धर्माला किंवा पंथाला बंदी नाही. घटनेप्रमाणे कोणीही आपल्या धर्माचे आचरण करावे, प्रचार करावा, संस्था काढाव्यात असा उदात्त दृष्टिकोन घटनेत मांडला आहे. या घटनेत पाकिस्तानातील मुसलमानांना पवित्र कुराणाचे व इस्लामियतेचे शिक्षण सक्तीचे करावे असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तानमधील मुसलमानांमध्ये ऐक्य स्थापन करावे आणि इस्लामप्रणीत नीतिमत्तेचे प्रमाण्य यांचे आचरण करावे असे म्हटले आहे. पाकिस्तानच्या साऱ्या घटनेत धर्मविषयक कलमे ही फक्त दहा- बाराच आहेत. याशिवाय पाकिस्तानमध्ये एक इस्लामिक संशोधन संस्था स्थापन करण्यात आली आहे व त्या संस्थेचा उद्देश खऱ्या इस्लामिक पायावर मुसलमान समाजाची पुनर्घटना करावी असा आहे. काही पाश्चात्त्य राष्ट्रात राज्यकारभारात धर्माचे अधिष्ठान आहे, पण वर्चस्व नाही; पण पाकिस्तानची स्थिती या सर्वांपेक्षा निराळी आहे.

# ३. संहिता - श्रुती - स्मृती

संहिता, ब्राह्मण्ये व उपनिषदे यांना श्रुती म्हणतात. धार्मिक बाबतीत श्रुतीच्या खालोखाल स्मृतींना प्राधान्य आहे. स्मृतिग्रंथ हे धर्मशास्त्रविषयक सिद्धांतांचे विशाल भांडार आहे. श्रुतीत धर्मशास्त्रांच्या नियमांचा उल्लेख अनुशंगिक रूपाने येतो; शिवाय ही सगळी माहिती निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेली आहे ती एकत्रीत व व्यवस्थितपणे मांडलेली आहे. आपस्तंभ व बौद्धायन यांची धर्मसूत्रे हे धर्मशास्त्रावरील प्राचीन ग्रंथ त्यांचा हेतू समयाचारिक धर्माचे म्हणजे परंपरागत वर्ण धर्माचे व आश्रमधर्माचे विवरण करणे आहे हे ग्रंथ व्यक्तीला उद्देशून रचण्यात आले असून व्यक्तीने आपल्या स्वधर्मानुसार निरनिराळ्या प्रसंगी कसे वागावे याचा त्यात ऊहापोह केला आहे. उत्तरकालीन मनू याज्ञवलक्य आदींचे धर्मशास्त्रविषयक स्मृतिग्रंथ या प्राचीन धर्मसूत्रावर आधारित आहेत. स्मृती निरनिराळ्या काळात रचल्या गेल्या. स्मृतीवरील भाषांच्या संख्येवरून तिचे प्रामाण्य ठरवायचे ही कसोटी मानली तर मनुस्मृती हीच सर्वश्रेष्ठ व सर्वाधिक प्रमाणभूत ठरते. तिच्या खालोखालचा दर्जा याज्ञवलक्य स्मृतीला आहे. धार्मिक, सामाजिक व कायद्यांच्या दृष्टीने स्मृतीला फार महत्त्व आहे. त्यामुळेच वैदिक संस्कृती व भारतीय समाज यांना प्रतिष्ठित करण्याचे श्रेय स्मृतिकारांना जाते.

अगदी अलीकडच्या काळापर्यंत किंबहुना आजही हिंदू लोक जे निर्बंध पाळून आपले जीवन आणि व्यवहार चालवित आहेत ते निर्बंध तत्त्वत: तरी मनुस्मृतीवर आधारलेले आहेत. मनुस्मृती आजवर तरी हिंदूंची आचारसंहिता बनल्याने नैतिकतेच्या बाबतीत किंवा पावित्र्याच्या कल्पनेच्या बाबतीत मनुस्मृतीतील निर्बंधांचा खोल, गहिरा परिणाम झाला आहे. त्याचप्रमाणे भारतीय धर्मशास्त्रात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ मानलेले आहेत.

गीता, महाभारत, रामायण यातील नीतितत्त्वांचा पुराणांनी प्रसार केला;



पण त्याला व्रते, तीर्थयात्रा, स्थाने व समाजसेवा यांची जोड दिली होती. मानवांच्या मनोगुणांचा विकास नीतितत्त्वाने होतो. याबाबत ह्यूएनत्संग तत्कालीन हिंदूंच्या नीतिमत्तेबद्दल म्हणतो, ''हिंदू हे उतावळ्या स्वभावाचे व अनिश्चित स्वभावाचे असूनही नीतिदृष्ट्या शुद्ध आहेत. ते कोणाची वस्तु अन्यायाने घेत नाहीत व न्यायाने द्यावे लागेल त्याहून अधिकच देतील. पापाचे प्रायश्चित्त अन्य जन्मी भोगावे लागेल म्हणून ते पापाला भितात व या जन्मी नीतिने वागण्याचा प्रयत्न करतात.

महाभारत, स्मृती व पुराणे यानी जो धर्म, जी नीतितत्त्वे सांगितली, त्यामुळे हिंदूंची धर्मावरील निष्ठा चांगलीच बळकट झाली. अशा या धर्माची परंपरा साधारणपणे १० व्या शतकापर्यंत चालू होती. पुढे या धर्मातील महातत्त्वांचा लोप झाला. त्याला अत्यंत विकृत रूप प्राप्त झाले आणि हिंदू समाजाचा ऱ्हास होऊन एकंदर भारताला पारतंत्र्याच्या नरकात पडावे लागले. (ड) महाराष्ट्र संस्कृती - पु. ग. सहस्रबुद्धे १९८९ पा. १६८-६९

भक्तिमार्गाला पुढच्या काळात जड, कर्मकांडाचे स्वरूप आले. वेदातील यज्ञ, धर्माला जसे जटील व जड रुप आले तसेच पुराणातील भक्तिमार्गाचे झाले. त्यातील चैतन्य नष्ट झाले. अमूर्त परमेश्वराचे ध्यान करता येत नाही म्हणून सगुण मूर्तींचा आश्रय करावा असे धर्मवेत्त्यांनी सांगितले पण; पुढे मूर्तीपूजा ही यज्ञप्रक्रियेप्रमाणेच जटिल होऊन तिचे अवडंबर माजले. प्रत्येक देवतेच्या आवडीनिवडी ठरल्या. फुले, नैवेद्य, अभिषेक, प्रदक्षिणा निश्चित झाल्या. त्यावर ग्रंथ झाले आणि या पूजाविधीत व प्रसाद भक्षणात जरा कोठे प्रमाद झाला तर देव कोपून शाप देऊ लागले. त्याचप्रमाणे देवांचे राग-लोभही ठरून जाऊन त्यांचे भोगविलास मानवांपेक्षाही जास्त काममोहमय होऊ लागले त्यामुळे देवस्थाने ही पुजारी लोकांची मिरासदारी होऊन सामान्य जनतेला देव अंतरला. साधा भक्तिभाव हे मूर्तिपूजेचे रूप जाऊन तिचे जड कर्मकांड झाले. व्रतवैकल्ये, उद्यापने, प्रायश्चित्ते, उपासतापास यांनाही असेच जड रूप प्राप्त झाले. यांचे महात्म्य

गाणाऱ्यांनी अगदीच ताळतंत्र सोडला. डॉ. पु. ज. सहस्रबुद्धे म्हणतात, 'ब्राह्मणांचा महिमा पुराणांना सांगावयाचा होता. चारित्र्यसंपन्न, तपोनिष्ठ ब्राह्मणांचा त्यांनी महिमा गायिला असता तर ते ठीक होते; पण व्रतांच्या उद्यापनाला ब्राह्मणांच्या गुणावगुणांची चिकित्सा करू नये असे पुराणे सांगू लागली! अध:पात याहून काही निराळा नसतो, पण पुराणांचे सर्वांत मोठे अपकार्य म्हणजे त्यांनी शैव, वैष्णव, शाक्त असे परस्पर वैर करणारे पंथ स्थापून जातिभेद, धर्मभेद यांनी विघटित होत चाललेल्या हिंदू समाजांचे विघटन पुरे करून टाकले.'

कलियुग ही कल्पना समाजालाा घातक ठरली. मनुष्य हा कालबद्ध आहे, परतंत्र आहे. त्याने कितीही पराक्रम केला तरी कलियुग हा काळच अधोगामी असल्याने त्याला कदापि यश यावयाचे नाही असा कलियुगाचा अर्थ. हीच कल्पना गेली हजारो वर्षे हिंदू समाजाच्या मानगुटीस बसलेली आहेत व त्याच्या दौर्बल्यास कारणीभूत ठरली आहेत. इतिहास पाहता इ.स. १००० च्या पूर्वी भारतात कोणत्यही धर्मशास्त्रज्ञाने ती मानलेली नाहीत. सत्य, त्रेता, द्वापर व कली ही युगनामे पूर्वीच्या ग्रंथात येतात; पण ही युगे राजाच्या कर्तबगारीवर अवलंबून असत. त्याने उत्तम दंडनीतीचा अवलंब केला तर तो कृतयुग निर्माण करील नाही तर मात्र कलियुग येईल असे महाभारत, मनुस्मृती, मेघातिथी हा नवव्या शतकातील मनूचा टीकाकार, त्यानेही युगकल्पना राजाने मानू नये कारण युगे राजाच्या नैतिक वर्तनावर अवलंबून असतात असे म्हटले आहे. तेव्हा कालप्रवाहानेच अध:पतनाला नेणारे युग म्हणजे कलियुग असा अर्थ पूर्वसुरींना मान्य नव्हता हे स्पष्ट आहे. अनेक शतकांत येथला धर्मप्रवृत्तीवादी, उत्साहदायक, बुद्धिप्रामाण्यवादी, दृष्टफलनिष्ठ, देशकाल पाहणारा, परिवर्तनशील, मानवी कर्तृत्वावर श्रद्धा ठेवणारा, नीतिनिष्ठ व समाजाची चिंता वाहणारा असा होता. आठव्या शतकात कुमारिल थट्टाने प्रवर्तित केलेल्या मीमांसा पद्धतीने या धर्माचे स्वरूप हळूहळू पालटले. शद्बप्रामाण्य, अपरिवर्तनीयता दृष्टफलद्वेष हे महादोष त्यात शिरले. आचार्य परंपरेने या



धर्माला निवृत्तीवादी बनवले. पुराणांनी त्याला जड कर्मकांडांचे निंद्य रूप दिले आणि कलिवर्ज्य प्रकरणाने कलियुगाची आत्मविश्वास नष्ट करणारी, प्रयत्नवादाची हानी करणारी कल्पना रूढ करून, पतितपरावर्तन, समुद्रगमन, सहभोजन यासारख्या पोषक धर्माचारांचा निषेध करून हिंदूधर्माला अत्यंत अधोगामी असे रूप दिले. या विकृत धर्माची तत्त्वे जसजशी हिंदू समाजाने स्वीकारली, तसतसा अध:पात होऊ लागला.

# ४. ट्रस्ट आणि चॅरिटी

समाजाची धारणा करतो तो धर्म, अशी धर्माची एक व्याख्या आहे. समाजधारणेसाठी काही लोकांनी एकत्र येऊन काही चांगले कार्य करणे ही गोष्ट प्रोत्साहन देण्यास योग्य आहे असे समजले जाते. भारतीय घटनेच्या १९ (१) सी कलमानुसार जर सात लोक एकत्र आले तर त्यांना धर्मादाय संस्था स्थापन करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ही संस्था जिवंत राहते तोपर्यंत या अधिकारात सातत्य राहते. प्राचीन भारतीय समाजपद्धती, नीतिनियम व ब्रिटिश बुद्धिवाद यांच्या मिश्रणामधून सध्या अस्तित्वात असणारी 'चॅरिटेबल ट्रस्ट' ही कल्पना विकसित झाली आहे त्यामुळे प्राचीन भारतीय समाजातील धार्मिक नियमांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक ठरते. ओघानेच धार्मिक व चॅरिटेबल उद्देश कोणते व ट्रस्ट म्हणजे काय, या मूळ प्रश्नाचा विचार करावा लागतो.

प्रथम आपण प्राचीन भारतीय समाजातील याबाबतची मते पाहू. ऋग्वेदात यज्ञविधी, दान, अतिथी सेवा, पाठशाला, मंदिरे, धर्मशाळा उभारणे, अन्नदान करणे अशा गोष्टींना इष्टपूर्त म्हटले जाते. आध्यात्मिक गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी या गोष्टींची गरज आहे. दान आणि समर्पणाने पुण्यलाभ होतो, असा विश्वास समाजात वाढत गेला. राजा हा विश्वस्त असून ईश्वराचे नियम पाळतो कि नाही, याची दक्षता घ्यावी असा संकेत प्राचीन काळी होता. (मनुस्मृती ८ अ श्लोक ४१) चांगले काम केले की, चांगले फळ मिळते किंवा गत आयुष्यातील पापकर्मांचा नाश व्हावा म्हणून दान करावा असा उपदेश अनेक धर्म देतात. चांगल्या कर्माने धर्माचरणाने मानसिक समाधान लाभते हा तर जवळजवळ सर्व धर्मांना मान्य असणारा विचार आहे.

वेद काळात मूर्तिपूजा नव्हती. त्याचबरोबर मठ, मंदिर बांधणे हा प्रकार नव्हता. हिंदूंच्या धर्मशाळा व मुसलमानांच्या सराई यात्रेकरूंच्या प्रवासातील विश्रांतीस्थानके होती. पुढे बुद्ध काळात विहार उभारले गेले. त्यावेळेला



संघ हा विचार रूढ झाला. या धर्माला राजाश्रय मिळाला. बुद्ध धर्माने काही नियम सांगितले. बुद्ध धर्माची लाट ओसरली व जगातला एक अद्वितीय तत्त्वज्ञ आद्य शंकराचार्य यांचा काळ आला. त्यांनी मठाची स्थापना केली. विनयपीटिकेतून बुद्धविहारासारखी मठांची कल्पना त्यांनी अस्तित्वात आणली.

धार्मिक कार्यासाठी दान करायचे झाले तर कोणाच्यातरी साक्षीने दान केले पाहिजे असा संकेत होता त्यामुळे ते मंदिराच्या देवाच्या वा आश्रमातील गुरूच्या साक्षीने करण्याची प्रथा सुरू झाली. भारतात ब्रिटिश सत्ता आली नंतर त्यांच्या लक्षात आले की, धर्मसंस्थांच्या मालमत्तेचा अपहार करण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढली. ब्रिटिशांनी १८१० साली धर्मसंस्थांच्या व्यवस्थापनेचे निरीक्षण करण्याचा कायदा अमलात आणला. मुंबई व मद्रास इलाख्यात १८१७ व १८२७ साली हा कायदा लागू झाला. १८७७ च्या कायद्याच्या ५३९ कलमानुसार गैरव्यवहार करणाऱ्या विश्वस्तांवरच्या कारवाईची दिशा स्पष्ट झाली. पुढे वेळोवेळी या कायद्यात बदल झाले. ब्रिटिशांच्या विचारसरणीमध्ये धार्मिक श्रद्धांचा भाग हा सार्वजनिक ट्रस्ट या कल्पनेत समाविष्ट आहे. चॅरिटीचा अर्थ अन्न, वस्त्र, शिक्षण व निवारा या बाबतीत गरिबांना मदत करणे व त्यांचा उद्धार करणे असा होतो. अर्थात, ब्रिटिशांची ही मूळ कल्पना नाही. ती त्यांनी रोमन लॉमधून उचलली आहे.

प्राचीन रोमन संस्कृतीत ज्युपिटर, मार्क्स, डायना या देवांना सर्वसंपत्तीचा मालक मानले आहेत व त्यांचे पुजारी हे त्यांचे विश्वस्त होते. पुढे ख्रिश्चन धर्माच्या प्राबल्यानंतर चर्च संस्थेला विश्वस्त मानले जाऊ लागले. १८८८ ते ९१ च्या चॅरिटेबल ॲक्टनुसार देणगी देण्याच्या पद्धती व स्वरूपावर ब्रिटिशांनी बंधने घातली होती. थोडक्यात धार्मिक व धर्मादाय यात हिंदू कल्पनेत फरक नाही, पण ब्रिटिश कल्पनेत यात फरक आहे. दुसऱ्याच्या मालमत्तेच्या विनियोगाबद्दल टाकलेला विश्वास असा ट्रस्ट याचा अर्थ सर्वसाधारणपणे घेतला जातो. काही कायदेपंडितांच्या मते विश्वास ठेवण्यासाठी मालमत्ता पाहिजेच असे नाही.

ब्रिटिश विचार व परिस्थिती आणि भारतीय परिस्थिती व परस्पर यांत मूलभूत फरक आहे. पूर्वी राजे लोकांची नजर मठांच्या व्यवस्थापनावर असे; पण भारतात सध्या प्रचलित असणारे चॅरिटी कमिशनर नेमण्याची पद्धती ही ब्रिटिशांची आहे. ब्रिटिशांचा अनुनय करण्याचा व त्यांचे नियम, वेषभूषा, भाषा यांचा आमच्यावरचा पगडा आम्ही भारत स्वतंत्र होऊन ४४ वर्षे झाली तरी गेलेला नाही.

चॅरिटी व ट्रस्ट ही कल्पना प्राचीन काळापासून प्रगत होत गेली व तिच्यात बदल झाले, याचा थोडक्यात आढावा घेतल्यावर आपण वर्तमानकाळाकडे वळू. यावेळी आजपर्यंतचा एक विचार ठळकपणे लक्षात येतो, की मालमत्ता व ती ताब्यात असणारा विश्वस्त आपले व आपल्या लोकांचे हित कसे साधता येईल, याकडे लक्ष पुरवतो. हा ब्रिटिशांचा निष्कर्ष आजही लागू पडतो.

ट्रस्ट स्थापन करण्यापूर्वी त्याचे विविध उद्देश्य सांगितले जातात. बालवाडी ते महाविद्यालय, ग्रंथालय, व्यायामशाळा, मंगलकार्य, व्याख्यानमाला, वैद्यकीय मदत, संशोधन संस्था असे विविध उद्देश ट्रस्ट स्थापन करण्यामागे दाखविले जातात. हे त्याचे बाह्य स्वरूप आहे. यामागचे उद्देश तपासताना असे आढळते की, ट्रस्ट स्थापण्यामागचे हेतू चांगले असले तरी त्यामागचे हेतू प्रामाणिक असतीलच असे नाही. बऱ्याच ट्रस्टचा कारभार जवळून पाहताना असे आढळते की, देणग्या गोळा करणे, इमारती बांधणे, जागा मिळवणे, त्या निमीत्ताने सत्ता, प्रसिद्धी, पैसा मिळवता येतो. राजकारणही साधता येते. अशा गोष्टी पाहिल्यावर अलीकडे बऱ्याच ट्रस्टच्या बाबतीत चॅरिटी या मूळ कल्पनेशी पूर्णपणे विसंगत असे स्वरूप ट्रस्टना लाभलेले दिसते.

धार्मिक, वैद्यकीय, शैक्षणिक ट्रस्ट या प्रमुख तीन प्रकारांचा विचार करताना असे दिसून येते की, धार्मिक ट्रस्ट यांचे उत्पन्न जमिनी व देणगी पेट्यांतून मिळते. काही ट्रस्टच्या नावे हजारो एकर जमिनी असूनही



व्यवस्थापनातील मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचारामुळे हे ट्रस्ट मरणोन्मुख झाले आहेत.

महाराजांच्या चमत्कारांच्या कथा सांगून आपले कुटुंब व पै-पाहुण्यांची सांपत्तिक स्थिती सुधारणारी चेले मंडळी ही तर ट्रस्ट या वृक्षावरची बांडगुळे जेथे तेथे आढळतात. शैक्षणिक ट्रस्टबाबत नव्याने भाष्य करण्याची गरज नाही. असे ट्रस्ट सहजा आजारी पडत नाहीत. ज्ञानदान हे पवित्र कार्य मानल्याने आरोग्यशाला व पाठशाला चालवण्यावर कर आकारू नये म्हणून शैक्षणिक ट्रस्टना कर सवलत मिळते. पण, आता ज्ञानदानाचे हे विडंबन संस्था विश्वस्त करताना १९७१ ला पाचपेक्षा जादा शिक्षण संस्था काढायला परवानगी देऊ नये असा ठराव महाराष्ट्र विधानसभेत मांडला गेला होता; पण तो बारगळला. पुन्हा एकदा तो मांडण्याची गरज वाटू लागली आहे.

वैद्यकिय ट्रस्टबाबत जे उद्देश चांगले आहेत; पण त्यांची कार्यपद्धती मूळ चॅरिटी कल्पनेला सुसंगत वाटत नाही. जसलोक, बॉम्बे हॉस्पिटल व अशाच पुण्या-मुंबईच्या ट्रस्टच्या मोठ्या हॉस्पिटलचा उपयोग गरिबांना किती होतो? राज्यात प्रत्येक जिल्ह्यात सरासरी १० ते १२ वैद्यकीय ट्रस्ट निर्माण झाले आहेत.

धार्मिक, शैक्षणिक, वैद्यकिय ट्रस्टचे आजचे स्वरूप पाहिले तर त्यात चॅरिटी व ट्रस्ट या मूळ कल्पनेचा दान किंवा त्यागाचा मागमूसही दिसत नाही. संपत्तीचा संचय मूळातच या संस्थांना विसंगत आहे. लॉ ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९२५ हा अपुरा आहे. त्यात बदल करून बेमुदत व प्रचंड पैशांचा साठा करणाऱ्या ट्रस्टवर अंकुश ठेवायला हवा. पैसा व जमिनीच्या संचयावर मर्यादा घालण्याची गरज आहे. मुळातच हिंदू कायद्यात संपत्तीची मर्यादा स्पष्ट केलेली नाही.

# ५. धर्म / विज्ञानाची आधुनिक काळात गरज आहे का?

धर्माची आधुनिक काळात गरज आहे का आणि विज्ञानाची गरज आहे का या दोन प्रश्नाअत धर्माची गरज आहे म्हणणारे अधिक संख्येने आढळून आले. धर्माची गरज नाही म्हणणारे २३% लोक आढळतात, तर विज्ञानाची गरज नाही म्हणणाऱ्यांची संख्या अत्यल्प म्हणजे १% आहे. याचा अर्थ धर्म मानणारे ६८% लोक आहेत, तर आज विज्ञानाचीही गरज आहे म्हणणाऱ्यांची संख्या ६०% हून अधिक आहे आणि धर्म व विज्ञान दोन्ही आवश्यक अशा समन्वयवादी स्त्री-पुरुषांची संख्या २२% आढळली.

अनेक वेळेला धर्मपालन ही व्यक्तिगत बाब मानली तर काही प्रश्न सुटतात आणि ती सामाजिक गरज मानली, तर समाजासाठी धर्मपालन करायचे म्हटले तर काही प्रश्न निर्माण होतात. धार्मिक उत्सवाच्या संदर्भात तर अनेक वेळेला रस्त्यावर नमाज पढणे असो किंवा मशिदीच्या समोरून सवाद्य मिरवणूक काढणे असो, अशा घटना सामाजिक जाती-जमातीतील संघर्ष वाढविण्यास कारणीभूत असतात असे दिसते. त्यामुळे धर्मपालन ही व्यक्तिगत बाब आहे असे मानणाऱ्यांची संख्या समाजात अधिक वाढली तर काही संघर्ष कमी होतील असे वाटते.

मनुष्य जन्माला आल्यापासून मरेपर्यंत विविध स्वरूपाचे धार्मिक विधी करत असतो. ही गोष्ट हिंदू, मुसलमान, जैन, बुद्ध, खिश्चन अशा सर्वच धर्मांत साधारणपणे आढळते. धार्मिक विधीच्या तपशिलामध्ये जाण्याचा या ठिकाणी उद्देश नसून त्यामागची कारणे शोधण्याचा प्रयत्न आहे. रूढींमुळे धार्मिक विधी करणाऱ्यांचे प्रमाण निम्म्यापेक्षा अधिक आहे. त्यामध्ये ज्ञानपूर्वक रूढींचे पालन करणाऱ्यांमध्ये दोन प्रकार आहेत. पापक्षालनार्थ विधी करणारे ९% लोक, तर पुण्य पदरी पाडावे म्हणून १७% लोक धार्मिक विधी करतात.



**प्रार्थना :**

प्रत्येक देशात, प्रत्येक धर्मात, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्रार्थना केली जात असते. हृदयापासून केलेल्या प्रार्थनेला प्रतिसाद मिळाल्याशिवाय राहत नाही. काही लोक समजतात त्याप्रमाणे प्रार्थना म्हणजे भाकणूक वा शब्दांची पुनरावृत्ती किंवा विशिष्ट तालात गायिलेले भजन म्हणजे प्रार्थना नव्हे.

मध्यकालीन संत मार्टिन ल्यूथर, पाश्चात्त्य तत्त्वज्ञानी हर्बर्ट स्पेन्सर, अमेरिकेचा तत्त्वज्ञ ईमरसन, संत इग्नैशिअस, जर्मन संत जेकोब बोहमी, संत फ्रान्सिस ते संत ज्ञानेश्वर, तुकाराम, मीराबाई ते रामकृष्ण परमहंस यांच्यापर्यंत अनेकांचे जीवन प्रार्थनेने पुनित झालेले होते. बुद्ध धर्मामध्ये प्रार्थनेला प्राणिधान ही संज्ञा दिली जाते. 'माझ्यासमोर येणारे राष्ट्रीय, सामाजिक किंवा राजकीय बिकट प्रश्न बुद्धीपेक्षा अधिक लवकर व चांगल्या प्रकारे प्रार्थनेने सुटतात,' असे म. गांधी म्हणत.

या ना त्या निमित्ताने स्वत: प्रार्थना करणाऱ्या लोकांचे प्रमाण ६७% आहे, तर कौटुंबिक प्रार्थना करणारे २२% आढळतात आणि साधारणत: ११% लोक प्रार्थना करीत नाहीत. प्रार्थना करण्यामागचे उद्देश शोधताना असे आढळले की, मन:शांती, ईश्वरी कृपा आणि संकट निवारण यामध्ये मन:शांतीसाठी प्रार्थना करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८६% आढळते. परमेश्वराची कृपा व्हावी म्हणून, अल्लाची कृपा व्हावी म्हणून ५% लोक प्रार्थना करतात, तर संकट निवारणासाठी प्रार्थना करणाऱ्यांचे प्रमाण तितकेच आढळते. आजच्या जगात आधुनिक मानवाला मानसिक अशांती तीव्रतेने अनुभवास येते असा एक अर्थ होतो. त्यामुळे प्रार्थना करण्यामागचा बहुतांश लोकांचा उद्देश हरवलेले मानसिक स्वास्थ्य, मानसिक शांती लाभावी असाच आहे.

देवाची कल्पना ही जशी मन:शांती लाभण्यासाठी उपयोगी पडते, तशीच इतर कार्यसिद्धी व्हावी म्हणून अनेकांना उपयुक्त ठरली आहे. नवस बोलणे म्हणजेच एखादी कार्यसिद्धी व्हावी आणि जर ती झाली तर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एखादी कृती करणे किंवा करायला सांगणे अशा या कार्यकृत्यासाठी नवस बोलणाऱ्यांची संख्या २५% आहे, तर दुसऱ्याला

नवस करायला लावणाऱ्यांची संख्या ६२% आहे. नवसावर विश्वास नाही म्हणणाऱ्यांची संख्या फारच अल्प म्हणजे १३% आहे.

स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर काही वर्षे भारतभर अनेक ऋषींचे प्रस्थ प्रचंड होते. त्यानंतर विज्ञानाचा प्रसार आणि साक्षरतेचे वाढलेले प्रमाण याचा परिणाम, यामुळे त्यांचे प्रस्थ कमी झाले. धार्मिक व्यक्तींना भेट देत नाही म्हणणारे ५७% लोक आहेत. राहिलेल्या भेट देणाऱ्या लोकांमध्ये त्या भेटीमागचा हेतू शोधताना असे आढळले की, कृतज्ञतेच्या भावनेने भेटीस जाणारे २६% लोक आहेत, तर आपणाला इच्छित फळ मिळावे म्हणून दैवी लोकांना भेटणारे ९% लोक आढळतात आणि या दैवी लोकांच्या मार्फत अकेंद्रिय अशा दु:ष्प्राप्य अशा देवाकडे आपले गाऱ्हाणे मांडावे म्हणून २% लोक अशा लोकांची मध्यस्ती स्वीकारतात.

व्यक्तिगत पातळीवर एकंदरीत धर्म, विज्ञान यांची गरज रूढीमुळे धर्म, धार्मिक विधी करणारे, मन:शांतीसाठी प्रार्थना करणारे साधारणपणे ६०% हून अधिक लोक आजही आहेत; मात्र सुशिक्षितांच्या मते ईश्वरी कल्पनेच्या आड येणाऱ्या व्यक्तीकडे जाण्याचा ओढा कमी दिसतो.

कोल्हापूर जिल्ह्यातील अगदी खेड्यामधल्या पाडळी खुर्द अशा गावच्या काही अशिक्षित स्त्रियांच्या मते धर्मपालन ही व्यक्तिगत बाब आहे, तर ६५ वर्षांच्या पाटीलबाई धार्मिक व्यक्तीकडे इच्छित फल मिळावे म्हणून जातो असे म्हणतात. तसेच सेवानिवृत्तीच्या वयाला आलेल्या बँकेतील कर्मचारी महिला कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी धार्मिक व्यक्तीला भेट दिल्याचे कबूल करतात. २३ वर्षांची वृत्तपत्रात काम करणारी द्विपदवीधर तरुणी नवसावर आपला विश्वास नाही, मात्र मन:शांतीसाठी स्वत: प्रार्थना करते असे सांगते. शहरातील एका सुस्थापित डॉक्टरची पत्नी धार्मिक व्यक्तीकडे जाते; पण तिचा नवसावर विश्वास नाही; असे सांगते. कॉलेजला जाणाऱ्या बऱ्याच युवतींचा धार्मिक व्यक्ती वा नवस यांच्यावर विश्वास नाही परंतु रूढींचे बंधन झुगारण्याचे सामर्थ्यही नाही. १८ वर्षांच्या एका मुसलमान युवतीला धर्मपालन ही सामाजिक गरज वाटते; तर मन:शांतीसाठी नमाज पढण्याची गरज तिला



जाणवते. दुसऱ्या अशाच एका मुलीला सध्याच्या जगात असे वाटते, पण एकात्मतेसाठी धर्म हवा असे तिला वाटते. समाजात एकात्मता, सद्भावना निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून धर्माची गरज आहे असे १७ वर्षांच्या एका मुलीला वाटते. सदाशिव धोंडीबा गोंधळेकर हा गगनबावडा (कोल्हापूर) मधील एका खेड्यातील अशिक्षित तरुण शेतमजूर म्हणतो, खेडोपाडीच खरा धर्म आणि देव आहे; मात्र देवाच्या नावावर लोक शहरात पैसा मिळवितात. अशिक्षित असूनही तो कोणत्याही बुवा किंवा महाराजाकडे जात नाही. त्याचा नवसावर विश्वास आहे. आजपर्यंत त्याने कधी नवस केला नाही.

अमीन सय्यद नावाचा उस्मानाबाद जिल्ह्यातील करंजखेडा इथला पाचवी शिकलेला हमाल वेगवान विज्ञानाची गरज आहे असे सांगतो. तो मुल्ला मौलवीकडे जात नाही; मात्र नवस बोलतो आणि ईश्वराची प्रार्थनाही करतो. ६१ वर्षांचा एका साप्ताहिकाचा संपादक नवसावर विश्वास ठेवत नाही आणि धार्मिक व्यक्तींकडेही जात नाही व मन:शांतीसाठी प्रार्थना करतो. तीच गोष्ट सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कला महाविद्यालयाच्या प्राचार्याची आहे. काही वयोवृद्धांना धार्मिक व्यक्तींना भेट दिल्यामुळे मन:शांती मिळते. ६७ वर्षांच्या वर्मा नावाच्या रजपूत क्षत्रियाला वाटते की, धर्माची ओढ सुशिक्षित लोकांत कमी होत जाईल. त्यांचा नवसावर विश्वास आहे, पण ते नवस बोलत नाहीत किंवा दुसऱ्याला करायलाही सांगत नाहीत. हिमाचल प्रदेशमधल्या हमीरपूर जिल्ह्यातील नानचंद शर्मा या अशिक्षिताला धर्मपालन ही सामाजिक बाब वाटते तर चंद्रास्वामीसारख्या व्यक्तीला भेट द्यायचीच कशाला, असा त्यांचा प्रश्न आहे. मध्य प्रदेशमधील टी.डी. शहा ही मध्यम वयाची जैन व्यक्ती साधुसंत, देवाकडे आपले गाऱ्हाणे मांडण्यासाठी जातो असे म्हणते. जैनांच्या चांगल्या घरातील तरुण मुले अंडी, मांस खातात त्यामुळे घरच्या परिवारात एक तरी माणूस धार्मिक हवा, त्याचा प्रभाव पडतो. त्यामुळे धर्माची आधुनिक काळात नितांत गरज आहे. असे शहांचे जुन्या पिढीतील लोकांचे प्रातिनिधिक मत आहे.

# ६. यज्ञ संस्थेतून मंदिर संस्थेचा विकास

कर्मकांडाच्या जटिलतेमुळे यज्ञ संस्था लोकमानसातून उतरली तरीही भारतीय तत्त्वचिंतकांना यज्ञ संकल्पनेचा पूर्णांशाने त्याग करावा असे वाटले नाही. यज्ञ संकल्पनेत तात्त्विक चिंतन टिकण्यासाठी त्यावर नवे प्रभावी प्रतीक उभारणे आवश्यक होते. समाजमानसातून असे नवे प्रतीक अंकुरले. हे प्रतीक म्हणजे मंदिर. 'यज्ञ' धातूचे तीन अर्थ आहेत. देवांचा सन्मान किंवा पूजा, संघटना व दान, आपणापेक्षा जो ज्ञानाने, कर्माने, शीलाने वा तपस्येने श्रेष्ठ आहे तो देवासारखा आहे असे समजून त्याची पूजा करणे, आपल्या बरोबरीच्या लोकांना प्रेमाने जोडणे, एकत्र करणे तसेच आपल्यापेक्षा जो लहान आहे त्याला काही तरी देणे असा यज्ञ शब्दाचा आशय आहे. राजा किंवा श्रीमंत यज्ञानंतर तपस्वी, ज्ञानोपासक, विद्यार्थी, गुरुकुले चालविणारे ऋषी इ. सामाजिक कार्यकर्त्यांना व दुर्बल घटकांना सन्मानपूर्वक दान देत. ती ती कार्ये अखंड चालत राहावीत यासाठी हे यज्ञ असत. अशा रीतीने यज्ञाच्या निमित्ताने दानसत्रे चालविले जात. वादविवाद व्हावेत, विद्वानांचा सत्कार व्हावा, सामाजिक आणि श्रेष्ठ कार्य करणाऱ्या गुरुकुलादी संस्थांच्या अडचणी दानाने दूर व्हाव्यात हा हेतू असे. याला पुण्यकारक कर्तव्य मानावे असे यज्ञ धातूतून सुचित होणारे विविध कार्ये यज्ञ संस्था प्रत्यक्ष करीत होती. पुढे यज्ञ संस्थेचा मूळ हेतूच दृष्टीआड झाला आणि यज्ञ संस्था कर्मकांडाच्या अतिरेकामुळे नामशेष झाली; परंतु यज्ञ संस्थेचे नवे प्रतीकात्मक रूप मंदिराच्या स्वरूपात प्रकट झाले. यज्ञातील प्रतीके निराकार होती. त्यामुळे सर्वसामान्यांच्या दृष्टीने त्याचा अर्थ चटकन ध्यानात येत नसे. ती प्रतीके साकार स्वरूपात मंदिरातून प्रकट झाल्यावर त्यांना नवा अर्थ मिळाला.

मंदिरातील ही यज्ञ प्रतीके गाभारा, मंडप अशा स्वरूपात यज्ञकुंडाच्या ठिकाणी आली. यज्ञात आहुती घेण्यासाठी देवांना आवाहन करण्यात येई. त्या येतात की नाही, हे साध्या व्यक्तींना कळत नसे. त्यामुळे गाभाऱ्यात देवता मूर्तीची प्रत्यक्ष स्थापनाच करण्यात आली. आहुतीऐवजी नैवेद्य आला.



तो दाखवताना हाताची हालचाल आहुती देणाऱ्या पद्धतीनेच करतात. यज्ञातील युपाचे गरूड खांबात रुपांतर झाले. युपाला यज्ञ पशू बांधत. आता भवन त्या खांबास पाठ लावून गरगर फिरतो, जणू त्याच्या अहंकाररूपी पशूलाच तेथे बांधलेले असते. तो अहंची आहुती द्यायला आला आहे. तसेच परिषद भूमीच्या ठिकाणी सभामंडप आला.

यज्ञातील अग्नी प्रवासात नेणे शक्य नसते म्हणून हात अग्नीवर तापवून तो आपल्या तोंडावर धरून मंत्र म्हणून श्वास आत घेतला जातो. या कृत्यामुळे अग्नी यजमानाच्या अंतर्यामी प्रविष्ठ होतो. या क्रियेला 'आत्मसमारोप' असे म्हणतात. अंतरिक अर्थ आणि सौंदर्य सगुण स्वरूपात अभिव्यक्ती करण्याची मंदिर ही तपोभूमीच होती.

**यज्ञभूमी व मंदिर तुलनात्मक नकाशा**

| योग संकल्पना | यज्ञभूमी | मंदिर |
|---|---|---|
| तादात्म्य | उत्तरवेदी | गर्भगृह |
| आनंदमय कोश | हविर्धान (यूप) | अंतराल |
| विज्ञानमय कोश | आवाहनाय अग्नी | महामंडप |
| मनोमय कोश | वेदी | मंडप |
| प्राणमय कोश | परिषद भूमी | अर्ध मंडप |
| अन्नमय कोश | प्रदक्षिणा मार्ग | प्रदक्षिणा मार्ग |

# ७. सामाजिक धार्मिक स्थळ - मंदिर

परिपूर्ण हिंदू मंदिराची रचना ही तत्त्वज्ञानातील विश्वकल्पनेचे प्रतीकात्मक दृष्य स्वरूप असते. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानाची विश्वस्वरूपाबद्दलची संकल्पना आणि प्रतीकाचे अर्थ यांचे ज्ञान असल्याशिवाय मंदिराच्या आकारामागील रहस्य स्पष्ट होत नाही. हिंदू मंदिरांची रचना ही स्फटिक भूमितीवर आधारित असते म्हणजे स्फटिकात विशिष्ट आकारांचे प्रमाणबदल लघु व विशाल आकृतिदर्शन होत असते. स्पटिकाला एक विशिष्ट भौमितिक आकार असतो. तो फोडला तर त्याच आकाराचे त्याचे प्रमाणबदल छोटे तुकडे होतात. अशा स्व-समान रचना निसर्गात विपुल आढळतात. अशा मूलभूत आकृतींचा वापर हा हिंदू मंदिरांचा पायाभूत भाग आहे. विश्वस्वरूपाची प्रतिकृती मंदिराच्या आकृतीमध्ये दाखविलेली असते. ही मंदिरे पाचव्या शतकापासून सुमारे १५०० वर्षांच्या काळात घडली आहेत. हिंदूंच्या धर्मकल्पनेत 'बिंदू' हा निर्मितीचे आदिबीज मानला आहे. शक्ती बिंदू बंदिस्त असते. या केंद्रबिंदूतून सर्व रेखा, वर्तुळे वा त्रिकोण यांचा उद्‌गम होतो. साऱ्या विस्कळित पसाऱ्यातून निर्माण झालेली पहिली सुसंगत आकार निर्मिती त्रिकोणाने सूचित होते. 'समरांगण सूत्रधार' या ग्रंथात विविध चौसष्ट प्रकारच्या मंदिर रचना सांगितल्या आहेत. त्यात सर्व परिमाणे दिली आहेत. त्याआधारेच मंदिराच्या वास्तू, लेणी, मूर्ती एवढेच काय पण ओतीव व धातूंच्या, हस्तिदंताच्या मूर्ती त्या प्रमाणावर बनल्या आहेत. मोहेंजदारो व हडाप्पा या प्राचीन संस्कृतीच्या काळात बहुधा लाकडी व उंच मंदिरे होती. पण, त्या मंदिरात सहसा मूर्ती नसत. त्या त्या देवतांची प्रतीके असत. त्यामुळे देवतांचे पूजन समाविष्ट नव्हते.

बौद्ध स्तूप ही विश्वरचनेचे प्रतिरूप आहेत. चौथरा म्हणजे भूलोक, त्यावरील गोलाकार अंड म्हणजे आकाश, स्तूपांच्या माथ्यावरील हर्मिका म्हणजे देवलोक आणि छत्र म्हणजे स्वर्ग होय आणि हेच महापुरुषांचेसुद्धा प्रतीक होय. (ड) भारतीय संस्कृती कोष खंड १०पृ. १८७



मंदिर म्हणजे काय, याविषयी अग्निपुराणाने स्पष्ट केले आहे की, 'एवं मेष: हरि: साक्षात् प्रासादत्त्वेन् संस्तीत:।' अशाप्रकारे साक्षात श्रीहरी (प्रसाद) मंदिर स्वरूपाने येथे उभा आहे. याचा अर्थ असा की, मंदिर हे भगवंताचे साकार रूप आहे. त्याचे विश्वरूप दर्शन हेच मंदिररूपाने होत असते. 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' किंवा 'जो ब्राह्मण तोच विराट विष्णू' असाही आपला सिद्धांत असल्याने मानवी शरीररचना व विश्वरचना यातही साम्य आहे हे ध्यानात घेऊनच मंदिराच्या विविध विभागांना शरीराचीच नावे दिली आहेत. उदा. मंदिराच्या खालच्या भागाला पाथांग, (पदभाग) जंघावरच्या भागाला गंडी, मस्तक, ख-पुरी. (कपाळ)

जैन मंदिरे ही उत्कृष्ट कलापूर्ण आहेत. दिलवाडा, ग्वाल्हेर, बुंदेल, श्रवणबेळगोळ या ठिकाणी जैन मंदिरे आहेत. ख्रिश्चन प्रार्थनास्थळे, इस्लामच्या मशिदी, बहाई मंदिरे अशी कितीतरी विविध धर्मांची मंदिरे कलापूर्ण आहेत.

मंदिर संस्थेचा सामाजिक जीवनाला विविध प्रकारे स्पर्श होत असतो. त्यामध्ये विविध कला आणि इतर गोष्टी याचे कार्य होत असते. उदाहरणार्थ १) स्थापत्यकला २) शिल्पकला ३) चित्रकला ४) संगीत कला ५) नृत्यकला ६) धर्मविवेचन (कीर्तन, कला, प्रवचन) ७) धर्मसभा (न्याय) ८) आयुर्वेदिक वनस्पती (औषधे) ९) गो शाळा १०) पशुपक्षी संग्रह ११) धर्मकार्य १२) ग्रंथालय १३) पाठशाळा १४) ध्यानमंदिर १५) अतिथीगृह १६) अनाथ बाल संगोपन अशी सोळा विविध कार्ये मंदिरातून कार्यरत असत. समाजाने जे ज्ञान द्यायचे ते देवाला द्यावे, श्रीमंतांनी देवाला द्यावे त्याचा अहंकार बाळगू नये आणि मंदिराने समाजधारणेची कार्ये करावी, मंदिराची मूळ कल्पना म्हणजे मंदिराच्या प्रशस्त प्रांगणात साहित्य, संगीत, शिल्प, चित्रकला, नाट्य, विज्ञानाच्या रूपाने निष्काम सेवा होऊ लागली. समाजातील सर्व थरांतील लोक येथे एकत्र येत. मंदिरात नियमाने पूजाअर्चा, स्तोत्रपाठ, प्रार्थना व गायन सेवा चालत. तसेच कथा-कीर्तने, शास्त्रीय सुसंवाद इ. बौद्धिके सतत चालू असायची. शिवाय मंदिरातील देवतेचे

सार्वजनिक उत्सव होत. त्यामध्ये कार्यक्रमाच्या निमित्ताने निरनिराळ्या क्षेत्रांतील विद्वान कलावंत व गुणी स्त्री-पुरुष एकत्र जमत. त्यामुळे अनेक विद्यांना व कलांना प्रोत्साहन मिळे. आपली विद्या, कला, सत्ता व संपत्ती निष्कामपणे त्या ईश्वराला अर्पण करण्यातच तिची सिद्धी आहे अशा शुद्ध भावनेने समाजातील विद्वान कलावंत, सत्ताधारी व श्रीमंत स्त्री-पुरुष मंदिराची कामे आपलेपणाने करीत. भारतातील काही मंदिरे एवढी भव्य होती की, त्यांच्याभोवती वस्ती वाढली व तीर्थक्षेत्राचे त्यांना स्वरूप आले. म्हणून एकात्म भावजीवन निर्माण करणारी मंदिर ही एक संस्था होय. समाजशास्त्र, मानसशास्त्र, योगशास्त्र, शिल्प, नृत्य, संगीत, नाट्य इ. ललित कला तसेच वेदांत तत्त्वज्ञान या सर्वांना एकाच वेळी स्पर्श करणारे व गुंफणारे मंदिर ही एक अद्‌भुत कला होती. पुढे या स्वरूपाचे आकलन न झाल्याने रूढी दृढमूल झाल्या. स्वार्थी व्यक्तींनी संस्था बळकावल्या, त्यामुळे संस्था भ्रष्ट झाल्या. मंदिराची संस्थाने बनली.

धार्मिक स्थळी जाता का, असा एक प्रश्न (सामाजिक क्र. ५) प्रश्नावलीमध्ये होता. या ठिकाणी केवळ मंदिर असा अर्थ अभिप्रेत नाही. विविध धर्मांची धार्मिक स्थळे अभिप्रेत आहेत. उदा. मंदिर, मशीद, दर्गे, चर्च, बहाई टेंपलस्, अगॉशे, बुद्धविहार किंवा बुद्धमंदिरे असा अर्थ अभिप्रेत आहे. या अभ्यासात असे आढळले की, नेहमी म्हणजे साधारण दररोज धार्मिक स्थळी जाणाऱ्यांची संख्या २०% आहे आणि विशिष्ट दिवशी तेथे जाणाऱ्यांची संख्या ७१% आहे, तर कधीही न जाणाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्या जास्त आहे; पण मुसलमानांमध्ये विशिष्ट दिवशी जाणाऱ्यांची संख्या पुरुष वर्गात अधिक आहे. हिंदूंच्या बाबत आठवड्यातील अनेक दिवसांचे साहचर्य विशिष्ट देवतेशी निगडित आहे. उदा. सोमवार - शिवाचा, मंगळवार, शुक्रवार- कोणत्या तरी देवीचा, गुरुवार- दत्ताचा, शनिवार - मारुती. मुसलमानांमध्ये शुक्रवार महत्त्वाचा ठरतो, तर ख्रिश्चन लोकांत रविवार. हे वार व त्यांचे देवतांशी व धर्माशी असणारे नाते हे कोणी निर्माण केले याचे निश्चित उत्तर देता येत नाही, कारण ती एक परंपरा आहे.



महाविद्यालयामध्ये जाणाऱ्या काही तरुणींनी (वय १९-२०) आपण कधीही धार्मिक स्थळी जात नाही असे सांगितले आहे. कदाचित घरच्या वातावरणाचा हा परिणाम असावा.

धर्माची आधुनिक काळात गरज नाही म्हणणारे दलित समाजातील प्राचार्य धार्मिक स्थळी कधी कधी जातो असे म्हणतात; पण त्यांना ती परंपरा मान्य नाही. उलट आजच्या काळात धार्मिक मार्गदर्शकाची गरज आहे असे म्हणणारे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करणारे प्राध्यापक धार्मिक स्थळी कधीच जात नाहीत. कारण, त्यांची धार्मिक व्यक्ती वा ठिकाणाबद्दलची भावना नकारात्मक आहे. जैन समाजातील एक इंजिनिअर धार्मिक स्थळी विशिष्ट दिवशी जातात, पण आपण परंपरेने जातो असे त्यांना वाटते. खेड्यातील नव्या आणि जुन्या दोन्ही पिढ्यांतील स्त्रिया विशिष्ट दिवशी मंदिरात जातात, पण त्या परंपरेने १८ वर्षांच्या एका साक्षर मुलीच्या दृष्टीने व ३० वर्षांच्या एका पदवीधर तरुणीच्या दृष्टीने विशिष्ट दिवशी ईश्वरी शक्ती अधिक प्रगटत असते. असेच मत एका भावनाप्रधान तरुण चित्रकाराचेसुद्धा आहे. हे केवळ हिंदूंपुरतेच मर्यादित आहे असे नाही. करवीर तालुक्यातील निसार शेख याची भावना तशीच आहे.

बऱ्हाणपूरचे जैन समाजातील टी.डी. शहा विशिष्ट दिवशी जैन मंदिरात जातात; परंतु इतर लोक जातात म्हणून ते जातात. अनंतनाग जिल्ह्यातील एक कश्मिरी मुसलमान सर्वच धर्म मानणारा आहे आणि अल्ला आपल्यावर संतुष्ट राहावा म्हणून धार्मिक स्थळी जातो, तर तिबेटमध्ये जन्मलेली एक मुलगी पौर्णिमेला बुद्धमंदिरात जाते. त्या दिवशी भगवान बुद्धांचे अस्तित्व अधिक प्रगटते अशी तिची भावना आहे, तर एक सेवानिवृत्त जेलर नेहमी मंदिरात जातात; पण परंपरेने जातात असे ते म्हणतात. अमरावतीचे एक माजी उपधर्मादाय आयुक्त एका शिक्षण संस्थेचे संचालक आणि एका महामंडळातील कार्यकारी अभियंता परंपरेने धार्मिक स्थळी जातात. कलकत्त्यातील एक मराठी लेखिका आधुनिक काळात धर्माची गरज आहे,

पण धर्मपालन ही व्यक्तिगत बाब वाटल्याने त्या कधीही कलकत्त्याच्या काली मंदिरात जात नाहीत. फ्रान्सचा स्टिफन हा तरुण मला भेटला. तो म्हणाला की, धार्मिक स्थळी समाजमनाची काही रहस्ये शोधण्यासाठी मी जातो; पण परंपरा, इतर लोक जातात म्हणून किंवा विशिष्ट दिवशी ईश्वरी शक्ती अधिक प्रगट होते म्हणून या गोष्टींचा धार्मिक स्थळी जाण्याचा माझ्या बाबतीत काही संबंध नाही. भारतामध्ये अनेक मंदिरांमध्ये मी जातो. जगाच्या पाठीवर मला कधीही, कुठेही न आढळलेली गोष्ट भारतात संगीत, विविध रंग, मूर्ती, रंगीबेरंगी फुले, वस्त्र आणि स्त्री-पुरुष, आबालवृद्ध साऱ्यांचे एक अपूर्व सामुहिक स्वरूप येथेच दिसते. हिंदूंच्या तुलनेत ख्रिश्चन धर्मामध्ये नेहमी हे करू नको, ते कर अशा तऱ्हेच्या अनेक नियमांची बजावणी कानी येते.

स्वधर्माच्या व्यक्ती व ठिकाणाबाबत कोणती भावना आहे स्वाभिमानाची, पावित्र्याची की नकारात्मक, असा प्रश्न होता. या प्रश्नाला नकारात्मक ५.४% , स्वाभिमानाची भावना ३८% आणि पावित्र्याची भावना ५७% लोकांच्यात आढळली. अशिक्षित, अडाणी समाजात विशेषत: स्त्रियांमध्ये स्वत:च्या धर्माच्या व्यक्ती किंवा ठिकाणे याबाबत पावित्र्याची भावना आढळते. इस्लाम व इतर धर्मीयांमध्येही स्वाभिमान आणि पावित्र्य या भावना आढळतात. पंचाऐंशी वर्षांचे प्रसिद्ध चित्रकार श्री. गणपतराव वडणगेकर यांनाही धार्मिक ठिकाणी मांगल्य व पावित्र्य अनुभवास येते. त्यांच्या मते त्या ठिकाणी मांगल्य, पावित्र्य आणि उदात्तता अत्यावश्यक आहे. त्यांच्यासारखे अत्यावश्यक म्हणणाऱ्यांची संख्या ८७% आहे. पावित्र्य, उदात्तता असणाऱ्यांची गरज आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या ८६.४% आहे आणि गरज नाही म्हणणारे ६०% आहेत. गरज नाही म्हणणाऱ्यांमध्ये काही तरुण सुशिक्षित स्त्री-पुरुषांचा समावेश आहे. यामध्ये दोन चित्रकारांचाही समावेश आहे. चंदगड तालुक्यातील एक तरुणी प्रार्थनेत सहभागी होते, धार्मिक स्थळी जाते; परंतु अशा ठिकाणी पावित्र्य असायलाच पाहिजे असे तिला वाटत नाही. दुसरा एक पदवीधर तरुण म्हणतो, माणूस कोणत्याही धर्माचा असो,



मानवता हाच खरा धर्म आहे. भुकेलेल्याला अन्न, तहानलेल्या पाणी देणे म्हणजे धर्म असे मानणाऱ्याला धार्मिक ठिकाणी पावित्र्य, मांगल्याची गरज नाही असे वाटते. सोलापूर जिल्ह्यातील एका खेड्यामधील पदवीधर नवनाथ असबे यांना धार्मिक विधीत सहभागी होऊन धार्मिक स्थळी कधीही जावेसे वाटत नाही आणि त्यामुळे त्या ठिकाणी पावित्र्य असावे की असू नये, याबद्दल त्यांची मते दोलायमान आहेत. अमृतसरच्या एका पंडिताचा मुलगा ज्ञानचंद्र शर्मा यांचे मत असे आहे की, धार्मिक ठिकाणी पावित्र्य असणे अत्यावश्यक आहे. चंद्रास्वामीसारखे देशाला कसे तारतील असा त्यांचा प्रश्न होता. सुवर्णमंदिरात अनेक अपवित्र घटना घडल्या. त्या नको होत्या आणि इंदिरा गांधींनी पंतप्रधान म्हणून आर्मी घुसविली तेही वाईट होते. दोन्हीमुळेही मंदिराचे मांगल्य, पावित्र्य नष्ट झाले. तो मूळचा हिमाचल प्रदेशामधील गौतम ब्राह्मण होता. एस. एन. वर्मा हे सेंट्रल रेल्वेचे चीफ टेलिकॉम इन्स्पेक्टर होते. ते हिंदू-रजपूत यांच्या मते आजच्या काळात नैतिकताच कमी आहे. त्यामुळे धर्माची ओढ कमी झाली आहे. हरिद्वारसारख्या ठिकाणी पंडे इतके लुबाडतात की, धर्माची ओढच कमी होते. मध्य प्रदेशमधील बुऱ्हाणपूर येथील टी. डी. शहा म्हणतात, धार्मिक ठिकाणी पावित्र्य अत्यावश्यक आहे. त्यांच्या मते जैनांच्या चांगल्या घरातील तरुण मुले अंडी, मांस खातात. घरच्या परिवारात एक तरी माणूस धार्मिक हवा तरच त्याचा प्रभाव नव्या पिढीवर पडेल. जम्मूचा जयेशकुमार शर्मा हा हिंदू ब्राह्मण धार्मिक स्थळी कामापुरते पावित्र्य असेल तरी चालेल म्हणतो. बुद्धविहारात राहणारी दादीन २३ वर्षांची तरुणी बुद्ध विहारात पावित्र्य, उदात्तता आवश्यक आहे असे मानते. तेच मत लोडी या तिबेटमध्ये जन्मलेल्या २७ वर्षांच्या युवकाचे आहे.

### बुद्ध धर्म आणि सद्य:स्थिती

बौद्ध भिक्खू, भन्ते राहुल बोधी २ डिसेंबर, १९९० ला शिरोळ तालुक्यातील एका गावात भेटले. ७-८ हजार दलितांनी त्या दिवशी बुद्ध धर्मात प्रवेश केला. त्यावेळी भन्ते खेमधम्मी यांनी सांगितले की, बुद्ध हा

निष्पाप क्रांतीचा उद्गाता होता. बुद्ध म्हणजे परिपूर्ण, सत्याने, शीलाने, समाधीने, प्रज्ञेने, सेवाभावाने भारलेला, चार्तुवर्ण न मानणारा होता. तो मोक्षदाता नव्हता, तर मुक्तिदाता होता. साऱ्या धर्मीयांनी अशा बुद्धाचे चिंतन करावे. असा समतेचा, बंधुत्वाचा बुद्ध आठवावा.'

'एही भिक्खू' एवढेच बुद्ध म्हणत नि ऐकणारा भिक्खू बनत असे; पण पुढे बौद्ध उपासक बनण्यासाठी काही लक्षणे जाहीर झाली. जो काया, वाचा, मनाने पंचशील ग्रहण करतो तो बुद्ध होतो. दीक्षेची प्रार्थना खालीलप्रमाणे होती-

'साधू साधू साधू  
मी बुद्धधम्म संघाचे स्मरण करतो.  
ओकास वंदनी  
भन्ते द्वारतयेन  
कतन यदबंध  
अपराधम स्वम तू  
मे भन्ते ते  
ओ काय वंदनी  
बुद्धं सरणं गच्छामी  
धम्मं सरणं गच्छामी  
संघं सरणं गच्छामी'

हे त्रिशरण जीवनभर मी पाळेन व इतर धर्म व तत्त्वज्ञान व संघाला मी शरण जाणार नाही हे माझे सत्यवचन आहे.

दीक्षा समारंभानंतर भन्ते राहुल बोधी यांच्याशी मी चर्चा केली. त्यावेळी ते म्हणाले, ''धर्म ही व्यक्तिगत बाब आहे. प्रत्येकजण आपल्या जीवनाचा धर्म शोधत असतो. धर्मस्वातंत्र्य म्हणजे पृथ्वीवर जगण्याच्या व अखिल मानवाच्या कल्याणाचा मार्ग आहे. धर्माचा द्वेष करायचे कारण नाही. करायची आहे ती निवड. बौद्ध धम्म म्हणजे अदृश्य देवांनी सांगितलेली बाब नव्हे.



मानवाने मानवाशी कसे वागावे, याचे दिग्दर्शन बौद्ध धम्म करतो.'' धर्माची आज आवश्यकता आहे का, यावर राहुल बोधींचे मत ठामपणे आहे असेच होते. ते पुढे म्हणाले की, धर्मापुढे वाणी मुकी ठेवा, बुद्धी गहाण टाका, स्वतंत्र विचार करू नका. धर्म शास्त्र अपौरुषेय आहे असे जर कोणी सांगत असेल तर त्या अर्थाने अशा धर्माची गरज नाही. ग्रंथात लिहिले आहे, सदसद्‌विवेकाला आत्मज्ञानाच्या मार्गात मोठे स्थान आहे.

राहुल बोधींना मी विचारले, 'चोरी करणार नाही, खोटे बोलणार नाही' अशी शपथ आपण धर्मांतरावेळी दिलीत. खरे तर सर्वच धर्म ही हमी माणसाकडून मागतात. या पार्श्वभूमीवर बुद्ध धर्माचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नेमके काय आहे? राहुल बोधींनी सांगितले, 'सर्वांना सामावून घेणे हे बुद्ध धर्माचे वैशिष्ट्य आहे. ब्राह्मणांपासून न्हाव्यापर्यंत अनेक नामवंत बुद्धांचे शिष्य होते. कालानुरूप बदल बुद्धांनी मान्य केला. काही धर्मात तर विमानप्रवास आजही गैर मानला आहे, ते बुद्ध धर्मात नाही. जाती-पातीच्या उतरंडी नाहीत.' आज धर्माची गरज सांगताना ते म्हणाले, ''राजकीय, आर्थिक व्यवस्था या मानवाच्या कल्याणासाठी असतात. सरंजामशाही, राजेशाही, लोकशाही, कम्युनिझम अशा विविध प्रणाली मानवाच्या विकासासाठी पुढे आल्या; परंतु आता रशिया, चीनमध्ये लोकशाहीचे वारे येत आहे. भांडवलशाहीने प्रश्न संपत नाहीत अशा निष्कर्षाप्रत लोक येत आहेत. अनुभवातून चौकस दृष्टीने, विचाराने माणसे बदलाच्या दिशेने जात आहेत. या पार्श्वभूमीवर धर्मामुळे काही संघर्ष होत आहेत असे मानणे चुकीचे आहे. धर्म जाणणारा माणूस संघर्ष करणार नाही. धर्मामुळे नव्हे, तर अधर्मामुळे आज भारतात संघर्ष होत आहे. अधर्मालाच काहीजण धर्म मानू लागल्याने धर्माविषयी चुकीच्या कल्पना तयार होत आहेत. आंधळेपणाने, अजाणता अथवा जाणीवपूर्वक धर्माचे विकृत रूप पुढे आल्याने धर्म म्हटल्यावर माणसे दचकतात. धर्म कधी माणसाच्या विकासाला, स्वातंत्र्याला टाळा लावीत नाही.''

भारतात जन्मलेला बुद्ध धर्म भारतात न पसरता इतरत्र पसरला. याचे कारण विचारले तेव्हा ते म्हणाले, ''बौद्ध धर्म हा खरोखरीच एक महासागर आहे. अनेक नद्या सागराला मिळाव्यात तशी या धर्माची वाटचाल आहे; परंतु इतिहासही जरा नीट पाहावयास पाहिजे. गौतम बुद्धांचा पसारा तेराव्या शतकापर्यंत चांगला वाढला; परंतु यानंतर तुर्कस्थानातून या धर्मावर मोठे आक्रमण झाले. त्याचप्रमाणे पंडित, पुजारीही आक्रमक बनले. एका बौद्ध भिक्खूचे मुंडके आणून द्या आणि बक्षीस मिळवा एवढा आक्रमकपणा पुढे आला. यांना प्रतिकार करणारा कोणीच न राहिल्याने जातीची मगरमिठी घट्ट होत गेली व त्यांना रान मोकळेच राहिले. बुद्ध धम्माच्या विकासात हे द्वेषपर्व आडवे आले. तलवारीच्या बळावर धर्म वाढविण्याचे तंत्र आले. माझाच धर्म मोठा व्हावा असे प्रयत्न झाले. मनुस्मृतीचा जन्म झाला, कायदे तसेच झाले. त्यात बुद्धिवाद नव्हता, वैज्ञानिक दृष्टीही नव्हती, तर्कदृष्टी नव्हती, बौद्धिक स्वातंत्र्य नव्हते. सांख्य तरी २००० वर्षांपूर्वी कुठे होता?''

येत्या पन्नास वर्षांत बौद्ध धर्माची काय स्थिती असेल, या प्रश्नाला त्यांनी सांगितले, 'बौद्ध धर्माचा प्रसार व प्रचार अधिकाधिक होईल. सुशिक्षित, पदवीधर बौद्ध भिक्खूंची संख्या अधिकाधिक वाढेल. भारताप्रमाणे इतरत्रही बौद्ध धर्म पसरेल.'

बुद्धांनी मूर्तिपूजा मानली नाही; पण बुद्धांचा पुतळा ठेवला जातो हे मूळ धर्मसंदेशाच्या विरूद्ध वागणे होते का? यावर ते म्हणाले, ''बुद्ध मूर्ती हे प्रतीक आहे. सामान्यांना समजणारे साधन एवढाच त्याचा अर्थ आहे. मूर्तीत हिंदू माणूस देव पाहतो त्याला उद्देशून प्रार्थना असते. बौद्ध धर्मात प्रार्थना नाही, वंदना आहे.'' दीक्षा समारंभामध्ये लोकांकडून असे वचन घेतले जाते की, मी बुद्ध धर्म आमरण पाळेन, इतर धर्म तत्त्वज्ञान वा संघाला मी शरण जाणार नाही. या ठिकाणी मानवी स्वातंत्र्यावर बंधन घातले असा अर्थ होत नाही का? यावर खेम धम्मो म्हणाले, ''बुद्ध धर्म स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो, त्याचप्रमाणे ऐहिक प्रश्न सोडवायला मदत



करतो. बुद्धाने धम्मात खेचले ते शांती मिळावी म्हणून. मानव मानसिक दु:खातून मुक्त व्हावा म्हणून बुद्ध धर्माचा प्रयत्न आहे.'' राहुल बोधींना मी विचारले, बुद्धिप्रामाण्यवाद हा धर्मश्रद्धांबाबत अडथळा ठरतो. बुद्ध अंतस्फूर्त होते, तुम्ही बुद्धीला प्राधान्य देता. यावर हसत हसत बोधी इतकेच म्हणाले, ''नाही, नाही.''

# ८. (सामाजिक) धार्मिक विधीमध्ये धर्म राहिला आहे का?

धार्मिक विधीमध्ये धर्म राहिला आहे का, या प्रश्नाला धर्म राहिला आहे असे २२.५% लोकांचे उत्तर 'होय' आहे. 'सांगता येत नाही' अशी अनिश्चितता ३२.५% लोकांमध्ये आहे तर 'नाही' असे म्हणणारे ४६% लोक आहेत.

भारतीय संस्कृतीत विधी, व्रतवैकल्ये यांचा विचार करताना पुराणांचे कार्य समजणे गरजेचे वाटते. वास्तविक पाहता कोणत्याच पुराणाचा काल निश्चित सांगता येत नाही आणि पुराणात लोक सारखी भर घालत राहिल्याने कोणती विचारसरणी, कोणते तत्त्व कोणी कोणत्या काळात सांगितले, याचाही पत्ता लावता येत नाही. पुराणात भिन्न विचारप्रवाह आलेले आहेत. त्यातील काही अनिष्ट विचारप्रवाह उत्तरकाळात वाढत राहिले. पुराणाने प्रामुख्याने भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. अनेक देवतांचे महात्म्य गाऊन त्यांची उपासना केल्याने मोक्ष मिळेल असे पुराणे सांगत. या भक्तिमार्गाला पुढे पुढे कर्मकांडाचे स्वरूप आले. वेदातून यज्ञधर्माला जसे पुढे जटिल व जड स्वरूप आले, त्याचप्रमाणे पुराणातील भक्तिमार्गाचे होऊन त्यातील चैतन्य नष्ट झाले. निर्गुण, निराकार, ईश्वराचे ध्यान करता येत नाही म्हणून सगुण मूर्तीचा आश्रय करावा असे ब्राह्मणांनी सांगितले; पण पुढे मूर्तिपूजा ही जटिल बनून अवडंबर माजवण्यात आले. प्रत्येक देवतेच्या आवडीनिवडी ठरल्या. फुले, नैवेद्य, अभिषेक, प्रदक्षिणा निश्चित झाल्या, त्यावर ग्रंथ लिहिले गेले आणि या धार्मिक विधीत जर कुठे चुकले तर देवाचा कोप होईल किंवा देव शाप देईल अशीही धमकीची सूचना पुजाऱ्यांनी सर्वसामान्य भक्तांच्या मनात ठसवली. त्यामुळे देवी-देवतांचे राग-लोभ ठरविणारे धार्मिक विधी पक्के झाले आणि मग देवाच्या नावावर भोग, विलास सुरू झाले आणि त्यात पुजारी आणि मंदिरे रमून



गेली. त्यामुळे धार्मिक स्थान, उत्सव आणि विधी यांत पुजारी लोकांची मिरासदारी होऊन सर्वसामान्य भक्त खऱ्या धर्मापासून आणि देवापासून दूर राहिला. भक्तिभाव हा मूर्तिपूजेचा खरा गाभा. ते स्वरूप जाऊन व्रत-वैकल्ये, उद्यापने, प्रायश्चित्ते, उपासतापास यांनाही असेच जड स्वरूप आले. याचे महात्म्य मानणाऱ्यांनी आता ताळतंत्र सोडला आहे. वेदाभ्यास केला; परंतु वैशाख स्नान केले नाही तर त्या अध्ययनाचा काही उपयोग नाही असे ब्राह्मणवर्ग सांगू लागला. एकादशीचे व्रत मोठे सोज्वळ; पण त्याचे वर्णन करताना धर्मवेत्ते बेताल बोलत.

उदा. ते सांगत एक वेळ मातृगमन केलेले चालेल, गोमांस भक्षणही विहित ठरेल; पण एकादशीला भोजन करणे म्हणजे महापाप होय. त्यामुळे कोणत्याही धार्मिक विधीचे महत्त्व सांगणाऱ्यांनीच स्वत: नीतितत्त्वांची पायमल्ली केली. चारित्र्य, मनोनिग्रह, सात्त्विक वृत्ती यांना फाटा दिला. त्यामुळे धार्मिक स्थान, उत्सव किंवा विधी यात खरा धर्म राहिला नाही हे त्याचे उत्तर आहे; परंतु जवळजवळ ५०% लोकांना याची जाणीव झाली आहे आणि ३२% लोकांना संभ्रम आहे. मात्र साधारण २५% लोक आणि त्यात बहुतेक अशिक्षित आणि स्त्रियांचा भरणा जास्त आहे. त्यांना अजूनही या शृंखलेतून मुक्त होता आलेले नाही.

ब्राह्मणांच्या अवगुणांची चिकित्सा करू नका असे जर ही पुराणे, हे पुजारी समाजाला सांगू लागले तर अध:पात याहून काही निराळा नसतो. पुराणांची सर्वांत मोठी अपकार्ये म्हणजे त्यांनी शैव, वैष्णव, शाक्त असे परस्पर वैर करणारे तंत्र स्थापून जातिभेद, धर्मपंथ भेद यांनी विघटित होत चाललेल्या हिंदू समाजाचे विघटन पुरे करून टाकले. स्वत: वैदिक धर्माचे अभिमानी असणाऱ्या सातवाहनादी सर्व राजघराण्यांनी जैन, बुद्ध या पंथांना अत्यंत सहिष्णुतेने आणि आदराने वागविले. वेद, गीता यांचेही संग्राहक धोरण प्रसिद्धच आहेत; पण पुढे पुजाऱ्यांची व धर्मवेत्त्यांची बुद्धी फिरली व त्यांनी आपल्याला हवी ती भर धर्मग्रंथात घालून एकाच वैदिक पंथातील दोन देवतांच्या भक्तांत परस्परांविषयी द्वेषबुद्धी निर्माण केली.

व्रतवैकल्यांना जे नियम होते ते थोडेसे सैल करावेत हे व्यवहारी धोरणसुद्धा शास्त्री-पंडितांनी पाळले नाही. फक्त यम, नियमामध्ये शास्त्री पंडीतांनी खाण्या-पिण्यामध्ये सारा धर्म उभारला होता. संत ज्ञानदेव, तुकाराम, नामदेव इ. वारकरी पंथाच्या लोकांनी बुवावाजी, कर्मकांड यावर कडाडून टीका केलेलीच आहे; पण कर्मकांडाचे वर्चस्व कमी झाले नाही. इंग्रजी राज्याच्या प्रारंभापर्यंत, जड धर्माच्या शृंखलेनी भारतीय समाज जखडला होता. अजूनही तो पूर्ण मुक्त झाला नाही. या संदर्भात डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धेंनी म्हटले आहे, ‘या कर्मकांडातून मुक्त झाल्याशिवाय देशाची प्रगती वेगाने होणार नाही; कारण मानवाची बुद्धी, प्रज्ञा, विचारशक्ती, चिंतनशक्ती, निर्णयशक्ती या सर्वांची शास्त्री-पंडितांनी हत्याच केली आहे.’

धर्म म्हणजे मनाची उन्नती, मनाचा विकास, धर्म म्हणजे सद्‌गुण, संवर्धन, प्रज्ञाबल, बुद्धिबल यांचे पोषण. थोडक्यात धर्म म्हणजे मनुष्याच्या व्यक्तित्वाचा विकास असा अर्थ साऱ्याच तत्त्ववेत्त्यांनी सांगितलेला आहे.

जर्मन पंडित ज्युलियस जॉली म्हणतो, ‘रूढी, धर्मशास्त्र रचणारे ग्रंथकार हे परिस्थिती पाहून कधी लिहीत नसत. या शास्त्रांचा वास्तवाशी काहीही संबंध नव्हता. भोवतालच्या जगातील व्यवहारापासून ते अगदी अलिप्त असत. हिंदू राज्ये पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळत असताना हे शास्त्री-पंडित पाल अंगावर पडली तर कोणते प्रायश्चित्त घ्यावे या विचारात गर्क होते.’ (इ) जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्री खंड ३, ४ पान क्र. २५, २८. (१९२४)

धर्माचा उदय मूलत: मानवाच्या मनोविकासासाठी, त्याच्या उन्नतीसाठी, त्याच्या गुणोत्कर्षासाठी झालेला असतो; पण धर्माच्या या अंतिम हेतूचा विसर पडला की, धर्माला कर्मकांडाचे रूप येते व त्यामुळे समाजाचा अध:पात होतो. हा धर्म तिथीवर, बाह्यकर्मावर, खाण्यापिण्यावर जड देहाच्या संस्कारावर म्हणजे टिळे, टोपी, भस्म, सोवळेओवळे यावर भर देऊ लागतो. मध्ययुगीन धर्ममार्तंडांनी, शास्त्री-पंडितांनी याचा अतिरेक करून हिंदू समाज रसातळाला नेला.



धार्मिक स्थळ याचा उपयोग पंडे आणि बडवे यांनी धंदा म्हणून केला आणि तो फायदेशीर होतो आहे असे म्हटल्यावर भारतात दरसाल हजारो तीर्थक्षेत्रे निर्माण होऊ लागली. मग या कल्पित क्षेत्रांची कल्पित महाले रचली जाऊन ती व्यासांच्या माथी मारली जाऊ लागली आणि पुढे प्रत्येक गोष्टीचे, विधीचे, आचारांचे अवडंबर झाले. यातूनच पंडे यांच्या लोभी वृत्ती पोसल्या गेल्या. त्यातूनच यात्रेकरूंची लूट व नागवणूक सुरू झाली. मध्ययुगीन शास्त्री-पंडितांनीच धर्माला अधर्म बनवले आणि हे केवळ तीर्थयात्रांच्या बाबतच नव्हे तर कालनिर्णय, तिथींचे शुभाशुभ, सोयेरसुतक या प्रत्येक बाबतीत धर्मसूत्रे व स्मृती यात एकपट असेल तर त्याचे दसपट करून मांडायचे हाच एक मध्ययुगीन शास्त्री-पंडितांचा छंद झाला. (य) म. म. काणे हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र खंड ४ था. पृ. ५८०.

निवृत्ती आणि जातिभेद यांच्याप्रमाणेच भारतीयांच्या अवनतीचे तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या मनावरील पुराणवर्चस्व हे होय. या वर्चस्वामुळे वास्तव जगापासून आम्ही फार दूर गेलो. इतिहास, भूगोल या कल्पनाच हिंदूंच्या मनातून नाहीशा झाल्या. पाश्चात्त्य लोक जगप्रवास करीत असताना अखंड पृथ्वी व दहावे खंड काशी असा भारतीयांचा भूगोल होता. उन्नती-अवनती, जय-पराजय, उत्कर्ष वा अपकर्ष हे सर्व पाप-पुण्यामुळे, दैवयोगामुळे, परमेश्वरी इच्छेने घडत असते, ही त्यांची ऐतिहासिक घडामोडींची मीमांसा होती. या काळाच्या दरम्यान युरोपात कार्यकारणभावाचा अभ्यास चालू झाला होता. रामायण आणि महाभारत या वास्तववादी काव्यालाही चमत्कारी रूप दिले. चमत्कारनिष्ठ दुबळे, भोळेभाबडे असे भारतीय मन परमेश्वरी चमत्कारांच्या कथा पसरवल्याने अधिक दुबळे बनले. त्यामुळे कर्तृत्वहीन व दुबळी प्रजा निर्माण झाली.

तत्त्वज्ञान, नीती आणि आचार ही धर्माची अंगे होत. नीतिच्या दृष्टीने पाहाता सत्य, दया, परोपकार इ. नीतिची शाश्वत तत्त्वे होत; परंतु धार्मिक ग्रंथ आणि रूढी यांच्या शृंखलात भारतीय समाज जखडला गेला. सत्पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी तत्सम गोष्टीत गुंतल्याने स्वतंत्र आचार तर

राहोत; पण स्वतंत्र विचार करण्याचीसुद्धा इथे सोय नव्हती. केवळ संशयानेही एखाद्या व्यक्तीवर किंवा कुटुंबावर बहिष्कार पडत असे. त्यामुळे त्या माणसाचे जीवनच उद्ध्वस्त होण्याचा प्रसंग येई. युरोपमध्येही बाराव्या-तेराव्या शतकापर्यंत धर्माचार्यांच्या बाबतीत अशीच स्थिती होती; पण तेथे जॉन हस ल्यूथर कल्हिन, कोपरनिकस, केपलर, गॅलिलिओ इ. धाडसी लोकांनी पोपशाहीशी लढा देऊन त्यांची सत्ता हाणून पाडली आणि प्रगतीचा मार्ग खुला केला. तसा प्रयत्न भारतात झाला नाही. त्याला कारण जातिनिर्बंध. परंपरा आणि धर्मग्रंथ यामुळे हे जातिनिर्बंध कडक राहिले. मनुष्य एकदा स्वबुद्धीने विचार करेनासा झाला, तो वचन प्रामाण्याच्या आहारी गेला की, त्याची सर्व प्रगती खुंटते. त्यामुळे विविध क्षेत्रांत आम्ही मागे पडलो आणि मुस्लिम, पोर्तुगीज, इंग्रज जो येईल त्याच्या आक्रमणास भारत बळी पडत गेला. जातिभेदामुळे क्रांती ही कल्पना भारतात रुजू शकली नाही. त्यामुळे परिवर्तन नाही, त्यामुळे उत्कर्षही नाही. भौतिक विद्येविषयी, ऐहिक उत्कर्षाविषयी एकही ग्रंथ निर्माण झाला नाही. पेशवाई संपून इंग्रजी राज्य प्रस्थापित होताच पुढच्या पाऊणशे वर्षात ऐहिक विषयांवर शेकडो ग्रंथ निर्माण झाले. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी हे महाराष्ट्रातील विचारवंत ऐहिक विषयावर लिहू लागले. राजकारण, लोकशाही, कारखानदारी, स्त्री-पुरुष समानता, व्यापार, वचन प्रमाण्य, इतिहास, पुरातत्त्वसंशोधन संत, पंडित, शाहीर यापैकी कोणीही विषयांना स्पर्श केला नाही. याबाबत सर्वस्वी ते उदासीन राहिले.

धर्मग्रथांचे तुमच्या जीवनातील स्थान कोणते या प्रश्नाला 'मार्गदर्शक' म्हणणारे ८०% लोक आढळले. धर्मग्रंथ जीवनात उपयुक्त आहेत असे म्हणणारे १७% आहेत, तर निरुपयोगी म्हणणारे ४% आढळतात. आजही भारतीयांच्या जीवनात धर्मग्रंथांचे स्थान फारच मोठे आहे. अशिक्षित अशा महिला वर्गात धर्मग्रंथांना उपयुक्त असे स्थान आहे, तर सुशिक्षितांत मार्गदर्शक असे स्थान आहे. बऱ्याच लाकांना ते मार्गदर्शक आहेत म्हणून उपयुक्त वाटतात. अमिन फ्रफू सय्यद या पाचवी शिकलेल्या आणि गाडीवानाचा व्यवसाय करणाऱ्या तरुणाचे या प्रश्नाला उत्तर अतिशय



प्रामाणिकपणाचे होते. तो म्हणाला, ''खरं सांगू, मी जन्माने मुसलमान आहे; पण एकदाही कुराण वाचलेले नाही.'' एखाद्या मुल्ला-मौलवीलाही लाजवील असा हा हाडाचा प्रामाणिक मुसलमान खराखुरा धार्मिक आहे असे वाटते. करवीर तालुक्यामधील बी. डी. पाचाकटे हा तरुण धर्मग्रंथांबद्दल म्हणतो, 'धर्मग्रंथाबद्दल मांडलेली मते यामधून नैतिक आचरण शक्य आहे; कारण ज्ञानाने स्वर्गाची दारे खुली होतात. हे ज्ञान ग्रंथांच्या माध्यमातून मिळते. विज्ञानातील लिखित ज्ञान ग्रंथच सांगतात. मूलत: नैतिकतेचे धडे हे ग्रंथांमधूनच समाज घेतो. त्यामुळे धमग्रंथांचे जीवनातील स्थान महत्त्वाचे ठरते.' या तरुणाच्या अनुभवाप्रमाणे धार्मिक व्यक्ती व धार्मिक ठिकाण यामधून अवडंबर माजवले जाते व मूळ ज्ञान दडपले जाते. दादू कांबळे नावाचा कोल्हापूरच्या कपिलतीर्थ मार्केटमधील एक हमाल म्हणतो, 'धर्माने माणसाचे पोट भरत नाही.' एकंदर त्याच्या विचारप्रमाणे धर्माबद्दल त्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे. त्याच्या दृष्टीने धर्माची गरज नाही. तो कधीही प्रार्थना, पूजाअर्चा, धार्मिक विधी यात सहभागी झालेला नाही. धार्मिक स्थान, धार्मिक उत्सव यात धर्म राहिलेला नाही असे त्याला वाटते. देणगी पेटीत तो कधीही पैसे टाकत नाही. धार्मिक मार्गदर्शकाची समाजाला गरज नाही असे त्याला वाटते. मूळ धर्मसंदेशाच्या विरुद्ध समाज वागतो असे त्याचे मत आहे. जातपात, धर्म, देश यावर नैतिक आचरण अवलंबून नाही असे त्याचे मत आहे म्हणून त्याला धर्मग्रंथ जीवनात निरुपयोगी वाटतात. त्याचप्रमाणे धर्माच्या नावावर सत्ता, पैसा, प्रसिद्धी सुखोपभोग घेणारे त्याला अजिबात धार्मिक वाटत नाहीत. शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अविनाश वसंत राजे या तरुणाची अशीच साधारण मते आहेत; पण त्याच्या मते धर्म व देवावर विश्वास ठेवून आपला स्वार्थ साधता येत नाही तर स्वकर्तृत्व व स्वकष्टावर आपले यश गाठता येते. मात्र हा तरुण धार्मिक स्थळी नेहमी जातो. सत्पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी व तत्सम उत्सवात तो नेहमी सहभागी होतो; पण त्याचे समर्थन तो तेथे गेल्याने शांती मिळते असे सांगून करतो. त्याचबरोबर नैतिक शिक्षणाचा सुधारणेसाठी निश्चित उपयोग होईल असे त्याचे ठाम मत आहे. तसेच ठाम मत पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या पत्रकार महेश कुर्लेकर यांचे आहे; परंतु ते देणगी पेटीत

पैसे टाकतात आणि ते धार्मिक स्थळीही जातात. कष्टाने शिक्षण घेतलेल्या शिवाजी विद्यापीठामध्ये काम करणाऱ्या विजय पवार या तरुणाला धर्मग्रंथातील संदेशात एकता आहे हे मान्य असूनही धर्मग्रंथांचे आपल्या जीवनातील स्थान निरुपयोगी आहे असे वाटते.

धर्मा-धर्मात एकता आहे यावर बहुतांश लोकांचा म्हणजे ६६% लोकांचा विश्वास आहे. निरनिराळ्या धर्मग्रंथांमध्ये प्रेम, शांती, बंधुभाव, अहिंसा याबाबत एकवाक्यता आढळते असे या लोकांना वाटते; परंतु मूळ धर्मसंदेशाच्या विरुद्ध समाज वागतो. तेही काही काही वेळा वागतो याबद्दल अनेकांचे मत आहे. मूळ धर्माला विसरून समाज भरकटत चालला आहे असे ४०.८% लोकांना वाटते. याच्या पूर्ण विरोधामध्ये ६.६% लोक आहेत. त्यांच्या मते धर्मसंदेशाच्या विरुद्ध समाज वागत नाही. धार्मिक ग्रंथ, धार्मिक व्यक्ती किंवा धार्मिक ठिकाणे हे समाजामध्ये नसतील किंवा त्यांची मते न घेतासुद्धा समाज प्रगती करू शकतो, असे मत ३४.२ टक्के लोकांचे आहे, तर यांच्या मदतीशिवाय समाजप्रगती अशक्य आहे म्हणणारे २५% आहेत, तर व्यक्ती किंवा ठिकाणे व धर्मग्रंथ यांचा समाजावरील पगडा अजूनही संपलेला नाही. फक्त एक तृतियांश लोक त्या पगड्यापासून मुक्त आहेत.जातपात, धर्म, देश यावर नैतिक आचरण अवलंबून आहे म्हणणारे ३१% लोक आढळतात. अनेकांना जातपात, धर्म, देश याचा आणि नैतिक आचरणाचा परस्पर संबंध नाही असे वाटते. त्यांची संख्या फक्त १६% आहे, तर जातीवर, धर्मावर, नागरिकत्वावर नैतिक आचरण अवलंबून नाही, असे बहुतांश लोकांना म्हणजे ५२.८% लोकांना वाटते.

समाजामध्ये वेळोवेळी काही धार्मिक स्थळी किंवा त्या संस्थांच्या प्रमुखाजवळ अनैतिकता आढळते. अशावेळी लोकांच्या प्रतिक्रिया दोन टोकाच्या असतात. काहींना संताप येतो. त्याचे प्रमाण ५०% आहे. विश्वास उडतो म्हणणारेही खूप आहेत, तर तसे चालायचेच असे म्हणणारे ५.४% आहेत; पण धार्मिक व्यक्तीसाठी वेळ, श्रम व पैसा देणारे ४२% लोक आहेत; तर ४०% लोक त्यापासून अलिप्त आहेत. धार्मिक व्यक्तींचा संबंध



न येणारे साधारण १६% आहेत. त्या व्यक्तीच्या प्रेमासाठी वेळ, श्रम आणि पैसा देणारे २५% आहेत, तर त्यामागे त्याग भावना असणारे १६% आहेत. याबाबतीमध्ये स्वार्थी उद्देशाने तेथे जाणारे अनेक असतात; परंतु तशी कबुली करणारे २ टक्केच आढळले. धार्मिक व्यक्तीकडे जाणाऱ्या त्याचप्रमाणे सत्पुरुषाची जयंती, पुण्यतिथी किंवा तत्सम उत्सवात कधी-कधी सहभागी होणारे ६१% लोक आहेत, तर नेहमी सहभागी होणारे २४% आहेत. तिकडे अजिबात न फिरकणारे १४% आढळतात. या कृतीमागील हेतू शोधताना बहुतांश लोक शांती, समाधान मिळते म्हणून जाणारे आढळले. त्यांचे प्रमाण ६४% आहे. एकंदरीत आजच्या समाजात धार्मिक मार्गदर्शकांची गरज आहे असे अधिकतर लोकांना वाटते. धार्मिक उत्सवात सहभागी होणारे आधिक आहेत; मात्र धार्मिक व्यक्तीचे आचरण चांगले असावे अशी समाजाची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे धर्मग्रंथांचा पगडाही समाजावर आहे हे मान्य असून धर्माधर्मातील संदेशात एकसमानता असूनही समाजाचे वागणे अयोग्य असते हे पटते; परंतु त्यानुसार समाजाची वर्तणूक होत नाही. धर्माच्या नावावर पैसा, सत्ता, प्रसिद्धी, सुखोपयोग घेणारे अजिबात नैतिक नाहीत असे ७२% लोकांचे मत आहे. पण श्रीशैलसारख्या आंध्र प्रदेशातील एका धर्मशाळेच्या व्यवस्थापकाच्या मतानुसार नैतिक आचरण हे जातीवर अवलंबून आहे आणि धर्माच्या नावावर पैसा मिळवणारे थोडेफार नैतिकच ठरतात, तर फ्रेंच भारतीय प्रवासी स्टिफन क्रसनिओस्की यांच्या मते यातले संदर्भ महत्त्वाचे आहेत. पाश्चात्त्य देशांमध्ये याबाबतची विचारधारा भारतापेक्षा भिन्न आहे.

आबासाहेब देसाई, वय वर्षे ८१. त्यांचे धर्मग्रंथाबद्दल मत असे की, प्रत्येक धर्माचे वेगवेगळे ग्रंथ आहेत. हिंदू धर्मात तर इतके ग्रंथ, पोथी-पुराणे भरली आहेत की, त्यांचा समतोल अभ्यास करावा म्हटले तर त्या सर्व ग्रंथ, पोथी-पुराणांचे वाचन करण्यास आयुष्य पुरणार नाही. त्याचप्रमाणे सर्व ग्रंथांतील सर्व गोष्टी खऱ्या असतील असे म्हणता येणार नाही. उदा. सत्यनारायणाची पोथी. अशा काल्पनिक पोथी-पुराणावर

विश्वास ठेवणे अयोग्य आहे. मनुस्मृतीसारखा ग्रंथ तर निव्वळ विशिष्ट जातीच्या हितरक्षणार्थच केलेला आहे. देव या कल्पनेबद्दल ते असे म्हणतात की, प्रत्येक धर्मात देव निराळे आहेत; पण हिंदूंच्या देवांची संख्या माणसांपेक्षाही जास्त आहे. हे देव माणसानेच निर्माण केले. त्यांच्यासंबधी भाकडकथा रचल्या.असे देव नवसाला पावतात म्हणून त्यांची प्रार्थना करायची म्हणजे हा केवळ मूर्खपणा आहे. देव हा जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी भरून उरलेला आहे, याचा अर्थ पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते म्हणजेच देव. त्यात अंत ना पार अशी शक्ती सामावली आहे. त्यामध्ये विज्ञानाचा समावेश आहे. विज्ञानाच्या सहाय्याने मानवाने प्रगती केली असली तरी, या महाशक्तिचा अद्याप अंदाज आलेला नाही हे खरे.

धर्म, जाती व विषमतेबाबत हे वयोवृद्ध गृहस्थ म्हणतात की, हिंदू धर्माइतकी जातिव्यवस्था व विषमता इतर कोणत्याही धर्मात नसेल. व्यवसायानुरूप जातिव्यवस्था करून ती वंशपरंपरेने चालू ठेवली हीच चूक होती. त्यातून अस्पृश्यता नामक आणखी मोठी चूक निर्माण झाली. देवांची पूजास्थाने निर्माण करून त्यांच्या पूजेचे हक्क सुशिक्षितांनी आपल्याकडे ठेवून अज्ञानी, अशिक्षित लोकांची लूट केली. धर्माच्या नावावर कमी श्रमात भरपूर मिळकत कशी होईल याकडेच विशिष्ट वर्गाने लक्ष दिले. हा बुद्धिजीवी वर्ग कधी नांगर मारताना, बैलगाडी हाकताना किंवा हमाली करताना दिसणार नाही. याला कारण जाती आणि विषमता. म्हणून माणसाने सर्व प्रचलित धर्म, परंपरा, रूढी, जाती, या सर्व नष्ट करून निसर्गातील सर्वश्रेष्ठ शक्तीला परमेश्वर मानावे व मानवता हा एकच धर्म आणि माणूस ही एकच जात समजून इमानाने परोपकार बुद्धी जोपासून आपली प्रगती करून घ्यावी व शांती मिळवावी. जग सुखी होईल.

गणपतराव वडणगेकर यांच्या मते, मंदिराच्या पेटीत क्वचित प्रसंगी ते पैसे टाकतात. त्याचा उद्देश संकट निवारण किंवा दान असा नसून पुजाऱ्याचा चरितार्थ चालावा, देवळाचा खर्च चालावा असा असतो. धर्मपुरुषाच्या



ठिकाणी किंवा धार्मिक स्थळी अनैतिकता आढळल्यास त्यांना संताप येतो; पण धर्मावरचा विश्वास उडत नाही. धर्मग्रंथांबद्दल ते म्हणतात की मूळ धर्मसंदेशाच्या विरुद्ध समाज वागतो; परंतु त्याला कारण धर्मग्रंथांचे विपरीत अर्थ आहेत.

भक्ताच्या अंत:करणातील भाव व चित्रकाराच्या मनाचे भाव यांचा संगम चित्रात होतो. नैतिकतेविषयी श्री. गणपतराव वडणगेकर म्हणतात, ''गोया हा चित्रकार स्त्री संबंधात बिघडलेला होता;पण त्याने केलेले नग्न स्त्रीचे चित्र जगात उत्कृष्ट ठरते. याचा अर्थ नैतिकतेच्या कल्पना देश, कालपरत्वे भिन्न-भिन्न असतात. सत्पुरुषांच्या बाह्य वर्तनापेक्षा त्यांच्या आत काय दडले आहे, हे समजून घेणे भक्ताला महत्त्वाचे आहे. तसेच चित्रकारालाही. ज्या आर्टिस्टला ते समजेल, तोच उत्कृष्ट चित्र काढू शकेल. मी सरस्वतीचे चित्र काढले होते. ते चित्र पाहताच काही लोक नमस्कार करीत. त्यांचे हात आपोआप जोडले जात. देवतांची चित्रे पाहून अंत:करणात तसे भाव निर्माण झाले तर ती चित्रे पूजनीय ठरतात. एकजण शोधत-शोधत माझ्याकडे आला. तो म्हणाला, ''तुम्ही काढलेले दत्ताचे चित्र पाहिजे. दुसरे चित्र नको, कारण त्या चित्राच्या डोळ्यांत जादू आहे. त्यामुळे माझे व्यसन सुटले. मी नैतिक झालो.'' या चित्रकार वडणगेकरांच्या मते धार्मिक व्यक्ती, ठिकाणे वा धर्मग्रंथ यांच्या मदतीव्यतिरिक्त नैतिक आचरण शक्य नाही. याच्या उलट सी. पी. जगताप या वकीलसाहेबांच्या मते या साऱ्या व्यतिरिक्त नैतिक आचरण शक्य आहे. धर्मग्रंथांचे स्थान ॲडव्होकेट जगताप यांना निरुपयोगी वाटते; पण विविध धर्मग्रंथांत एकता आहे असे त्यांचे मत आहे. मात्र मूळ धर्मग्रंथांच्या विरुद्ध समाज वागत नाही, असे त्यांना वाटते. त्याचप्रमाणे आजच्या काळात धार्मिक मार्गदर्शकाची गरज नाही असे त्यांचे मत आहे. असे असूनही इतर जातात म्हणून कधी कधी सत्पुरुषांची जयंती, पुण्यतिथी वा तत्सम उत्सवात ते सहभागी होतात. सामाजिक संदर्भात धार्मिक स्थान, उत्सव यात धर्म राहिलेला नाही हे त्यांना पटत असून रूढींमुळे आपण धार्मिक विधी करतो, अशी असहाय्यताही ते व्यक्त करतात. ते

प्रार्थनाही करीत नाहीत आणि आधुनिक काळात धर्माची गरजही त्यांना वाटत नाही.

सदाशिवशास्त्री मारुलकर हे साधारण ८० वर्षांचे गृहस्थ. त्यांचे वडील कोल्हापूर येथील करवीर पीठाचे शंकराचार्य होते. काशीचे महापंडित पंडित मदनमोहन मालविया यांच्याशी त्यांचा संपर्क होता. ते सर्वशास्त्रसंपन्न होते. व्याकरण, वेदांत मीमांसा व न्याय या शास्त्रात पारंगत होते. त्यांना बंगाली भाषाही येत होती. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी त्यांची करवीपीठी भेटही घेतली होती. लोकमान्य टिळकांना तुमच्या गीतारहस्याचा अर्थ कर्मप्रधान अशा रितीने केलेला आहे, तो चुकीचा आहे असेसुद्धा पुण्यात गायकवाडवाड्यात जाहीरपणे सांगण्याचे धाडस त्यांना होते. त्यांचे चिरंजीव सदाशिवशास्त्री मारूलकर यांची मते महत्त्वाची आहेत. धर्म आणि विज्ञान दोहोंचीही गरज आहे, असे त्यांना वाटते. धर्मपालन ही व्यक्तिगत बाबही आहे आणि सामाजिक गरजही आहे. ते धार्मिक विधी करतात, पण ते रूढीपेक्षा मन:शांती व उदात्तीकरणासाठी. प्रार्थनेमुळे मन:शांती लाभते असे त्यांना वाटते. सामाजिक संदर्भात ते प्रार्थना पूजाअर्चा, यात्रा, उत्सव, धार्मिक विधी यात नेहमी सहभागी होतात.धार्मिक वातावरण व एकात्मता यासाठी ते सामुदायिक प्रार्थनेत सहभागी होतात. परंपरेने ते विशिष्ट दिवशी मंदिरात जातात; परंतु धार्मिक स्थान, उत्सव, विधी यात धर्म राहिलेला नाही असे त्यांचे ठाम मत आहे. धार्मिक ठिकाणच्या देणगी पेटीत ते पैसे टाकतात; पण ते दान म्हणून. त्याला ते शास्त्रधार सांगतात.

'रिक्तपाणिर्न पश्चेत्तु राजनं रेवतां गुरून् ।'

याचा अर्थ राजा किंवा देवता यांच्याकडे जाताना कधी रिक्त हस्ताने जाऊ नये. सदाशिवशास्त्रींच्या मते आजच्या काळातही धार्मिक मार्गदर्शकाची गरज आहे. ते शांती, समाधान मिळते म्हणून सत्पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी उत्सवात सहभागी होतात. त्याग भावनेने धार्मिक लोकांसाठी वेळ, श्रम व पैसेही देतात. त्यामागचा हेतू स्पष्ट करताना ते म्हणतात, 'स्वान्त: सुखाय.' धर्मपुरुष वा धार्मिक ठिकाणी अनैतिकता



आढळली तरी त्यांचा विश्वास उडत नाही. या शास्त्रींच्या मते, धार्मिक व्यक्ती, ठिकाण वा धर्मग्रंथ यांच्या मदतीशिवाय नैतिक आचरण शक्य आहे. याचा अर्थ समाजाच्या उत्कर्षासाठी या तिन्ही गोष्टींची मार्गदर्शक तत्त्वे म्हणून आवश्यकता राहिलेली नाही. हे स्वत: ब्राह्मण कुंटुबातील असूनही जातपात, धर्म, देश यावर नैतिक आचरण अवलंबून नाही असे त्यांचे मत आहे. धर्माच्या नावावर पैसा घेणारे, प्रसिद्धीच्या मागे लागणारे त्यांना अजिबात नैतिक वाटत नाहीत सदाशिवशास्त्री मारुलकरांप्रमाणे श्री. मा. शं. गणोरकरांनाही धर्माचा छंद करणारे नैतिक वाटत नाहीत; मात्र जातपात, धर्म, देशावर नैतिकता अवलंबून आहे असे त्यांना वाटते आणि नैतिक आचरणासाठी धार्मिक व्यक्ती किंवा धर्मग्रंथ यांची मदत अत्यावश्यक वाटते. मा. शं. गणोरकर हे माजी धर्मादाय आयुक्त म्हणून कोल्हापुरातून निवृत्त झाले. अनेक धर्मादाय ट्रस्ट त्यांनी हाताळले होते. तरीही सदाशिवशास्त्री मारुलकर वैचारिकरीत्या अधिक मोकळे वाटतात. सामाजिक संदर्भात आजही धार्मिक स्थान, उत्सव, विधी यात धर्म राहिला आहे असे त्यांना वाटते. परंपरेने ते धार्मिक स्थळीही जातात. देवाकडे आपण नवस बोलतो असे म्हणतात आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी धार्मिक ठिकाणी जाऊन व्यक्तीला भेटतात.

यशवंत श्रीखंडे हे सेवानिवृत्त शिक्षक. त्यांचे वडील डॉ. रा. चि. श्रीखंडे यांचा धार्मिक अभ्यास चांगला होता आणि त्यांची काही पुस्तकेही प्रसिद्ध झाली होती. श्रीखंडेंच्या मते, मन:शांतीसाठी प्रार्थना करावी, पण ती व्यक्तिगत असावी; कारण धर्मपालन ही व्यक्तिगत बाब आहे. त्यांचा नवसावर विश्वास नाही. धार्मिक व्यक्तीला ते भेटही देत नाहीत, समूहात ते जात नाहीत, किंवा यात्रा, उत्सव यात सहभागी होत नाहीत. धार्मिक स्थळी कधीही जात नाहीत. धार्मिक व्यक्ती वा ठिकाण पवित्र असणे अत्यावश्यक आहे. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काही वेळा देणगी पेटीत पैसे टाकतात. गुरूची गरज असून शांती, समाधानासाठी कधी कधी धार्मिक उत्सवात ते सहभागी होतात. त्या ठिकाणी धर्म राहिला आहे का याबाबत मात्र त्यांना

काही सांगता येत नाही; मात्र अशा ठिकाणी अनैतिकता चालायचीच अशी मवाळ भूमिका ते घेतात. धर्मग्रंथ त्यांना मार्गदर्शक वाटतात आणि त्याशिवाय नैतिक आचरण थोडेफार शक्य आहे असे त्यांना वाटते. पण नैतिक आचरण आणि जातपात, धर्म यांचा परस्परसंबंध नाही असे त्यांना वाटते.

प्रा. ए. व्ही. देसाई यांचा नवसावर विश्वास आहे. प्रार्थना, धार्मिक विधी, पूजाअर्चा यावर त्यांचा व्यक्तिगत व सामाजिक दोन्ही संदर्भात विश्वास आहे. आजच्या काळात गुरूची आवश्यकता त्यांना वाटते. धर्मग्रंथही त्यांना आवश्यक वाटतात; पण धार्मिक व्यक्ती, ठिकाण वा धर्मग्रंथ यांच्या मदतीशिवाय नैतिक आचरण शक्य आहे असे त्यांना वाटते आणि जातपात, धर्म यावर नैतिक आचरण अवलंबून नसते असे त्यांचे मत आहे.

श्री. नारायण शंकरराव मोरे यांचा पिंड धार्मिक. ते एका धार्मिक व्यक्ती व संस्थेसाठी काम करीत, पण तिथल्या अप्रामाणिक गोष्टींमुळे त्यांनी कोणत्याही धार्मिक व्यक्तीकडे जाणे बंद केले. पण आधीच्या काळात धार्मिक मार्गदर्शकाची गरज आहे असे त्यांचे मत आहे. धर्मग्रंथांचे त्यांच्या जीवनातील स्थान मार्गदर्शक असे आहे; पण धार्मिक ठिकाण, व्यक्ती वा ग्रंथ यांच्या मदतीशिवाय नैतिक आचरण शक्य आहे असे त्यांना वाटते. श्री. बी. ए. कलकुटगी हे कार्यकारी अभियंता आहेत. त्यांची पार्श्वभूमी गरीब, अशिक्षित व अडाणी अशा समाजाची, पण आधुनिक शिक्षणाच्या उपलब्धतेमुळे बऱ्याचशा जुन्या धार्मिक कल्पनेतून त्यांची पिढी बाहेर येऊ शकली. त्यांना धर्मपालन ही समाजिक बाब वाटते. पाप-पुण्याच्या कल्पना त्यांच्या मनात आहेत. त्यामुळे धार्मिक विधीमागे पापक्षालन व्हावे अशी त्यांची मनोभावना दिसते. त्यांचा नवसावर विश्वास नाही किंवा ते धार्मिक व्यक्तीकडे जात नाहीत. घरात धार्मिक वातावरण व्हावे म्हणून ते कौटुंबिक प्रार्थना करतात कधी-कधी पूजाअर्चेत सहभागी होतात. धार्मिक स्थळी नेहमी जातात; पण त्यामागचा हेतू ती परंपरा आहे म्हणून. दानाच्या हेतूने देणगी पेटीत ते पैसेही टाकतात. गुरूची गरज त्यांना वाटते. त्यागाच्या भावनेने गुरूसाठी वेळ, परिश्रम द्यावा असे त्यांना वाटते. धार्मिक उत्सवात ते सहभागी होतात. त्यातून त्यांना



शांती मिळते. नैतिकता ही धार्मिक ठिकाण, व्यक्ती व ग्रंथांवर अवलंबून आहे; मात्र एखाद्या धार्मिक व्यक्तीच्या ठिकाणी अनैतिकता आढळल्यास असेच चालायचे असे त्यांना वाटते. समाज काही वेळेला प्रेम, शांती, बंधुभाव, अहिंसा ही धार्मिक तत्त्वे विसरतो आणि द्वेष, अशांती आणि हिंसाचार यांचा अवलंब करतो असे आढळले आहे. जातीपातीवर नैतिक आचरण अवलंबून नाही असे त्यांचे ठाम मत आहे.

विनायक आबाजी सवई हे पूर्वी साखर कारखान्यात प्रशासकीय अधिकारी होते. ते तसे धार्मिक वृत्तीचे. विशिष्ट दिवशी ते धार्मिक स्थळी जातात. त्यामागचा त्यांचा हेतू त्या दिवशी विश्वशक्ती अधिक प्रगटते असा होय. धार्मिक ठिकाणच्या देणगी पेटीत त्यांनी कधी पैसे टाकले नाहीत. शांती, समाधान मिळते म्हणून धार्मिक उत्सवात ते सहभागी होतात; पण जाती-धर्मावर त्यांचा विश्वास आहे. धार्मिक भावनांची जोपासना करून नैतिकतेचा ऱ्हास थांबवावा आणि भारतीय संस्कृतीची खरी मूल्ये जतन करण्याची गरज आहे. त्यासाठी समाजात जागृती निर्माण व्हायला हवी असे त्यांना वाटते. हीच त्यांच्या दृष्टीतून निकडीची बाब होय.

नाशिकच्या अनिल दळवींच्या मते, धर्माची समाजाला गरज आहे. आजच्या काळात असे धार्मिक मार्गदर्शन हवे असे त्यांना वाटते. सध्या धर्माच्या नावावर सुखोपभोग घेणारे नैतिक वाटतात का, याला यांचे उत्तर इतरांपेक्षा वेगळे आहे. त्यांच्या मते, स्वत: उपभोग घेऊन अनेकांना त्यांनी जीवनात योग्य दिशा दाखवली त्याबद्दल आक्षेप घेण्यासारखे काही नाही.

एका खेड्यामधील होमिओपथीचे डॉ. पाटील हे म्हणतात की, धर्माशिवाय जीवन निरर्थक आहे. पुण्य मिळावे म्हणून ते धार्मिक विधी करतात व नेहमी धार्मिक स्थळी भेट देतात. विशिष्ट दिवशी धार्मिक स्थळी जाण्यामागे त्या दिवशी ईश्वरशक्ती अधिक प्रगट होते असे त्यांना वाटते. श्री. आर. डी. पाटील एका साखर कारखान्याचे सचीव. ते रूढीमुळे धार्मिक विधी करतात. एकंदरीत व्यक्तिगत व सामाजिक पातळीवर त्यांच्यावर धर्माचा पगडा आहे. गुरू आणि ग्रंथ त्यांना उपयुक्त वाटतात. त्यांच्या मते,

धर्माच्या नावाखाली जे धर्माचे गाढ अभ्यासक किंवा अधिव्याखाते म्हणवून घेतात, त्यांच्याकडून सर्वसामान्यांची पिळवणूक व लूबाडणूक होते. काही धर्मांची श्रेष्ठ मंडळी स्वार्थी राज्यकर्त्यांना पाठीशी घालतात. थोर विचारवंत व धर्म उपासकांनी स्वत:वर नैतिक बंधने घातली, तर सर्व समाज त्यांच्या पद्धतीचे चांगले व मौलिक अनुकरण करेल.

पन्हाळा तालुक्यातील एक पदवीधर तरुण म्हणतो, देशाविषयीचा स्वाभिमान, स्वत:चा देव आणि स्वत:चा धर्म यातूनच जीवनाचे प्रबोधन होते. त्याच गावचे श्री. पाडुरंग गोपाळ सणगर हे मुख्याध्यापक म्हणतात, जातपात ही उंबरठ्याच्या आत असावी; मात्र घराबाहेर एकच धर्म असला पाहिजे. गोटखिंडी गावचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेले एन. के. जाधव यांच्या मते, धार्मिक वृत्ती असावी; परंतु त्याचा समाजसुधारणेत अडसर नसावा. देश विकासावर अनिष्ठ परिणाम करणारे जातिभेद व धर्म नकोत. देव, धर्म, पूजाअर्चा यामुळे मानसिक समाधान लाभते. धर्मग्रंथ वाचनाने जीवनविषयक मार्गदर्शन लाभते. तसेच जीवनात योग्य वर्तन कसे असावे हे समजते.

ए. एम. पाटील हे डोणोलीचे शिक्षक म्हणतात, संपूर्ण समाज संभ्रमावस्थेतून वाटचाल करीत असल्याने सामाजिक प्रगती होणे अडचणीचे ठरले आहे. भडकंबे, ता. वाळवा येथील तरुण शिक्षक ए. एम. पाटील यांच्या मते, सध्या मानवता हा धर्म मानला पाहिजे. मानवातील स्नेह , आदर, प्रेम लोप होत आहे. देशनिष्ठा, सामाजनिष्ठा ऱ्हास पावत आहे. केशव बाकाराम गवळी हे लष्करातील निवृत्त सुभेदार, व्यवसायाने चर्मकार. त्यांना धर्माची गरज आहे की नाही, हे सांगता येत नाही; पण विज्ञान त्यांना आवश्यक आहे असे वाटते. नवसावर त्यांचा विश्वास नाही.एकात्मता त्यांना महत्त्वाची वाटते. स्वधर्माबद्दल त्यांना स्वाभिमान वाटतो. धार्मिक व्यक्ती किंवा ठिकाणी त्या कामापुरते मांगल्य असावे असे त्यांना वाटते. गुरूची गरज आहे की नाही, सांगता येत नाही. धर्मग्रंथांमुळे त्यांना मार्गदर्शन लाभते. धर्मग्रंथांतील प्रेम, शांती, बंधुभाव सर्वच धर्मांत जाणवतो; मात्र धर्माप्रमाणे समाज वागत नाही. धर्मामुळेच नीतिमत्ता आहे; मात्र जातिभेद योग्य नाही



असे त्यांना वाटते. दलित समाजातील शेती करणारे व शहरात फेरीवाल्याचे काम करणारे शामराव पवार यांच्या मते, धर्माची गरजच नाही आणि धर्मपालनाची गरज उरलेली नाही. ते प्रार्थना करीत नाहीत पण आपले काम व्हावे म्हणून ते देवाकडे नवस बोलतात. यात्रा, उत्सवामुळे समूहजीवन लाभते असे त्यांना वाटते. विशिष्ट दिवशी ईश्वर प्रगटतो म्हणून देवळात लोक जातात असे त्यांना वाटते. मंदिरातील देणगी पेटीत पैसे टाकल्याने संकट निवारण होते अशी त्यांची भावना आहे. साधुसंतांच्या उत्सवात शांती, समाधान मिळते म्हणून ते काम करतात. नैतिकतेचा त्यांना अर्थ स्पष्ट झालेला नाही.

नागेश कृष्णा हुकेरीकर हे ६८ वर्षांचे गृहस्थ जुन्या पिढीतील पेन्शनर असून जुन्या पिढीत मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतले आहे. त्यांना धर्म व विज्ञान दोन्ही आवश्यक आहे असे वाटते. ते नितांत धार्मिक आहेत; पण धार्मिक स्थान, उत्सव, धार्मिक विधी यात धर्म राहिलेला आहे असे ते ठामपणे म्हणत नाहीत. काही वेळेला समाज धर्माविरुद्ध वर्तन करतो. नैतिक शिक्षणामुळे समाज थोडाफार सुधारेल असे त्यांना वाटते. त्यांच्या मते हवा, पाणी, सूर्य, पृथ्वी व अंतरिक्ष या पाच महाशक्ती आहेत. त्यातच परमेश्वर आहे.

रामचंद्र हुकेरीकर हे एका बँकेत कॅशिअर आहेत. त्यांच्या मते, धार्मिक विधीमुळे मन:शांती मिळते. नवसावर त्यांचा विश्वास नाही; कारण नवस हा व्यवहार आहे, व्यापार आहे. ते कधी-कधी धार्मिक व्यक्तीकडे जातात; पण कोणतेतरी फळ मिळावे या हेतूने नव्हे तर चांगले मार्गदर्शन मिळावे म्हणून. ते नेहमी देवळामध्ये जातात; पण विशिष्ट दिवशी जाण्यामागचे प्रयोजन नसते असे त्यांना वाटते. सर्व दिवस सारखेच असतात, विशिष्ट दिवशीच ईश्वरशक्ती अधिक प्रगटते हा एक सर्वमान्य भ्रम आहे. सत्पुरुषांची जयंती, पुण्यतिथी व तशाच उत्सवामध्ये ते अजिबात जात नाहीत; कारण त्यामागचा लोकांचा हेतू प्रसिद्धी आणि प्रदर्शन असा असतो. कधी-कधी ते धार्मिक लोकांसाठी त्यांचा वेळ, श्रम, पैसा देतात. त्यामागचा त्यांचा

हेतू त्यागभावना हा असतो. त्यांच्या मते सामाजिक संदेश देणारे बरेच आहेत; परंतु आचरण करणारे क्वचितच आहेत. जातीपातीवर चांगले आचरण अवलंबून नाही; पण गुरू, धर्मस्थान व ग्रंथ यांच्यामुळे नैतिक आचरण शक्य आहे. वसंतराव लिंगम हे ६० वर्षांचे गृहस्थ धर्म ही सामाजिक बाब आहे अशा विचारापर्यंत पोहोचले आहेत. नवसावर त्यांचा विश्वास नाही, किंवा धार्मिक व्यक्तीकडे ते जात नाहीत. देणगी पेटीत पैसे कृतज्ञता म्हणून टाकतात. स्वाभिमानापेक्षा पावित्र्य त्यांना महत्त्वाचे वाटते. धार्मिक ठिकाणे, उत्सव, विधी यात अजूनही धर्म आहे असे त्यांना वाटते. धर्माशिवाय जीवनात काही नाही असे ते म्हणतात.

कोल्हापूरच्या कपिलतीर्थ मार्केटमध्ये काम करणारा ४५ वर्षांचा दादू कांबळे हा हमाल म्हणतो की, धर्म माणसाचे पोट भरत नाही. तो अशिक्षित असला तरी विज्ञानामुळे झालेल्या प्रगतीबद्दल त्याला उत्सुकता आहे. त्याला धर्माची गरज वाटत नाही. तो कोणत्याही पूजाअर्चेत, प्रार्थना मेळाव्यात जात नाही. समाजात धर्मच राहिलेला नाही, असे त्याला वाटते. धार्मिक व्यक्ती किंवा ठिकाणे याबद्दलची त्याची भावना नकारात्मक आहे. महाराज, गुरू लोकांची गरज नाही असे त्याला वाटते. धर्मपुरुष किंवा धार्मिक स्थळे यांच्याकडे नीतिमत्ता नाही व त्यामुळे धार्मिक शिक्षणाचा समाजसुधारणेसाठी काही उपयोग होणार नाही असे त्याचे मत आहे. रसायनशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अविनाश वसंत राजे या तरुणाच्या मते, धर्म व देवावर विश्वास ठेवून आपला स्वार्थ साधता येत नाही, तर स्वकर्तृत्व व स्वकष्टावर जीवनात आपण यशस्वी होतो. धर्मग्रंथ किंवा धार्मिक मार्गदर्शक किंवा धार्मिक ठिकाणे यांची आज देशाला गरज नाही असे त्याला वाटते. चंद्रशेखर जोशी (वय ५०) एका हायस्कूलमध्ये नोकरी करतात  यांना वाटते की, स्वत:साठी व देशासाठी धर्मनिष्ठेची गरज आहे.

तुकाराम महादेव पाडगावकर हे पुरोहिताचा व्यवसाय करतात. त्यांचे वय ५३ वर्षे आहे. मराठी चौथीपर्यंत शिक्षण झाले आहे. व्यवसायाने पुरोहित असूनही त्यांना आधुनिक काळात धर्माची गरज आहे की नाही, हे सांगता



येत नाही. धर्मपालन ही सामाजिक गरज आहे. ते दुसऱ्यांसाठी मोबदला घेऊन धार्मिक विधी करतात. तरीही त्यांना पुण्य मिळावे म्हणून दुसऱ्यासाठी विधी करतो असे वाटते. ते स्वत: प्रार्थना करतात. त्यामागचा हेतू संकट टळावे असा असतो. देवाकडे नवस बोलतात. आपल्यापेक्षा एखादी धार्मिक व्यक्ती देवाकडे गाऱ्हाणे चांगल्या रीतीने मांडेल म्हणून धार्मिक व्यक्तीकडे ते जातात. एकत्रित प्रार्थना करीत नाहीत. धार्मिक विधीशी सतत संपर्क येऊनही मंदिर, उत्सव, धार्मिक विधी यात धर्म राहिलेला आहे की नाही, हे आपणाला सांगता येत नाही असे त्यांचे मत आहे. महालक्ष्मीला शुक्रवारी व शनिवारी मारुतीला, गुरुवारी दत्ताला जाण्याचे कारण त्या-त्या दिवशी ती-ती देवता शक्ती प्रगट होते. धार्मिक व्यक्ती किंवा ठिकाणी मांगल्य, पावित्र्य अत्यावश्यक आहे असे त्यांना वाटत नाही. मंदिरामधल्या देणगी पेटीत ते पैसे टाकत नाहीत. दान वगैरे करण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही. धार्मिक मार्गदर्शकाची गरज आहे असे त्यांना वाटते; पण धार्मिक लोकांसाठी ते आपला वेळ, श्रम, पैसा द्यायला तयार नाहीत. इतर धर्मग्रंथांचा तौलनिक अभ्यास नसल्याने त्या साऱ्यांमध्ये थोडीफार एकता आहे असे त्यांना वाटते. धर्मसंदेशाच्या विरुद्ध समाज वागतो असे मात्र त्यांचे ठाम मत आहे. नैतिक आचरणासाठी धार्मिक व्यक्ती, ठिकाण वा ग्रंथ यांची त्यांना फारशी गरज वाटत नाही. धार्मिक शिक्षणाचा समाजसुधारणेसाठी काहीही उपयोग होणार नाही असे त्यांना वाटते.

संदीप रंगराव देसाई या पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या तरुणाच्या मते, नैतिकतेच्या कल्पना देशसापेक्ष आहेत, तर समाजसुधारणेसाठी राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे असे राजेश हंकारे या तरुणाला वाटते. अरुण गंभीरे हा एम. फिल. चा विद्यार्थी समाजसुधारणेसाठी शिक्षणाबरोबरच प्रत्येकाने आपापली नैतिक जबाबदारी पार पाडली पाहिजे या मताचा आहे. अशोक बाचूळकर या शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्याला वाटते की, धार्मिक आचरण बदलले पाहिजे; जेणेकरून सर्व समाज एकत्र येऊन शांती नांदू शकेल. चतुर्भुज गिड्डे या पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या तरुणाला धर्मामुळे समाज

विभागला जातो ही कल्पनाच चुकीची वाटते. नंदू माने या विद्यार्थ्याला सर्वधर्मांत मानवधर्म श्रेष्ठ वाटतो. दिनकर देसाई या ५४ वर्षांच्या सुशिक्षीत व्यक्तीला संकटात आधार म्हणून कूलस्वामिनीची उपासना आवश्यक वाटते. धर्मापेक्षा विज्ञानाला मानणाऱ्या ६४ वर्षीय सज्जनराव माने चित्रकारास धर्माची गरज नाही असे वाटते. त्यांचा नवसावर विश्वास नाही; परंतु ईश्वरावर विश्वास आहे. शांती-समाधान मिळते म्हणून धार्मिक उत्सवात ते सहभागी होतात. मंदिरात न जाता, धर्मग्रंथ न वाचता माणूस नैतिक राहू शकतो असे त्यांचे मत आहे. धर्माची गरज नाही असे म्हणणारा पत्रकार महेश कुर्लेकर नेहमी मंदिरात जातो; कारण ईश्वर तेथे अधिक प्रगटलेला असतो अशी त्याची भावना आहे, पण धार्मिक गुरूची गरज नाही आणि धार्मिक ग्रंथ निरुपयोगी आहेत असे त्याला वाटते. वसंत खरात हे निवृत्त शिक्षक म्हणतात की, धर्माचे अवडंबर न करता सामाजिक पातळीवर नीतिशिक्षणासाठी धर्माचा उपयोग करावा. धर्म मानणारे एक शाखा अभियंता बाबूराव पाटील यांच्या मते, धार्मिक व्यक्तीकडे आपण जातो ते त्यांच्याकडून वैचारिक प्रबोधन व्हावे म्हणून.

आजिंक्य आप्पासाहेब वरेकर या १६ वर्षांच्या विद्यार्थाच्या मते, धर्माची कोणती व्याख्या यावर त्याची आधुनिक काळातील गरज अवलंबून आहे. आप्पासाहेब रामचंद्र सुतार ही ५० वर्षे सुशिक्षित शेती व्यवसाय करणारी व्यक्ती व एका धार्मिक व्यक्तीसाठी व संस्थेसाठी आयुष्याचा काही काळ समर्पण करणारी व्यक्ती त्यापासून झालेली फसवणूक, कालापव्यय याची खंत त्यांना असली तरी धर्म, प्रार्थना, ईश्वरी कृपा, धार्मिक ग्रंथ किंवा व्यक्ती यावर त्यांचा विश्वास आहे. सर्व धर्मांकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदार असावा आणि जातपात, धर्म यावर नैतिक आचरण अवलंबून आहे असे त्यांना वाटते; मात्र नैतिक शिक्षण आवश्यक असून त्याचा समाजसुधारणेसाठी उपयोग होईल असे त्यांना वाटते. श्री. पी. ए. पाटील या योगाभ्यासी ५५ वर्षांच्या व्यक्तीला नैतिक शिक्षणाचा समाजसुधारणेला फारच थोडासा उपयोग होईल असे वाटते. धर्मग्रंथ किंवा व्यक्ती या नसतील



तर थोडेफार नैतिक आचरण होऊ शकेल. गुरूची आवश्यकता त्यांना वाटते; पण आधुनिक काळात धर्माची गरज नाही असे त्यांचे मत आहे. पाप-पुण्यावर त्यांचा विश्वास आहे, पण नवसावर नाही.

बाबासाहेब निंबाळकर हे लघु उद्योजक. यांच्या मते, परिस्थितीमुळे हतबल झाल्यानंतर माणूस धर्माकडे आधारासाठी येतो. सुरेश साखळकर हे व्यावसायिक म्हणतात, धर्म हा विकत घेतला जात नाही. उत्तरेपेक्षा दक्षिण भारतात धर्म अधिक शुद्ध स्वरूपात आढळतो.

विलास दुलाजी धुरी हा तरुण धार्मिक बाबतीत थोडासा नकारात्मक आहे. त्याला धार्मिक व्यक्ती किंवा धर्मगुरू यांची आवश्यकता वाटत नाही. धर्मसंदेशाच्या विरुद्ध समाज वागतो असे त्याला वाटते. धर्माधर्मांत एकता नाही असे त्याला वाटते. धार्मिक लोकांसाठी श्रम, पैसा, वेळ तो देतो; पण त्यामागे आपला हेतू स्वार्थी असतो असे तो प्रमाणिकपणे कबूल करतो. रमेश देसाई या तरुणाला धर्म नेमका कोठे आहे, हे सांगता येत नाही. तो धार्मिक स्थळी कधीही जात नाही किंवा देणगी पेटीत पैसेही टाकत नाही; पण धार्मिक मार्गदर्शक किंवा धर्मग्रंथ यांची जीवनामध्ये आवश्यकता आहे असे त्याला वाटते. संदीप माळवी या तरुणाच्या धर्मगुरू, धार्मिक ग्रंथ वा प्रार्थना, पूजाअर्चा, यात्रा, उत्सव या साऱ्यांबाबत भावना नकारात्मक आहेत. त्याला या साऱ्यात धर्म राहिलेला नाही असे वाटते; पण एवढे असूनही आधुनिक काळात धर्माची गरज आहे असे वाटते. याउलट श्रीकांत कांबळे या तरुणाला आज धर्माची गरज नाही किंवा धर्मग्रंथही निरुपयोगी आहेत, परंतु धार्मिक मार्गदर्शन आवश्यक आहे असे वाटते. नरेंद्र रावराणे या वृत्तपत्र क्षेत्रातील मार्केटिंगमध्ये काम करणाऱ्या तरुणाला विज्ञानाचा आधार असणारा धर्म आवश्यक आहे असे वाटते. धार्मिक व्यक्तीकडे तो जात नाही. मंदिरात जाणे आवडते, पण ते परंपरेने. धनवंतराव देशमुख या बुलढाणा जिल्ह्यातील शिक्षकाला समाज धर्मसंदेशाप्रमाणे वागतो असे वाटते व धार्मिक उत्सव किंवा विधीत धर्म राहिला आहे की नाही, हे मात्र सांगता येत नाही.

प्रकाश देशमुख, पोफळी, जिल्हा बुलढाणा येथील तरुण नवसावर विश्वास

ठेवत नाही; पण प्रार्थना करतो. नेहमी मंदिरामध्ये ईश्वरशक्ती प्रगटते म्हणून जातो.

श्रीमती इंदुमती केशवराव देसाई या माझ्या मातोश्री. कुटुंबासाठी त्या प्रार्थना करतात. प्रार्थनेमुळे ईश्वरी कृपा लाभते असे त्यांना वाटते. त्यांचा नवसावर विश्वास नाही. त्यांनी आतापर्यंत कोणत्याही धार्मिक व्यक्तीला भेट दिलेली नाही. विशिष्ट दिवशी ईश्वरी शक्ती अधिक प्रगटते यावर त्यांचा विश्वास आहे. धर्मपालन ही व्यक्तिगत बाब आहे असे त्यांना वाटते. धार्मिक विधी करण्यामागे रूढींचा दबाव असतो असे त्यांना वाटते. स्वधर्माबद्दल त्यांना स्वाभिमान वाटतो. संकट निवारणासाठी क्वचित प्रसंगी देणगी पेटीत त्या पैसेही टाकतात. मात्र धार्मिक स्थान, धार्मिक उत्सव किंवा धार्मिक विधी यात धर्म राहिलेला नाही असे त्यांचे मत आहे. प्रेमासाठी, धार्मिक व्यक्तीसाठी, वेळ, श्रम, पैसा देणे यात त्यांना काही गैर वाटत नाही. मंदिर किंवा आश्रम, मशीद, दर्गे किंवा चर्च अशा ठिकाणी पावित्र्य अत्यावश्यक आहे असे त्यांचे मत आहे. सत्पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी उत्सवात कधी-कधी सहभागी होण्यातून त्यांना शांती-समाधान लाभते. जीवनात धर्मग्रंथांमुळे मार्गदर्शन लाभते. मूळ धर्मसंदेशाविरुद्ध काही वेळेला समाज वागतो, तर धार्मिक व्यक्ती, ठिकाण किंवा धर्मग्रंथ यांच्या मदतीशिवाय नैतिक आचरण शक्य आहे असे त्यांना वाटते आणि सध्याच्या एकूणच समाजात नैतिक शिक्षणाचा समाजसुधारणेसाठी उपयोग होईल असे त्यांना वाटते. ज्ञानदेव हरी शिंदे हे कोल्हापूरच्या छत्रपतींकडे राजपुरोहित होते. त्यांचे वय ९० वर्षे आहे. शिक्षण नॉनमॅट्रिक. संस्कृत व मोडीचा अभ्यास आणि चित्रकार आबालाल रेहमान यांचे विद्यार्थी. त्यांच्या मते, धर्मपालन ही व्यक्तिगत बाब आहे. त्यांचा नवसावर विश्वास नाही. रूढींचा पगडा त्यांना जाणवतो. त्यांच्या मते, मंदिरामध्ये किंवा धार्मिक उत्सवात आता खरा धर्म राहिलेला नाही; पण इतर लोक जातात व अनेक वर्षांची सवय म्हणून ते मंदिरात जातात. स्वत:च्या धर्माच्या मंदिराबद्दल त्यांना स्वाभिमान वाटतो. धार्मिक मार्गदर्शकाची गरज आहे असे त्यांना वाटते; पण आता ते कोणा धार्मिक व्यक्तीसाठी वेळ देत नाहीत. धार्मिक स्थळी



काही साधुसंत दारू, गांजा, भांग ओढतात, तसे चालायचेच; पण स्त्री-संबंधाबाबत घृणा उत्पन्न होते. धर्मग्रंथ मार्गदर्शक ठरतात. विविध धर्मांत एकता असते, तर नैतिक आचरण ही अनुकरण करण्याची प्रवृत्ती असावी लागते. जाती-जातीवर त्यांचा विश्वास नाही; पण समाजसुधारणेसाठी नैतिक शिक्षण आवश्यक आहे.

दीपक सूर्यवंशी हे विद्युत अभियंता म्हणतात, नैतिक आचरणासाठी धर्म व धर्म नियमांची आवश्यकता आहे. त्यासाठी धर्मग्रंथ मार्गदर्शक ठरू शकतात. वैज्ञानिक शिक्षणाप्रमाणेच नैतिक आचरणासाठी धार्मिक शिक्षणाचीही तितकीच गरज आहे. विजय रामचंद्र पवार, (वय २४ वर्षे) हा कष्टाने शिक्षण घेऊन शिवाजी विद्यापीठात ग्रंथालयात नोकरी करतो. त्याच्या मते, आधुनिक काळात धर्माची गरज नाही. तो अनेक धार्मिक विधी वा विचार या सर्वांपासून लांब आहे. धर्मग्रंथ त्याला निरुपयोगी वाटतात. त्याच्या मते, सध्याच्या युगात नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला म्हणून समाजसुधारणेसाठी इतर शिक्षणाबरोबर नैतिक शिक्षण गरजेचे आहे.

एअर फोर्समधील ३४ वर्षांचे कर्मचारी एस. के. कांबळे यांचा नवसावर विश्वास नाही. ते धार्मिक स्थळी कधीही जात नाहीत. धार्मिक स्थळे किंवा धार्मिक विधीत धर्म राहिलेला नाही. आजच्या काळात मार्गदर्शकाची गरज नाही; पण धर्मग्रंथ मार्गदर्शक ठरू शकतात असे त्यांना वाटते. जातीपातीवर नैतिक आचरण अवलंबून आहे असे त्यांना वाटते. सुभाष शामराव पवार हा तरुण म्हणतो, धर्म हा मानवी जीवनाचा पाया आहे. त्यात रूढी, परंपरा आल्याच, पण धार्मिक आचरणातून शांती, समाधानही मिळत असते हे विसरता येत नाही. सर्जेराव धोंडिराम निगवेकर यांचे एस.एस.सी.पर्यंत शिक्षण झाले आहे. ते चित्रकार असून गणपतीच्या मूर्ती बनवून विकण्याचा व्यवसाय करतात. त्यांना धर्माची गरज आहे असे वाटते. धार्मिक उत्सवात खरा धर्म आहे असे त्यांना वाटते. देवावर त्यांचा विश्वास आहे. अतिरेक किंवा थोतांड आवडत नाही. आई-वडील, गुरू व थोरांबद्दल आदर आहे. देशासाठी प्राणार्पणही करण्यास तयार आहेत. नवनिर्मितीचा ध्यास आहे.

प्रताप विश्वासराव चव्हाण महाराष्ट्र सरकारच्या सेवेतून वरिष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त झाले. आजच्या काळात धर्माची गरज आहे की नाही, हे त्यांना सांगता येत नाही. त्याचबरोबर खरा धर्म उत्सव, विधीत आहे की नाही, हेही त्यांना सांगता येत नाही आजच्या काळात गुरूची गरज नाही, पण धर्मग्रंथ उपयुक्त ठरतात असे त्यांना वाटते. श्री. मधुकर सदाशिव घाटगे हे धर्मादाय उपायुक्त म्हणून निवृत्त झाले. त्यांच्याही मते, आज उत्सव-विधीमध्ये धर्म राहिलेला नाही. धर्म व विज्ञान दोहोंचे ध्येय एकच आहे ते म्हणजे सध्याचे ज्ञान. धर्म व विज्ञान परस्परांच्या विरुद्ध नाहीत. त्या दोहोंचा समन्वय साधणे गरजेचे आहे.

प्राध्यापक जे. डी. जोशी हे मेकॅनिकल इंजिनिअर व प्राध्यापक. त्यांना उत्सव विधीत धर्म आहे की नाही, हे सांगता येत नाही. ते सत्पुरूषांच्या जयंती, पुण्यतिथी उत्सवात अजिबात सहभागी होत नाहीत. कुमारी मीनाक्षी तळेवाडीकर (वय १७ वर्षे) हिचा नवसावर विश्वास नाही. विज्ञानाची गरज आहे, पण धर्माची नाही. मार्गदर्शकाची गरज नाही, मात्र धार्मिक ग्रंथांमुळे मार्गदर्शन मिळते. कु. पद्मा चावरे, दीपाली अरुणकर, मनीषा कोन्नूर या महाविद्यालयातील तरुणींचा नवसावर विश्वास नाही. (त्या जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांतील आहेत.) पण त्या साऱ्या धार्मिक स्थळी परंपरेने जातात; मात्र काही धार्मिक ठिकाणी किंवा उत्सवात धर्म राहिला नाही म्हणतात, तर काही सांगता येत नाही म्हणतात. गुरूची गरज आहे का, याविषयी त्यांना सांगता येत नाही. त्यामुळे त्यांची काही मते परस्परविरोधी वाटतात. रूढी-परंपरेचा पगडाही जाणवतो. नुस हजी उस्मान सलाती हे मुंबई विद्यापीठाचे पदवीधर (वय ६१). ते घरामध्ये नमाज पढतात त्यांच्या मते, धर्मपालन ही व्यक्तिगत बाब आहे. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ते धार्मिक व्यक्तीकडे जातात. ईश्वरी कृपा, पाप-पुण्य यावर त्यांचा विश्वास आहे. मशिदीत धर्म राहिला आहे असे त्यांचे मत आहे. ते तेथे नेहमी जातात; पण परंपरेने इस्लामबद्दलची त्यांची भावना पावित्र्याची आहे. मशिदीतील देणगी पेटीत क्वचित प्रसंगी ते पैसे टाकतात. त्या मागचा हेतू



दान हा असतो. आजच्या काळातही धार्मिक मार्गदर्शक हवा आणि कुराणसारखे ग्रंथ जीवनात मार्गदर्शक ठरतात. इस्लाम व इतर ग्रंथ यांच्या संदेशात साम्य आहे; परंतु मूळ संदेशाच्या विरुद्ध समाज काही वेळा वागतो. नैतिक आचरण धर्मावर अवलंबून असते; पण मुल्ला-मौलवी किंवा दर्गे-मशिदी या ठिकाणी अनैतिकता आढळल्यास त्यांचा विश्वास उडतो.

ए. आर. पुंगावरकर (वय ४८ वर्षे) या आर्किटेक्टना धर्म व विज्ञान दोन्हीही आवश्यक वाटतात. धर्म विधी-उत्सवात आहे की नाही, हे त्यांना सांगता येत नाही; पण परंपरेने मंदिरात जातात. धार्मिक मार्गदर्शकाची गरज नाही असे त्यांना वाटते; परंतु मूळ धर्मसंदेशाविरुद्ध समाज वागतो असे त्यांना वाटते. समाजात नैतिक शिक्षणाचा समाजशिक्षणासाठी उपयोग होणार नाही असे त्यांना वाटते. श्री. के. के.पाटील (वय ४३) हे आंध्र प्रदेशातील श्रीशैल येथे श्री सिद्धेश्वर नित्य अन्नदान छत्राचे व्यवस्थापक आहेत. त्यांना धर्मपालन ही सामाजिक गरज वाटते. पुण्य, ईश्वरी कृपा यासाठी ते धार्मिक विधी करतात. इच्छित फल मिळावे म्हणून धार्मिक व्यक्तींना भेट देतात, नवस बोलतात; पण प्रार्थनेसाठी समूहात जात नाहीत. धर्माचे खरे स्वरूप मंदिर, उत्सव, धार्मिक विधी यात आहे असे त्यांना वाटते. दान म्हणून क्वचित प्रसंगी देणगी पेटीत ते पैसे टाकतात. धार्मिक मार्गदर्शन आवश्यक आहे असे त्यांना वाटते, तर नैतिक आचरणासाठी धार्मिक व्यक्ती, ठिकाण व ग्रंथ उपयुक्त ठरतात असे त्यांना वाटते. मूळ धर्मसंदेशाच्या विरुद्ध समाज वागतो असे असतानाच नैतिक आचरण जातीपातीवर अवलंबून आहे असे त्यांना वाटते. धार्मिक स्थळी धर्माच्या नावावरच पैसा जमा केला जातो आणि त्याचा उपयोग व्यक्तिगत जीवनासाठी करतात त्यांना समर्थनीय वाटते आणि ते साहजिकच आहे. आंध्र प्रदेशामधल्या ईस्ट गोदावरी जिल्ह्यातील अण्णावरम् या ठिकाणी श्री. व्यंकट सच्चीनारायण स्वामिवारू हे एक प्रसिद्ध धर्मक्षेत्र आहे. या धर्मक्षेत्री एक हॉटेल चालविणाऱ्या पी. शिवाजी या चाळीस वर्षांच्या गृहस्थाची मुलाखत असे दाखवते की, त्यांना विज्ञानाची गरज नाही. धर्मपालन ही व्यक्तिगत बाब असून संकट निवारणासाठी प्रार्थना

करावी. अण्णावरमच्या ऐवजी दुसऱ्या कोणत्याही धार्मिक व्यक्तीकडे जाण्याची त्याला गरज वाटत नाही. पूजाअर्चा, प्रार्थना यात कधितरी सामील होतो. अण्णावरमला विशिष्ट दिवशी ईश्वरी शक्ती अधिक प्रगटते असे त्याला वाटते. दान म्हणून धार्मिक पेटीत पैसे टाकतो. गुरूची गरज आहे; पण त्याग भावनेने धार्मिक लोकांसाठी वेळ, पैसा देतो. या ठिकाणी एक गोष्ट ध्यानात येते की, धार्मिक ठिकाणी वेगवेगळे लोक वेगवेगळा व्यवसाय करतात. भक्तांच्या जीवावर, यात्रेकरूंच्या येण्यावरच हे हॉटेल व्यवसाय चालतात. त्यातून मिळालेला काही पैसा खर्च करण्याची बुद्धी त्यांना आहे. धर्म किंवा धार्मिक ठिकाणामुळे व्यक्तिगत जीवनात स्वास्थ्य व समाधान त्यांना लाभते; पण फार व्यापक अर्थाने सामाजिक चिंतन या लोकांच्यात विकसित झालेले दिसत नाही. ईश्वरावरील श्रद्धा, त्या श्रद्धेचे बळ आणि त्यांची व्यक्तिगत समृद्धी यांचे एक अतूट नाते आढळते. त्यामुळे धार्मिक वातावरणाला पोषक असणाऱ्या साऱ्या गोष्टींना त्यांची मते अनुकूलच आढळतात. सौ. तारा पंडित (वय ५९) या मराठीतील चांगल्या साहित्यिक. त्या कलकत्यात स्थायिक झाल्या. त्यांचा कर्मकांडावर विश्वास नाही; परंतु त्यांना अधार्मिक म्हणता येत नाही. आजच्या काळात धर्माची गरज आहे. पावित्र्य, मन:शांती, कृतज्ञता या मूल्यांना त्या मानतात. धर्माशी त्याचा संबंध त्या जोडतात. व्यक्तिगत प्रार्थनेमुळे मन:शांती लाभते असे त्यांना वाटते. धार्मिक व्यक्तीला भेट देतात; पण कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी. मठ-मंदिरात खरा धर्म राहिलेला नाही अशी त्यांची भावना आहे. धर्मग्रंथ वा धार्मिक मार्गदर्शक आजही आवश्यक आहे; पण काही काही वेळेला समाज मूळ धर्मसंदेश विसरतो असे त्यांना वाटते. नैतिक शिक्षणाची आवश्यकता आहे असे त्यांचे मत आहे.

कलकत्त्याच्या काली मंदिरात स्टिफन क्रसनीअस्की हा तरुण बसलेला होता. तो दोन वेळा भारतामध्ये फिरलेला आहे. धर्म ही व्यक्तिगत बाब आहे असे त्याचे मत आहे. धर्म व विज्ञान दोन्हीही आवश्यक आहेत. धार्मिक स्थळी शुद्ध वातावरण असावे असे त्याला वाटते. देणगी पेटीत पैसे



टाकणाऱ्यांचे हेतू स्वार्थी असतात असे त्याला वाटते; पण ख्रिश्चन धर्माने सांगितलेली नैतिकता मला मान्य नाही असे तो म्हणतो. धर्मग्रंथांमुळे आपण जीवनात योग्य मार्गावर चाललो आहोत की नाही हे समजते. जीवनात एक सातत्याचे भाग ते निर्माण करतात. विविध धर्मांमध्ये मुळात एकता आहे अशी त्याची भावना आहे. धर्माच्या नावावर सुखोपभोग घेतात ते नैतिक वाटतात का यावर त्याचे म्हणणे धर्म आणि सुख याच्या नात्यावर या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, नैतिकतेचे नियम कोण सांगतो यावर ते अवलंबून आहे. स्टिफनच्या म्हणण्यानुसार, आधुनिक माणूस काही तरी हरवत चालला आहे. त्याची दिशाच हरवलेली आहे. अशा वेळी गोरगरिबांना धर्म उपयुक्त ठरतो. दहा वर्षांपूर्वी तुम्ही भारतात आलात आणि आता आलात यामध्ये तुम्हाला काय फरक जाणवतो, यावर तो म्हणाला, ‘‘भारताची प्रगती होत आहे. (Indian middle class has come up very fast.) भारतीयांचा मध्यमवर्गाची अतिशय गतीने प्रगत होत आहे; मात्र नवीन बुद्धिवादी भारतीय आपण ज्या वर्गातून वर आलो आणि श्रीमंत झालो, त्या समाजाच्या प्रगतीबद्दल उदासीन आहे.

श्री. अरविंद हरी प्रभुणे हे अधीक्षक म्हणून जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथून निवृत्त झाले. ते धार्मिक वृत्तीचे, जुने पुराण मतवादी असून धर्माचे रूढ स्वरूप आणि नैतिक शिक्षण आचरणावर भर देणारे आहेत. कोर्टाच्या वातावरणामुळे त्यांना समाजाला नैतिक शिक्षण देण्याची आवश्यकता पटलेली आहे. सुभाष ओंकार मलवाडे यांचे व्यक्तिगत जीवन धार्मिक कार्यासाठी वाहिलेले असले तरी सामाजिक संदर्भात मात्र थोडेसे राखीव आहे. धर्म नेमका कोठे आहे याविषयी त्यांचे मन संदिग्ध आहे. बुवाबाजीचा अनुभव घेऊनही खरा मार्गदर्शक हवा असे त्यांना वाटते. धार्मिक उत्सवात सहभागी झाल्याने शांती, समाधान मिळते. धार्मिक लोकांसाठी वेळ आणि परिश्रम देण्यामागे आपल्या भौतिक अडचणी दूर व्हाव्यात व आपली प्रगती व्हावी असा हेतू असतो. नैतिक आचरणासाठी गुरू, मंदिर वा ग्रंथ यांच्यावर अवलंबून राहण्याची गरज नाही असे त्यांना वाटते. धर्मासाठी जीवन खर्च

करणाऱ्या लोकांनी त्यातील थोडाफार पैसा वापरला तर ते अजिबात नैतिक नाही असे म्हणता येणार नाही.

श्री. डी. ए. जाधव (वय ६५ वर्षे) निवृत्त जेल सुपरिटेंडंट हे व्यक्तिगत जीवनात धार्मिक आहेत; पण रूढीप्रिय नाहीत. धर्माच्या विडंबनावर ते टीका करतात; पण सामाजिक संदर्भात श्रद्धाळू दिसतात. गुरू परंपरेची गरज आहे किंवा नाही, हे त्यांना सांगता येत नाही. धार्मिक कारणासाठी पैसा ते देतात. पण, त्यामागचा हेतू प्रेम आहे असे त्यांना वाटते. संकटकाळी ईश्वर शक्तीची मदत घ्यावी असे त्यांना वाटते. त्यासाठी क्वचित प्रसंगी देणगी पेटीत ते पैसा टाकतात. धर्मग्रंथ उपयुक्त आहेत, परंतु गुरूची गरज आहे की नाही सांगता येत नाही. जातीपातीवर नैतिक आचरण अवलंबून नाही असे त्यांना वाटते आणि समाजसुधारणेसाठी नैतिक शिक्षणाचा उपयोग होईल असे त्यांना वाटते. ए. बी. कुलकर्णी (वय ३९) हे ब्राह्मण कुटुंबामध्ये जन्माला येऊनही व्यक्तिगत जीवनात नवसावर मात्र त्यांचा विश्वास नाही. सामुदायिक प्रार्थना करीत नाहीत. देणगी पेटीत कधीही पैसे टाकत नाहीत. धार्मिक व्यक्तींनी अनैतिक वर्तन केल्यास किंवा धार्मिक स्थळी अनैतिकता आढळल्यास तसेच चालायचे असे त्यांना वाटते. नैतिक शिक्षणाचा फारसा उपयोग समाजशिक्षणासाठी होईल असे त्यांना वाटत नाही. व्ही. एस. पवार (वय ६०) हे मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त आहेत. धर्माने ख्रिश्चन. त्यांच्या मते, मूळ बायबलच्या संदेशाविरुद्ध सारेच वागतात असे नाही. समाजातील काही व्यक्ती संदेशाचे पालनही करतात. त्यांचा नवसावर विश्वास नाही, प्रार्थनेवर विश्वास आहे. ईश्वरी कृपेसाठी प्रार्थना आवश्यक आहे. धार्मिक स्थळी जाण्याचा प्रकार त्यांच्याकडे नाही किंवा धार्मिक व्यक्तीला भेटण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही. हिंदू, बुद्ध, ख्रिश्चन या धर्मांत एकवाक्यता आहे असे त्यांना वाटते; मात्र चर्च, उत्सव यात धर्म राहिलेला नाही असे त्यांचे मत आहे. धर्मग्रंथ उपयुक्त वाटतात. धर्मावर नैतिक आचरण अवलंबून नाही. नैतिक शिक्षणावर भर द्यावा असे त्यांचे मत आहे.



प्रा. सौ. जयश्री जाधव यांची मते पुरोगामी असली तरी या रूढी, परंपरा मानणाऱ्या पण धार्मिक व्यक्तीकडे न जाणाऱ्या आहेत. त्यांना मंदिर, गुरू वा कर्मकांड यात खरा धर्म आहे का हे सांगता येत नाही. नैतिक शिक्षणाचा समाजसुधारणेला जो उपयोग होईल तो थोडाफार असे त्यांना वाटते. ॲड. किंकरे यांच्या मते, धर्मपालन ही सामाजिक बाब आहे. ते नवस बोलतात, पण प्रार्थना करीत नाहीत. मंदिर किंवा धार्मिक स्थळे यांच्याशिवाय थोडेफार नैतिक आचरण शक्य आहे असे त्यांना वाटते. जाती-धर्माचा त्यांच्या मनावर पगडाही आहे. ते म्हणतात की, धर्म हा नेहमीच सत्कर्म व सन्मार्ग दाखवित असतो. त्याची अंमलबजावणी महत्त्वाची.

प्रा. चंद्रलेखा चंद्रशेखर चव्हाण यांच्या मते, धर्माची आधुनिक काळात गरज आहे की नाही, हे सांगता येत नाही. धार्मिक, कौटुंबिक रूढी त्या पाळतात. अनेक सुशिक्षित स्त्रियांप्रमाणे मंदिर, मशिदीत धर्म आहे का, हे सांगता येत नाही. कृतज्ञता, सहजीवन, कौटुंबिक स्वास्थ्य, शांती, समाधान यांचा धर्माशी असणारा संबंध त्यांना महत्त्वाचा वाटतो. पण धार्मिक ग्रंथ, धार्मिक मार्गदर्शक हे सध्या निरुपयोगी आहेत असे त्यांचे मत आहे. सौ. शोभना चव्हाण या वृत्तीने धार्मिक, पण त्या आधुनिक काळात रूढ धर्मापेक्षा मानवधर्माची गरज मानणाऱ्या आहेत. मनाचे समाधान होण्यासाठी धार्मिक व्यक्तीला भेट देतात. दान म्हणून देणगी पेटीत पैसेही टाकतात. सत्पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी उत्सवात त्यांना शांती, समाधान मिळते. त्याग भावनेने धार्मिक लोकांसाठी त्या वेळ, पैसा खर्च करतात. नैतिक शिक्षणाचा समाजाला थोडाफार उपयोग होईल असे त्यांना वाटते.

महाविद्यालयीन मुलींच्या किंवा मुलांच्या उत्तरांमध्ये निश्चितता दिसत नाही. ढोबळमानाने कर्मकांड, अंधश्रद्धा याबाबत थोडीफार शिक्षणामुळे जाण आहे; परंतु अजूनही धार्मिक रूढी व परंपरा यांचा पगडा व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनात आढळतो.

यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींमध्ये कर्मकांड व रूढींचा

पगडा कमी झालेला असला तरी संस्कारांचे प्राबल्य निश्चितच आढळते. जरी त्यांना मठ-मंदिर येथील उत्सव-विधीमध्ये धर्म राहिलेला नाही असे वाटत असले तरी रूढी, परंपरा आणि इतर लोक जातात म्हणून धर्माचा जीवनाला महत्त्वाचा आधार वाटतो; मात्र या पिढीमध्ये धर्म, देश व राष्ट्रीयत्व यांचा पगडा कमी आढळतो. मग त्याला ब्राह्मण समाजातील सुशिक्षित मुलीही अपवाद नाहीत. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या काही मुलींच्यामध्ये धर्माबद्दलची काही मते धर्म नाकारण्यापर्यंतही पराकोटीची आढळतात. मुसलमान साक्षर मुलीही अपवाद नाहीत. सईदा शान-ए-दिवाण हिच्या मते, धर्म, गुरू, प्रार्थना स्थळे किंवा कोणत्याही धर्मातील कर्मकांड अनावश्यक आहे; मात्र कुराणासारखे धर्मग्रंथ जीवनात उपयोगी ठरतात. इतर धर्मातीलही काही चांगली तत्त्वे असतात; पण देणगी पेटीत पैसे टाकणे किंवा धार्मिक स्थळी जाणे किंवा धार्मिक व्यक्तीसाठी वेळ, पैसा, श्रम देण्याची गरजच नाही.

महाराष्ट्रातील विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे धर्मग्रंथांची चिकित्सा करताना महत्त्वाचे विचार मांडतात. ते संस्कृतचे प्रकांड पंडित असून त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. हिंदू धर्मातील अनेक धर्मग्रंथांनी बहुजन समाजाला वैचारिक गुलामगिरीत ठेवले. धर्मग्रंथ हे एकविसाव्या शतकातील तरुण पिढीसाठी निर्विवादरीत्या मोडीत काढायला हवेत, अशी त्यांची विचारांची तर्कशुद्ध थोडीशी आक्रमक अशी मांडणी आढळते. ते म्हणतात, 'धर्मग्रंथ हे धर्माच्या हाती असलेले अत्यंत प्रभावी असे साधन आहे. ऐतिहासिकदृष्ट्या पाहता दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाप्रमाणेच धर्मग्रंथदेखील मानवानेच निर्माण केलेले लौकिक ग्रंथ असतात. देश-काल, लेखकाची आकलनशक्ती, त्याच्या नैतिक जाणिवा, त्यांचे हितसंबंध इ.च्या मर्यादांमुळे निर्माण होणारे दोष या ग्रंथांतूनही असतातच; परंतु धर्माचे नेतृत्व करणारे पुरोहित वगैरे लोक हे धर्मग्रंथ निर्दोष असल्याचे अट्टहासाने सांगतात. हे ग्रंथ मानवनिर्मित आहेत असे सांगितले असता लोकांचा त्यावर विश्वास बसणार नाही, हे या मंडळींना ठाऊक असते. म्हणून हे ग्रंथ अनादी, अपौरुषेय



अथवा ईश्वरनिर्मित आहेत, असा सिद्धांत त्यांच्याकडून मांडला जातो. आता ईश्वर हा सर्वज्ञ आहे असा सिद्धांत मांडलेला असतो. मानवाने निर्माण केलेल्या ग्रंथात जसे दोष असू शकतात, तसे सर्वज्ञ ईश्वराच्या वचनांमध्ये असू शकत नाहीत. या ग्रंथांमधून अंतिम सत्य सांगितलेले असते, ते शाश्वत व अपरिवर्तनीय असते; अशा रीतीने सर्वज्ञ ईश्वराने शाश्वत सत्य म्हणून या ग्रंथातून जे काही सांगितलेले असते, त्याविषयी शंका घेण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही म्हणून या ग्रंथांतून जे काही सांगितले गेलेले असेल ते श्रद्धापूर्वक आणि अत्यंत नम्रपणे सर्वांनी स्वीकारले पाहिजे.

काळाच्या ओघात स्वतंत्र बुद्धीची काही माणसे निर्माण होतात. धर्मग्रंथ जेव्हा अशा लोकांच्या वाचनात येतात, तेव्हा त्या ग्रंथांतील अनेक गोष्टी आपल्या प्रत्यक्ष अनुभावाशी जुळत नाहीत, हे त्यांच्या ध्यानात येते. एकीकडे धर्मग्रंथांच्या बाजूने शेकडो वा हजारो वर्षांची परंपरा उभी असते. तसेच, त्या परंपरेवर अढळ श्रद्धा ठेवणारे लक्षावधी लोकही आजूबाजूला असतात. दुसरीकडे स्वतंत्र बुद्धीने विचार करणाऱ्या माणसाच्या बाजूने मात्र फक्त त्याचा अनुभव असतो. त्यामुळे हा माणूस एकाकी ठरतो. मानवी इतिहासाकडे पाहिले असता अशा एकाकी माणसांनी अत्यंत धैर्याने धर्मग्रंथांच्या परंपरेबरोबर संघर्ष केलेला आहे.

आपल्या अनुभवांच्या विवेकाच्या आधारे धर्मग्रंथांची चिकित्सा करू पाहणाऱ्या लोकांना धर्ममार्तंडांनी पाखंड वा नास्तिक म्हणून हिणवीले आहे. धर्मग्रंथांची चिकित्सा कोणत्याही परिस्थितीत होऊ द्यायची नाही, असा या लोकांचा हट्ट असतो. एकदा का चिकित्सेचे स्वातंत्र्य दिले की, समाजावरची आपली पकड सुटेल, आपल्या हितसंबंधांना बाधा येईल, आपली प्रतिष्ठा लयाला जाईल आणि आपल्या सुखोपभोगाच्या वाटा बंद होतील, हे त्यांना पुरेपूर ठाऊक असते; परंतु उघडपणे असे म्हणू शकत नाहीत. नास्तिकांचा विरोध आम्हाला वा आमच्या हितसंबंधाला आहे, असे धर्ममार्तंड म्हणू लागले तर सर्वसामान्य अशा लक्षावधी लोकांच्या मनात फारशी खळबळ निर्माण होणार नाही, हे त्यांना ठाऊक असते. म्हणूनच नास्तिकांचा विरोध

आम्हाला आहे, असे ते कधीच सांगत नाहीत. सर्वसामान्य लोकांची ईश्वरावर अतूट श्रद्धा असते. नास्तिक लोक ईश्वराचे अस्तित्व नाकारत असतात. या वस्तुस्थितीचा कौशल्याने गैरफायदा घेण्याची अक्कलहुशारी या धर्ममार्तंडांकडे असते. नास्तिकांचा ईश्वराला व त्याने सांगितलेल्या पवित्र धर्मग्रंथाला विरोध आहे, हे ईश्वराची व धर्मग्रंथांची निंदानालस्ती करतात आणि म्हणून आमचा त्यांना विरोध आहे, असे चित्र श्रद्धाळू अशा सर्वसामान्य लोकांपुढे उभे केले जाते. कमालीच्या व्यक्तिगत स्वार्थाला अत्यंत उदात्त व उच्च कोटीच्या परमार्थाचे रूप दिले जाते. सर्वसामान्य लोकांना ईश्वराचे विरोधक म्हणून नास्तिक लोक शत्रू वाटत असतात याउलट ईश्वराचे मध्यस्थ धर्ममार्तंड जवळचे वाटतात. त्यामुळे धर्ममार्तडांच्या सांगण्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवण्याची त्यांची प्रवृत्ती असते. स्वाभाविकच, नास्तिकांच्या विषयी सर्वसामान्यांच्या मनात कमालीचा द्वेष, तिटकारा निर्माण होतो. त्यामुळे नास्तिकांची सर्व बाजूंनी कोंडी करणे धर्ममार्तंडांना सहजपणे शक्य होते.

धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित असल्यामुळे अपरिवर्तनीय असतात, असा सिद्धांत मांडलेला असतो. या धर्मग्रंथांतील कानामात्रा, वर्णाक्षर व शब्द यांच्याबाबतीतही काही बदल करायचा नाही इतके पराकोटीचे पावित्र्य धर्मग्रंथांना बहाल केलेले असते. ऐतिहासिक वस्तुस्थिती पाहता, स्वत: धर्ममार्तंडांच्या मनात धर्मग्रंथांविषयी खरोखरच अशी अपार श्रद्धा असल्याचे मात्र आढळत नाही. आपल्या हितसंबंधांना बाधा आणू शकतील अशा लोकांना चिकित्सेचे स्वातंत्र्य मिळू नये, एवढाच या लोकांचा प्रयत्न असतो. धर्मग्रंथ अपरिवर्तनीय आहेत आणि त्यांचे पावित्र्य कटाक्षाने जपले पाहिजे, असे धर्ममार्तंडांना वाटत असते, तर त्यांनी धर्मग्रंथांमध्ये प्रक्षेप (नंतर घुसडलेला भाग) करण्याचे धाडस कधीच केले नसते. भारतातील धर्मशास्त्राचा इतिहास पाहिला तर अत्यंत पूज्य व पवित्र मानल्या गेलेल्या धर्मग्रंथांना धर्ममार्तंडांनीच अत्यंत विकृत रूप दिले आहे असे आढळते. धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित, पवित्र व अपरिवर्तनीय आहेत, या सिद्धांतावर या



धर्ममार्तंडांचा काडीइतका विश्वास नव्हता, हे सिद्ध करणारे प्रक्षेप इतिहासाच्या पानावर आढळतात.

या ठिकाणी एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. धर्मग्रंथांना विरोध केल्याबद्दल वा त्या ग्रंथांतील मूल्यांवर टीका केल्याबद्दल सर्वसामान्य माणसे नास्तिकांचा तिटकारा करतात. आता त्यांचे त्या धर्मग्रंथांवर खरोखरच प्रेम असेल तर या धर्मग्रंथांना विकृत रूप देणाऱ्या सनातनी लोकांविषयी ते कोणती भूमिका स्वीकारणार, हा तो प्रश्न होय. अनेकदा तर या धर्ममार्तंडांनी धर्मग्रंथांमध्ये घुसडलेल्या विकृत भागाला बुद्धिवादी लोक विरोध करीत असतात. अशा वेळी सर्वसामान्य लोकांनी आपला विवेक वापरण्याची आवश्यकता आहे.

ईश्वरनिर्मित व अपरिवर्तनीय मानल्या गेलेल्या धर्मग्रंथांमध्ये नकोनको त्या गोष्टी घुसडण्याची हिंमत तरी लोकांना कशी होते, हेही पाहण्यासारखे आहे. काही वेळा परंपरेने आलेल्या धर्मग्रंथातील विधाने आपल्या हितसंबंधांना पुरेशा प्रमाणात पोषक नाहीत, असे या लोकांना वाटते. आपले हितसंबंध जोरदारपणे पुढे रेटण्यासाठी काही प्रबळ विधानांची व त्या विधानांचे समर्थन करणाऱ्या अख्यायिका, पुराणकथा वगैरेंची गरज आहे, असे या लोकांना वाटते. मग अत्यंत निर्ढावलेल्या मनाने किंबहुना निलाजरेपणाने हे लोक हवा तो मजकूर ग्रंथांत घुसडून देतात. विरोध करणारे चिकित्सक लोक पुरते बदनाम झालेले असतात आणि बाकीचा बहुसंख्य समाज अज्ञानी असतो. अशा रीतीने पूर्वी दुसऱ्या कोणी मानवाने निर्माण केलेल्या ग्रंथांमध्ये अत्यंत स्वार्थी हेतूने विकृत मजकूर घुसडल्यानंतरही तो ग्रंथ ईश्वरनिर्मित असल्याचे आणि त्यामुळे त्याची चिकित्सा करण्याचा अधिकार कोणालाही नसल्याचे मत अबाधित राहते.

घोड्यांनी आपल्या देवांची चित्रे काढली असती तर ती घोड्याच्या रूपातच काढली असती, असे एका तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे. या विधानातून सूचित होणारा अर्थ धर्मग्रंथांना तंतोतंत लागू पडणारा आहे. ज्या लोकांनी धर्मग्रंथ निर्माण केले त्यांनी स्वत:च्या हितसंबंधांना कमालीची अनुकूल

ठरेल, अशीच त्याची रचना केल्याचे आढळते. वस्तुत: सर्वसामान्य अशा ज्या लक्षावधी लोकांचे भवितव्य धर्मग्रंथांच्या आधारे ठरत असते त्यांना ते धर्मग्रंथ निर्माण करण्याचा अधिकार नसतो. इतकेच नव्हे तर अनेकदा ते ग्रंथ अभ्यासताना त्यांना स्पर्श करण्याचा वा ते ऐकण्याचा अधिकार नसतो. मग त्यांची चिकित्सा करण्याचा अधिकार दूरच राहिला; परंतु ज्याच्याशी अशा कोणत्याही मार्गाने जवळीक करता येत नाही, त्या ग्रंथांवर त्यांनी अतूट अशी श्रद्धा ठेवली पाहिजे, असे सदैव त्यांच्या मनावर बिंबवले जात असते आणि हे अज्ञानी लोकही बुद्धिभेद झाल्यामुळे त्यावर विश्वास ठेवतात. एका दृष्टीने असे करण्यामुळे स्वत:चे शोषण करण्याचा परवानाच ते इतरांना देत असतात.

या सर्व विवेचनाचे तात्पर्य असे की, धर्मग्रंथांची चिकित्सा करायची नाही अशा प्रकारचा नियम करून धर्माने माणसाचे जीवन ज्ञानाच्या प्रकाशाने उजळण्याचा मार्ग बंद करून टाकला. विशेष म्हणजे अशा प्रकारच्या धर्मशास्त्रज्ञांनी जे काही सांगितले असेल, तोच धर्म होय, अशी अत्यंत आग्रही भूमिका धर्माच्या क्षेत्रात घेतली जाते. याचा अर्थ धर्मग्रंथांनी कितीही निरर्थक, स्वार्थी आणि अन्यायकारक गोष्टी सांगितलेल्या असल्या तरी लोकांनी आपला धर्म समजून त्या गोष्टींचे अत्यंत श्रद्धेने पालन केले पाहिजे, असे लोकांच्या मनावर पक्के बिंबवले जाते. धर्माच्या क्षेत्रातील हा एक महाभयंकर दोष म्हटला पाहिजे.

धर्माला एक मानसिक मूल्य आहे आणि हजारो वर्षे भारतीय मनावर धर्मविषयक केलेल्या सूचनांमुळे धर्माची आजही गरज भारतीयांना तीव्रतेने जाणवते. जगाच्या पाठीवर भारतात धर्म हा प्राणवायूप्रमाणे समाजाच्या नसानसांतून वाहतो.विज्ञानाची उपेक्षा केल्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास भारतामध्ये झाला नाही. सुदैवाने साक्षरतेच्या समप्रमाणात विज्ञानाची जीवनातील गरज लोकांना जाणवू लागली आहे. विज्ञान आणि जीवनविषयक परंपरा, दृष्टिकोन यांच्यात समतोल साधला गेलेला दिसत नाही. धर्मपालन ही व्यक्तिगत बाब आहे हे समाजात बऱ्यापैकी लोकांना पटले आहे, ही एक सुदैवी गोष्ट आहे. त्यामुळेच धर्मवेडेपणा काबूत येऊ शकेल आणि धर्माचे सामाजिक स्तोम कमी होईल. सामाजिक प्रदर्शन वादामुळे जाती-



जातींत, धर्मा-धर्मांत दुरावा निर्माण होत होता आणि धर्माच्या माथी मारण्यात येत होता.

कर्मकांडामुळे सामाजिक प्रगती खुंटते; परंतु रूढींचा पगडा इतका जबरदस्त आहे की, समाजाच्या अबोल मनात रूढी मोडल्या तर अनिष्ट घडते असे गणित सखोल रुजलेले आहे. बहुतांश लोकांना मन:शांतीसाठी प्रार्थना हा आधार वाटतो; पण त्याचे साहचर्य, सगुण, साकार, ईश्वर, प्रेषित यांच्या प्रतिमेशी निगडित आहे. नव्या पिढीत देवाकडे मागितले तर तो पूर्ण करतो, अशी अटकळ आजही अस्तित्वात आहे; मात्र नव्या पिढीचा त्यावर विश्वास राहिलेला नाही. धार्मिक व्यक्तीला भेट देण्याचे प्रमाण साक्षरतेच्या समप्रमाणात घटले आहे.

सामाजिक पातळीवर जगण्यासाठीची धडपड इतकी वाढली आहे की, त्यामुळे माणसाला पूर्वीप्रमाणे प्रार्थना, पूजाअर्चा,धार्मिक विधी, यात्रा, उत्सव यात सहभागी होता येत नाही. कधी-कधी तो सहभागी होतो; पण त्यामुळे एक सांस्कृतिक चलनवलन थंडावले आहे. एकत्र कुटुंब पद्धत हळूहळू लयाला जात असल्यामुळे एकत्रित प्रार्थना किंवा सहजीवनाचा अनुभव हा दुरापास्त होत निघाला आहे. सामाजिक एकात्मता कमी होण्याचा तो परिणाम आहे. एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विधी ठिकाणची धार्मिक बुवाबाजी, अवडंबर, व्यापारी वृत्ती, शोषण यामुळे धर्माच्या मक्तेदारांकडे खरा धर्म राहिलेला नाही, हे निश्चित. असे असूनही परंपरेने आणि जीवनातील वैफल्याने लोक मंदिर, मशीद, गुरुद्वाराकडे, दर्ग्याकडे धाव घेतातच. प्रत्येकाला धर्मपालन न करताही जर परधर्मीयांनी धार्मिक व्यक्ती वा ठिकाणाबद्दल काही विरोधी विचार मांडला किंवा कृती केली तर मात्र त्याची पावित्र्याची भावना आणि स्वाभिमान जागा होतो.

## सामाजिक प्रश्नाच्या अभ्यासासाठीची प्रश्नावली

| १. व्यक्तिगत % | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धर्माची आधुनिक काळात गरज आहे का? | आहे | ६७.६ | नाही | २३.२ | सांगता येत नाही | ९.२ |
| २. | विज्ञानाची गरज आहे का? | आहे | ६०.६ | नाही | १ | धर्म व विज्ञान दोन्ही आवश्यक | २२.४ |
| ३. | धर्मपालन ही व्यक्तिगत बाब की सामाजिक गरज? | व्यक्तिगत | ५०.८ | सामाजिक | ४२.२ | त्याची गरजच नाही | ७.२ |
| ४. | धार्मिक विधी करण्याचे कारण | रूढींमुळे | ६०.८ | पापक्षालनार्थ | ८.८ | पुण्य मिळावे म्हणून | १६.८ |
| ५. | प्रार्थना व्यक्तिगत करता की कौटुंबिक? | स्वत: | ६७ | कौटुंबिक | २२.६ | प्रार्थना करीत नाही | १०.८ |
| ६. | प्रार्थनेचे फायदे | मन:शांती | ८५.६ | ईश्वरी कृपा | ५.४ | संकट निवारण | ४.८ |
| ७. | देवाकडे नवस बोलता? | हो | २४.६ | दुसऱ्याला करायला सांगतो | ६२.२ | नवसावर विश्वास नाही | १३.२ |
| ८. | धार्मिक व्यक्तीला भेट देता का? | हो | ३९.६ | नाही | ५७ | जात नाही | ३.४ |
| ९. | भेट देत असाल तर त्यामागचा हेतू? | कृतज्ञता व्यक्त करणे | २८.६ | इच्छित फल मिळण्यासाठी | ८.८ | देवाकडे आपले गाऱ्हाणे मांडावे म्हणून | १.८ |

| २. सामाजिक % | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रार्थना, पूजाअर्चा, धार्मिक विधी, यात्रा, उत्सव यात सहभागी होता? | नेहमी | १९.८ | कधी कधी | ७५ | कधीही नाही | ५.२ |
| २. | सामुदायिक, एकत्रित प्रार्थना करता? | होय | १७.६ | नाही | ५५.२ | समुहात जात नाही | २७.२ |
| ३. | त्या प्रार्थनेत सहभागी होण्यामागचा हेतू? | एकात्मता | ३९.८ | सहजीवन | १६.४ | धार्मिक वातावरण | १२.६ |
| ४. | धार्मिक स्थान, उत्सव, विधी यात धर्म राहिला आहे काय? | होय | २२.५ | नाही | ४५.६ | सांगता येत नाही | ३२.५ |
| ५. | धार्मिक स्थळी जाता का? | नेहेमी | १९.६ | विशिष्ट दिवशी | ७०.८ | कधीही नाही | ११.६ |
| ६. | विशिष्ट दिवशी जाण्यामागचा हेतू? | परंपरेने | ५९.४ | इतर लोक जातात म्हणून | १०.४ | त्या दिवशी ईश्वरशक्ती अधिक प्रकटते म्हणून | ३ |
| ७. | स्वधर्माच्या व्यक्ती व ठिकाणाबाबत कोणती भावना आहे? | स्वाभिमानाची | ३७.६ | पावित्र्याची | ५७ | नकारात्मक | ५.४ |
| ८. | त्या ठिकाणी मांगल्य, पावित्र्य, उदात्तता असावी का? | अत्यावश्यक | ८६.४ | कामापुरते | ६.६ | गरज नाही | ७ |
| ९. | धार्मिक ठिकाणाच्या देणगी पेटीत पैसे, दागिने टाकता का? | होय | १७.२ | क्वचित प्रसंगी | ५१.४ | नाही | २७.२ |
| १० | त्यामागचा हेतू? | संकट निवारण | २.६ | कृतज्ञता | १९.४ | दान | ५१.२ |

| ३. धार्मिक व्यक्ती % | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आजच्या काळात धार्मिक मार्गदर्शकाची गरज आहे? | आहे | ६३.३ | नाही | २४ | सांगता येत नाही | १५.८ |
| २. | सत्पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी वा तत्सम उत्सवात सहभागी होता का? | नेहमी | २४ | कधी कधी | ६१.४ | अजिबात नाही | १३.६ |
| ३. | त्या प्रार्थनेत सहभागी होण्यामागचा हेतू? | धार्मिक | १४ | शांती,समाधान | ६३.८ | इतर जातात म्हणून | ८.६ |
| ४. | धार्मिक लोकांसाठी तुम्ही तुमचा वेळ, श्रम, पैसा देता का? | होय | ४२.८ | नाही | ४०.६ | संबंध येत नाही | १६.६ |
| ५. | त्या मागचा हेतू? | प्रेमासाठी | २५.८ | स्वार्थासाठी | २ | त्याग भावनेने | १६ |
| ६. | जर धर्मपुरुषांच्या ठिकाणी वा धार्मिक स्थळी अनैतिकता आढळल्यास तुम्ही प्रतिक्रिया कशा स्वरूपात प्रगट करता? | तसे चालायचेच | ५.८ | संताप येतो | ४९.६ | विश्वास उडतो | २ |

| ४. धर्मग्रंथ % | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धर्मग्रंथाचे तुमच्या जीवनातील स्थान? | मार्गदर्शक | ७९ | उपयुक्त | १७ | निरुपयोगी | ४ |
| २. | धर्मग्रंथातील संदेशात एकता आढळते का? (उदा. प्रेम, शांती, बंधुभाव, अहिंसा) | होय | ६६.२ | थोडी फार | ३०.४ | नाही | ३.४ |
| ३. | मूळ धर्म संदेशाच्या विरुद्ध समाज वागतो का? | काही वेळा | ५२.६ | वागतो | ४०.८ | शक्य नाही | २५.२ |
| ४. | धार्मिक व्यक्ती वा ठिकाणे धर्मग्रंथ यांच्या मदतीशिवाय नैतिक आचरण शक्य आहे का? | होय | ३४.२ | थोडे फार | ४०.६ | शक्य नाही | २५.२ |
| ५. | जातपात, धर्म, देश यावर नैतिक आचरण अवलंबून आहे का? | होय | ३१.२ | नाही | ५२.२ | परस्पर संबंध नाही | १६ |
| ६. | सध्या धर्माच्या नावावर पैसा, सत्ता, प्रसिद्धी सुखोपभोग घेणारे नैतिक वाटतात का? | पूर्णपणे | १० | थोडे फार | १८ | अजिबात नाही | ७२ |
| ७. | सध्याच्या एकूणच समाजात नैतिक शिक्षणाचा समाजसुधारणेसाठी उपयोग होईल का? | निश्चित होईल | ६९ | होणार नाही | ५.८ | थोडा फार | २५.२ |

# १०. निष्कर्ष

धर्म आणि तत्त्वज्ञान यात फरक आहे. ‘जीवन जगण्याची रीत/पद्धत म्हणजे धर्म.’ आजपर्यंत आपण विशिष्ट संदर्भातील कृतीला अथवा कृतिसमूहाला आचरण म्हणतो. ते आचरण चांगले आहे की वाईट आहे, असे विचारायची एक रूढ पद्धत समाजात आहे म्हणून नीतिशास्त्रापुढे कोणता सदाचार, कोणता दुराचार याचा निवाडा करण्याचा प्रश्न असतो. नीती हा शब्द नेणे, घेऊन जाणे अथवा वाहून नेणे अशा अर्थाने वापरला जातो. ‘जी आपणास आयुष्याच्या मार्गावरून नीट घेऊन जाईल अथवा वाहून नेईल ती नीती.’ ‘जीवनाची आदर्श रीती म्हणजे नीती.’ नीतीचा संबंध समाजात प्रस्थापित झालेल्या व समाजाला मान्य असलेल्या चालीरीती अथवा वागणुकीच्या रीतीमध्ये आहे. हेतूच्या अनुसार कृतीच्या नैतिकतेतही फरक पडतो, हे गृहीत धरून धर्माशी नीतीचा संबंध जोडलाच पाहिजे असे नाही. उलट निधर्मी नैतिकतेचा, विचार या संशोधनाचा निष्कर्ष मानता येईल. कोणत्याही धार्मिक कृतीमागचा हेतू शोधल्यामुळे पावित्र्याची कल्पना स्पष्ट होते. स्वार्थी वा नि:स्वार्थी भावनेने धार्मिक कृती केली असेल, त्यानुसार ईश्वराची आपल्या मनातील कल्पना सुस्पष्ट होते.

जो गुण आपल्याकडे वास्तवात नाही, तो आहे हे दाखवणे म्हणजे दांभिकता. धर्मस्थळातील देणगी पेटीत पैसे, दागिने टाकण्यामागे स्वार्थी हेतू तडीस जावा हा हेतू असेल तर ती दांभिकता; पण या दांभिकतेने इतरांचे काहीच बरे-वाईट होत नाही. तरीही दांभिकता हे नैतिक वैगुण्य ठरते. म्हणून संकल्पाचा चांगलेपणा हा नैतिक चांगलेपणा ठरतो. चांगलेपण हे व्यक्तीच्या स्वभावात किंवा चारित्र्यात असते. नैतिक महत्त्व त्यालाच द्यायला हवे हा या संशोधनाचा आणखी एक निष्कर्ष होय.

तरुण संन्याशी नित्यानंद, शंकराचार्य, आसाराम बापू, कृपालूजी महाराज, आचार्य रजनीश यांच्यासारख्या अनेक धार्मिक व्यक्तींनी लाखो



स्त्री-पुरुषांना आकर्षित केले. हजारोंनी आपले तन-मन-धन त्यांना अर्पण केले; परंतु त्यांच्या अनैतिकतेच्या घटनांनी त्यांच्या आचार-विचारातील दरी रुंदावत गेली. अशा व्यक्ती पुढील शतकातील भारताच्या नव्या पिढीला सुयोग्य मार्गदर्शन करू शकणार नाहीत. हा माझा एक निष्कर्ष आहे.

धार्मिक स्थळे हा पर्यटक धंदा बनला असून तेथल्या पुजारी मंडळींच्या व्यवसायाला पावित्र्य नि चारित्र्याचे अधिष्ठान राहिलेले नाही, हे वास्तव आपण समजून घ्यायला हवे. त्यामुळेच स्वामी विवेकानंदांनी संदेश दिला की, खरा धर्म मंदिरात, धार्मिक उत्सवात नसून व्यक्तीच्या प्रामाणिक व पवित्र हृदयात आहे. हा संदेश अगदी बरोबर आहे. त्यानुसार आचरण होणे गरजेचे.

अर्थात, याचा अर्थ तत्त्वज्ञान निरुपयोगी ठरते का? निश्चित नाही. हजारो वर्षांपूर्वी बुद्ध, महावीर किंवा सॉक्रेटिस, प्लेटो यांनी नैतिकता, सद्गुण व सदाचार यांचे अधिष्ठान असल्याशिवाय ज्ञान अपूर्ण आहे, असे मत त्याने मांडले. आदर्श राज्य स्थापन करणे शक्य होत नाही; पण आदर्श माणूस बनण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे असे तो सांगतो. गौतम बुद्धांपासून मार्क्स, अमर्त्य सेन यांच्यापर्यंतच्या तत्त्वचिंतकांनी समाज, राजकारण, अर्थ यांना सोडून धर्मचिंतन केलेले नाही. त्यामुळे तत्त्वज्ञान, विचारवंत यांना ज्या समाजात सन्मानाचे स्थान असते, तेथे तेथे सामाजिक उत्क्रांतीची शक्यता निर्माण होते. आज गरज आहे ती निधर्मी नैतिकतेचा सर्वांगीण विचार होण्याची व ती जनमानसात रुजवण्याची.

मस्लिम किंवा ख्रिश्चन आपापल्या धर्मपद्धती आचरू शकतात किंवा त्याचा प्रसार करू शकतात. तथापि, इंडियन पिनल कोड २९८ व्यक्तीच्या भावनांचे संरक्षण करते तर २९५-ए विशिष्ट जातीं-धर्मांचे संरक्षण करते. १९५ कलमामध्ये असे म्हटले आहे की, जो कोणी पूजेचे स्थान उद्ध्वस्त करेल किंवा मोडतोड करेल किंवा विशिष्ट वर्गाने पूज्य मानलेली एखादी वस्तू मोडेल, ज्यामुळे विशिष्ट वर्गाचे किंवा लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील किंवा लोकांच्या भावना दुखावणार हे माहीत असून जर एखाद्याने तशी कृती केली, तर त्या गुन्ह्यासाठी दोन वर्षांची शिक्षा आणि दंडही लागू केला जाऊ शकतो.

अशा तऱ्हेच्या अनेक गुन्ह्यांमध्ये वास्तविक खऱ्या धर्माचा काहीच संबंध येत नाही; परंतु त्यांचे स्वरूप जातीजातीतील भांडणे किंवा आर्थिक हितसंबंध असे असते. याचे उदाहरण म्हणजे-

(१) शिवशंकर विरुद्ध सम्राट ही केस. या केसमध्ये धर्माकडे पाहण्याची कायद्याची दृष्टी आपल्याला दिसते. अर्थात ही फक्त जातीय स्वरुपाची केस होती. यामध्ये 'आहीर' जमातीच्या शूद्र लोकांनी द्विज (ब्राह्मण) लोक वापरतात तसा पवित्र धागा (जानवे) वापरले. ब्राह्मण लोकांनी तो तोडला. या केसमध्ये एका इंग्लिश न्यायाधीशाने हा वरील कलमाखाली गुन्हा होत नाही असा निकाल दिला. यामध्ये एकाच धर्मातील काही लोकांनी (ब्राह्मण) केलेली कृती ही धर्माचा अपमान करणारी ठरत नाही.

(२) दुसऱ्या एका वीरभ्रदन चेटिया विरुद्ध रामस्वामी केसमध्ये अनेक हिंदू पवित्र मानत असलेल्या गणेशमूर्तींची नासधूस काही राजकीय पुढाऱ्यांनी केली. स्थानिक न्यायाधीशांनी गुन्हेगाराला निर्दोष सोडले. आपल्या निकालात असा दृष्टिकोन घेतला की, हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे ती मूर्ती नव्हती; कारण त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झालेली नव्हती. त्यामुळे एखाद्या मुद्रणालयातील चित्राइतके किंवा एखाद्या दुकानातील शोकेसमधल्या बाहुली इतकेच त्याला महत्त्व होते; परंतु सर्वोच्च न्यायालयाने वेगळा निकाल दिला.



ज्या ठिकाणी लोकांच्या पावित्र्याच्या, आदराच्या भावना एकवटलेल्या आहेत ती मग उंचावरची टेकडी असो किंवा एखादा दुर्गम किल्ला असो किंवा पिंपळाचे झाड असो किंवा सरपटणारा विषारी प्राणी असो, जर अनेक लोकांच्या आदराच्या भावना त्याच्याभोवती एकवटलेल्या असतील तर ती पवित्र वस्तू होय आणि तिचा अपमान हा शिक्षापात्र ठरतो.

एखादी मशीद बांधकामानंतर समाजाला अर्पण केल्यानंतर पवित्र मानली जाऊ लागते. इस्लामी कायद्यानुसार (Mohamedun Law) ती मालमत्ता वफ्तच्या मालकीची झाल्याशिवाय ती पवित्र ठरत नाही. एखादी झोपडी एखाद्या बेवारशी शेतजमिनीवर बांधली आणि तिथे नमाज पढण्यासाठी लोक येऊ लागले तरी ते प्रार्थनास्थान होऊ शकत नाही किंवा पवित्र ठरत नाही.

पूजेचे ठिकाण हे समजल्यानंतर मुख्य प्रश्न येतो तो म्हणजे पवित्र म्हणजे काय? हे स्पष्ट आहे की, एखाद्या वस्तूची पूजा होईल किंवा होणारही नाही. एखाद्या मूर्तीची पूजा होईल आणि हिंदू माणसाला ते पवित्र वाटेल. मुसलमान व्यक्तीला कुराण पवित्र वाटेल, पण तो त्याची पूजा करणार नाही. एखाद्या वस्तूबद्दल आदर असणे, ती वस्तू पूजनीय वाटणे आणि ती वस्तू पवित्र मानणे यात फरक आहे. उदा. ख्रिश्चन लोकांची स्मशानभूमी आणि देवतेचे पूजास्थान किंवा जेथे मूर्ती ठेवलेली आहे यामध्ये फरक असतो. कायद्यानेसुद्धा अशा फरकाची दखल घेतलेली आहे. २९५ कलमामध्ये पूजेच्या वस्तूंचा विचार केलेला आहे तर २९७ कलमामध्ये स्मशानभूमीचा विचार केलेला आहे, त्यात अंत्यसंस्कारांचा आणि मानवी अवशेषांचा भाग येतो; पण व्यक्तीने कायमस्वरूपी त्याग केलेल्या वस्तू पवित्र मानता येत नाहीत.

उदा. एखाद्या मुस्लिम साधूची कबर हे आदरणीय ठिकाण असते, त्या ठिकाणी त्या साधूला दफन केले किंवा तसे मुसलमान लोक गृहित धरत असतील तरच ते ठिकाण पवित्र ठरते, अन्यथा ते पवित्र म्हणता येत नाही. लोक तेथे नमाज पढत असतील तरीही कबरस्थान पवित्र ठरत नाही. मुसलमानांच्या धर्मभावनेप्रमाणे मृत व्यक्तीसाठी अल्लाहकडे दुवा मागीतला